रविवार, २५ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१२९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 25 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-129 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

# आज औरंगाबादेत महास्वच्छता अभियान



# माध्यमांमध्ये फक्त हिंदू-मुस्लीम वादावरच चर्चा : राहुल गांधी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशात माध्यमांमध्ये फक्त हिंदू-मुस्लीम वादावर चर्चा घडवून आणली जाते. मात्र माध्यमांवर दाखवला जात असलेला हा संघर्ष खरा नाही. देशात खूप प्रेम आहे. देशातील सामान्य नागरिक एकमेकांवर प्रेम करतात. देशातील ९० टक्के लोक जात, प्रांत, धर्म या बाबी सोडून एकमेकांवर प्रेम करतात. देशातील लोक प्रेमाने एकमेकांसोबत राहतात. देशातील प्रमुख मुद्द्यांवरून लक्ष विचलित व्हावे म्हणून हिंदू-मुस्लीम संघर्ष दाखवला जातो. हे नरेंद्र मोदी यांचे नव्हे तर अंबानी आणि अदानी यांचे सरकार आहे, असे म्हणत राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली.**

खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची 'भारत जोडो यात्रा' सध्या दिल्लीमध्ये दाखल झाली आहे. दिल्लीमध्ये आल्यानंतर राहुल गांधी यांनी जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी देशातील उद्योग, चीन-भारत संघर्ष यावर भाष्य केले. भारतात तयार झालेली उत्पादने जगभरात पोहोचायला हवीत. हातातील मोबाईल, अंगातील कपडे, पायातील बुटांवर मेड इन चायना नव्हे तर मेड इन इंडिया असायला हवे, असे राहुल गांधी म्हणाले. तसेच त्यांनी भारत-चीन संघर्षावरही भाष्य केले.

देशातील दोन-तीन अब्जाधीशांना हजारो कोटींचे कर्ज दिले जाते. मात्र छोट्या उद्योजकांना बँकेकडून कर्ज दिले जात नाही. छोटे उद्योजक देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली, चुकीच्या पद्धतीने वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी केली. छोट्या व्यापाऱ्यांना नष्ट करण्यासाठी त्याचा शस्त्र म्हणून वापर करण्यात आला. छोट्या उद्योगांच्या माध्यमातूनच देशातील तरुणांना रोजगार मिळतो. मात्र छोट्या उद्योजकांना नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. भाजपाने माझी प्रतिमा खराब करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च केले. मात्र मी त्यांना काहीही म्हणालो नाही. त्यांच्यात किती हिंमत आहे, हे जोखण्यासाठी मी त्यांना काहीही म्हणालो नाही. टीव्ही, माध्यमं, व्हॉट्सअ‍ॅप, फेसबूक सगळीकडे माझी प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र एका महिन्यात मी तुम्हाला सत्य दाखलवले. सत्या लपवता येत नाही, अशी टीका राहुल गांधी यांनी भाजपावर केली.

भारत जोडो यात्रा देशाला जोडण्यासाठी आहे. द्वेष, भीतीमुळे आपल्या देशाचे नुकसान होत आहे. याच कारणामुळे आम्ही कन्याकुमारी ते काश्मीर अशी यात्रा काढली आहे. आम्ही काश्मीरमध्ये देशाचा ध्वज फडकवणार आहोत. सध्या भारत आणि चीन यांच्यात खरी लढत आहे, असेही राहुल गांधी म्हणाले.

# पो.नि. दराडेंच्या समर्थनार्थ राहुरीकरांचा चक्का जाम

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** जिल्ह्यातील राहुरीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या बदलीची विधानसभेत घोषणा झाल्यानंतर इथल्या नागरिकांनी त्यांच्या समर्थनार्थ आज चक्काजाम आंदोलन केले. जिल्ह्यातील राहुरीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या बदलीची विधानसभेत घोषणा झाल्यानंतर इथल्या नागरिकांनी त्यांच्या समर्थनार्थ आज चक्काजाम आंदोलन केले. माजीमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्राजक्त तनपुरे, ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब खेवरे यांच्यासह रिपाइं आठवले गटाच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने या चक्काजाम आंदोलनात सहभागी झाले होते. दीड तासांनी हे आंदोलन मागे घेण्यात आले. राहुरी तालुक्यातील ब्राह्मणी या गावात धर्मांतर करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आरोपीला राहुरीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी पाठीशी घातल्याचा आरोप भाजप आमदार राम सातपुते यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे केला. यानंतर प्रभारी गृहमंत्री शंभूराज देसाई यांनी राहुरीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या तडकाफडकी बदलीचे आदेश दिले. या बदलीविरोधात आज राहुरीकर एकवटले. त्यांनी अहमदनगर-मनमाड महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. आम्हाला विधानसभेत बोलू दिले जाते नसल्याने रस्त्यावर उतरुन आवाज उठवावा लागत असल्याचे वक्तव्य माजी मंत्री तनपुरे यांनी केले. धर्मांतर होत असेल तर त्याला पाठिंबा देणार नाही मात्र चौकशी करण्याआधी अधिकाऱ्याची बदली करणे आम्हाला मान्य नसल्याचे प्राजक्त तनपुरे यांनी स्पष्ट केले. राहुरीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी राहुरीतील गुन्हेगारीवर चांगल्या पद्धतीने आळा बसवला आहे. त्यांनी रोडरोमियोंचा बंदोबस्त करुन गुन्हेगारांमध्ये वचक निर्माण केला आहे. कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्याची बदली होऊ नये यासाठी राहुरीकरांनी रास्ता रोको केला असल्याची प्रतिक्रिया ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब खेवरे यांनी दिली आणि सोबतच भाजप आमदार राम सातपुते यांच्यावर टीका केली. दरम्यान दीड तासानंतर हे चक्काजाम आंदोलन मागे घेण्यात आलं. यावेळी आंदोलन सुरु असताना तिथून जाणाऱ्या रुग्णवाहिकेला वाट मोकळी करुन देत माणुसकीचे दर्शन घडवले.

# अजितदादा पत्रकारावर भडकले

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे निलंबन करण्यात आल्यानंतर विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आक्रमक भूमिका न घेतल्याने शरद पवार नाराज असल्याची चर्चा असल्याचा प्रश्न एका पत्रकाराने विचारताच अजित पवार संतापले. अमरावती येथे पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी आले असताना प्रसार माध्यमांशी ते बोलत होते. अजित पवार म्हणाले, गेली ३२ मी राजकारण-समाजकारणात वावरतो आहे. मला काय दुधखुळा समजता काय? विरोधी पक्षनेते म्हणून माझे काम मी कसे करावे, हे मला कुणी सांगण्याची गरज नाही. मला विरोधी पक्षनेतेपदावर बसवलेल्या आमदारांना माझे काम माहिती आहे, त्यामुळेच तर त्यांनी मला हे पद दिले आहे.

# उरीमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे, स्फोटकांचा साठा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बारामुल्ला :** उत्तर काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील उरीच्या हातलांगा सेक्टरमध्ये शनिवार लष्करासह पोलिसांनी मोठ्याप्रमाणात शस्त्रास्त्रे आणि स्फोटकांचा साठा जप्त केला. पोलीस अधिकाऱ्यांने दिलेल्या माहितीनुसार, बारामुल्ला पोलिसांनी लष्कराच्या तुकडीसह केलेल्या संयुक्त कारवाईत उरीच्या हातलांग सेक्टरमधून मोठ्याप्रमाणत शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात यश मिळवले आहे. यामध्ये ०८ -AK74U, २४ – AK 74 मॅगझिन, १२ – चानिज पिस्तुल, २४ – मॅगझिन आणि २४४ राउंड, ०९ – चायनीज ग्रेनेड, ०५ – पाक ग्रेनेड, ८१ पाकिस्तानी झेंड्याचा शिक्का असणारे फुगे, अशा शस्त्रसाठ्याच समावेश आहे.



# काटे कुठेच नव्हते, दिला दगा फुलांनी...!

## भोकरच्या नवयुवकांची विधायक कामगिरी : वृद्ध महिलेला दिला दिलासा


आधुनिक केसरी न्यूज

भोकर : ज्यांच्याकडे "माय" आहे तो जगातला श्रीमंत माणूस म्हणून ओळखला जातो. याच मायला काहिजण विसरून जातात. नव्हे तर चक्क घरातून हाकलून आपल्या संसारात रममान होतात. अशीच काहीशी घटणा शहरात उघडकीस आली आहे. पोटच्या गोळ्यांनीच "मायला" घराबाहेर काढल्याने ती निराधार झाली. येथील नवयुवकांनी सामाजिक बांधिलकी जोपासत वृध्दमहिलेला आधार दिला. "काटे कूठेच नव्हते, दिला दगा फुलांनी" अशी खंत त्या महिलेने व्यक्त केली आहे. आई-वडील हेच खरे दैवत मानून बहुतेकजन मरेपर्यंत सेवा करून आशीर्वाद घेण्यात धन्यता मानतात. आई-वडीलाची सेवा करण्याची संधी मिळाल्याने स्वताला भाग्यवान समजतात, अशा सूसंस्काराने ओतप्रोत भरलेल कुटुंब एक आदर्श मानल्या जात. दुसरीकडे याच्या उलट चित्र पाहावयास मिळत आहे. कुणी मालमत्ता, आर्थिक, जमीनजुमला, घरातील अतंर्गत वादांमुळे जन्मदात्या मायलाच दूजाभाव करतात. आपल्या मुलाला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपून काळजी घेतली अशा " माय "ला बईमान होत आहेत. अशीच घटना भोकर शहरात घडल्याने उघडकीस आली आहे. शहरातील प्रफुल्ल नगरात असलेल्या विठ्ठल मंदिराच्या ओट्यावर एक वृध्द महिला सतत चार ते पाच दिवसांपासून ठाणमांडून बसल्याचे निदर्शनास" आल्याने येथील सामाजिक बांधिलकी जोपासणारे नवयूवक माधव पवार, अंकुश गौड रतनवार यांनी तिची विचारपूस करून आठवडाभर सेवा केली, दरम्यान ही बाब येथील सामाजिक यूवा कार्यकर्ते संदीप गौड पाटील कोंडलवार यांना लक्षात येताच त्यांनी वृध्दमहिलेची कसून चौकशी केली असता "त्या महिलेचा मूलगाआणि सूनेच्या जाचाला कंटाळून घर सोडून मंदिराचा असरा घेतल्याचे सांगितले आहे. आता माझ्या जगण्याला अर्थ नाही मला जिवन संपवायचं आहे. मी माझ्या घरी सुखी राहणार नाही, मला वृध्दाश्रमात सोडा" अशी ईच्छा त्या महिलेने व्यक्त केली. ही करूण काहणी ऐकून त्या यूवकानी सदरील मुलाशी संपर्क साधून मायला मुलाच्या स्वाधीन केले आहे.



**अन्..तीला दृष्टि दिली :** मंदिराच्या ओट्यावर आसरा घेतलेल्या वृध्द महिलेस डोळ्याने दिसत नव्हते, ही बाब लक्षात येताच संदीप गौड कोंडलवार यांनी स्वत पैसे खर्च करून डोळ्यांचे ऑपरेशन केल्याने महिलेला" दृष्टी" दिल्याने तिने भरभरून आशीर्वाद दिला आहे.


**यूवकाच्या कार्याच कौतुक :** जगात माणुसकी हरवलेली माणसं असले तरी माणुसपण जपणारी आणि ह्रदयात ममत्वाचा ओलावा कायम ठेवणारीही माणसं आहेत, याचे ताजे उदाहरण म्हणजे भोकर शहरातील माधव पवार, अंकुश रतनवार, संदीप कोंडलवार यांनी सामाजिक भान ठेवून एका महिलेल्या दिलेल्या आधाराचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.




## शाश्वत समाधानाचे मुक्त विद्यापीठ : ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

आधुनिक केसरी

देशात आणि देशाबाहेरही हजारो लोक या प्रवचनांचे वाचन करतात. लोकांचा अनुभव असा आहे की त्यांना दैनंदिन जीवनात पडलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे या प्रवचनातून सहज मिळतात. अध्यात्मात अहंकार फार घातक ठरतो. सर्वसामान्य माणसाला मी एखादी गोष्ट केली याचा फार अभिमान असतो. एकदा एका व्यक्तीने महाराजांना विचारले की महाराज, तुम्हाला काहीतरी द्यावेसे वाटते. काय देऊ ? महाराज म्हणाले, 'कोणालाही त्याच्याकडे जे नसेल ते दिले म्हणजे आनंद होतो. 'मी कर्ता आहे' ही भावना माझ्याकडे नाही. तेव्हा तुम्ही तुमची 'मी कर्ता' ही भावना मला देऊन टाकावी. त्याने मला आनंद होईल व तुमचेही कल्याण होईल. इ.स. १९१३ मध्ये गोंदवल्याला महाराजांच्या उपस्थितीत शेवटचा रामनवमीचा उत्सव झाला. नऊ दिवस अखंड नामस्मरण, कीर्तन, पुराण आदी सुरु होते. सुमारे पाच हजारावर माणसे गोंदवल्याला उपस्थित होती. महाराजांना नमस्कार करायला येणाऱ्या प्रत्येक माणसाला महाराज



पाठीवरून हात फिरवून सांगत, 'बाळ, भगवंताने प्रपंचात आपल्याला ज्या स्थितीत ठेवले आहे, त्यात समाधान मानावे आणि त्याच्या नामाला कधी विसरू नये. जो नाम घेईल त्याच्या मागे राम उभा आहे. नाम घेणाऱ्याचे राम कल्याण करतो. एवढे माझे सांगणे शेवटपर्यंत विसरू नका.' जिथे जिथे नामस्मरण सुरु आहे, तिथे तिथे श्रीमहाराज असतातच. एकदा धरलेला आपल्या भक्ताचा हात ते कधीही सोडत नाही. नामात प्रेम आले पाहिजे. सुरुवातीला ते नसले तरी तुमची नामसाधना जसजशी वाढत जाईल, तसतसे नामात प्रेम उत्पन्न होईल. हे नामच तुम्हाला स्वस्वरूपाची ओळख करून देऊन भगवंतापर्यंत घेऊन जाईल. श्रीमहाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य रामरायाच्या नामस्मरणात घालवले. प्रपंच आणि परमार्थ दोन्हींचा आदर्श त्यांनी आपल्या वागण्याबोलण्यातून घालून दिला.

**जायचं जनीं जन्म नामार्थ झाला ।**
**जयाने सदा वास नामात केला ।।**
**जयाच्या मुखी सर्वदा नामकीर्ति ।**
**नमस्कार त्या ब्रह्मचैतन्य मूर्ती ।।**



## आनंदी पहाट

## मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात खरी परीक्षा आपल्या धीराची, सचोटीची, मेहनतीची, हुशारीची, बौद्धिक कौशल्याची असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपण नवीन परीक्षाच देत असतो. अनेकदा ही परीक्षा देताना प्रत्येकाला परीक्षार्थी होणे पसंत नसते; परीक्षकाची भूमिका वठवली जावी असे वाटत असते. समुपदेशकाने सर्वप्रथम श्रोत्याची आणि मग संवादकाची भूमिका बजावली पाहिजे. अनेकदा संवादामध्ये बोलणाऱ्या व्यक्तीचे नीट ऐकून आणि समजूनच घेतले जात नाही. परस्परांमध्ये सकारात्मक संवाद घडत राहणे सतत गरजेचे असते. घरातील नकारात्मक वातावरणाचा परिणाम प्रत्येकाच्या मानसिकतेवर, शरीरावर, मनावर, परस्पर संबंधांवर, शिक्षणावर म्हणजेच प्रत्येक गोष्टीवर होऊ शकतो. अशावेळी मानसिक पातळीवर समुपदेशन उपयुक्त ठरते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मानसशास्त्र हा भारतातील करिअरचा एक चांगला पर्याय आहे. भारतात हळूहळू प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांची मागणी वाढत आहे. मानसशास्त्राच्या विविध शाखा प्रसिद्ध आहेत क्लिनिकल, समुपदेशन, औद्योगिक, शैक्षणिक (शालेय) आणि न्यायवैद्यक मानसशास्त्र. क्लिनिकल सायकॉलॉजी हे भारतातील मानसशास्त्राच्या प्रस्थापित क्षेत्रांपैकी एक आहे. अलीकडच्या काळात अनेकांना आपल्या मनातील विचार सांगून मोकळे होता येत नाही, अनेकांना मानसिक पातळीवर खूप मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. मोकळेपणाने मनांतील विषय एखाद्याला सांगितले कि मनावरचा ताण, दडपण कमी झाल्याचे देखील जाणवते. ह्या मोकळ्या होण्यातून आपल्या समस्यांचे निराकरण होत जाते. काहीवेळा उद्‌भवलेल्या प्रश्नांची उकल होत जाते. मनातील भय, न्यूनगंड दूर होण्याच्या दृष्टीने मोकळेपणाने आपल्या मनांतील शंका व्यक्त करणे उपयुक्त ठरते. आपल्याला पडलेले प्रश्न केवळ आपल्याच भ्रम आणि संभ्रमामुळे निर्माण होत असतात.

## तडजोड हवीच

आधुनिक केसरी

आयुष्य सुखकर होण्यासाठी कुठेतरी तडजड करावीच लागते. तडजोडी शिवाय जीवनात आनंद नाहीच. राहतो तो फक्त हेकेखोरपणा. काही श्रीमंत आई वडील गरिबांची हेटाळणी करतात. तीच सवय मुलांना लागते. आणि हे जेव्हा गरीब होतात तेव्हा यांना आत्महत्याशिवाय पर्याय राहत नाही. कारण तडजोड कधी केलीलीच नाही. तो संस्कार कोणी त्यांच्यावर केला नाही. मुलं शाळेत असताना त्यांना फक्त पोळी भाजी द्या .सगळ्यापेक्षा माझ्या मुलाचा डब्बा वेगळा असावा ही वृत्ती नको. तेथे एकतेची भावना वाढीस लागत असते. चार-पाच मित्रांच्या भाज्या सारख्या आल्या तर त्यांना कोण आनंद होत असतो. भेंडी, बटाटा या भाज्या बहुतेक मुलांना आवडतात. बऱ्याचदा त्यांच्या डब्यात याच भाज्या दिसतात. तुम्हाला वेगळा डबा द्यायचा असेल तर सगळ्यांसाठी तो पदार्थ करून द्या. त्याला सांगा की तुझ्या मित्रांना पण दे. मुलांना खूप आनंद होतो या गोष्टीचा. तो आनंदाने सांगत असतो आपल्या मित्रांना, आज माझ्या आईने तुमच्यासाठी पण डबा दिला. मधल्या सुट्टीत आपण मिळून खाऊ. चारच पुऱ्या असतील तर अर्धी अर्धी ते वाटून खातात. पण त्या अर्ध्या पुरीत त्यांचे पोट भरत असतं. वाटून खाल्ल्यामुळे कुठलाही भेदभाव तिथे नव्हता, गरीब श्रीमंतीचा. दोन्ही घरी सारखीच पुरी तयार होत असते. त्या पुरीला माहीत नसतं गरीब कोण? श्रीमंत कोण? कधी कधी आईने आपल्या मुलाच्या डब्यात मुद्दामच मित्रांच्या आवडीच्या वस्तू करून द्याव्यात. आपल्या लेकराला याचा खूप आनंद होत असतो. आपल्या मुलाने त्याच्या मित्राची काळजी घ्यावी ही गोष्ट आपण त्याला आपल्या वागण्यातून शिकवावी. स्वतः मुलांसोबत तडजोड करावी, म्हणजे त्यांना आपोआप सवय लागेल. कामवाली ,भाजीवाली, सासू,नणंद , नातेवाईक यांच्याशी आपण तडजोड करत गेलो की मुलांना हे पाहून तडजोडीची सवय लागते. लहानपणी मुलं आईच्या सहवासात असतात. म्हणून आईचे उदाहरण दिले. वडिलांनी सुद्धा शेजारी, मेहुणा सासरे ,कार्यालय, मित्र, बायको, मुलं यांच्याशी तडजोड करावी. तडजोड हा एक खूप चांगला संस्कार आहे. आयुष्य आनंदी व सुखी होण्यासाठी. चला आपणही कुठेतरी तडजोड करूया..... पुढचा प्रवास सुखकर होईल...

**संस्कारधन**



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

**भाग-54**

## कबूतर आणि शिकारी

आधुनिक केसरी


एका जंगलामध्ये खूप सारे कबूतर एकत्र राहात होते. एका शिकाऱ्यांना या जंगलामध्ये राहणाऱ्या कबुतरांची चाहूल झाली व त्याने या कबुतराला पकडण्यासाठी एक युक्ती केली. शिकारी आणि कबूतर राहणाऱ्या आसपासच्या जागेमध्ये जाळी घातले व त्या जाळांमध्ये डाळींबाचे बीअंथरले. तेथे एक कबुतरांचा थवा आला व त्या थव्यातील कबूतरांनी केवळ डाळिंबी चे बी पाहिले व ते बी खाण्यासाठी कबुतरखाने जाळ्यावर झेप घेता सर्व कबूतर जाळ्यामध्ये अडकले.
तेव्हा सर्व कबुतरांच्या लक्षात आले की आपण एखाद्या शिकाऱ्याच्या कावडी मध्ये सापडला त्या आजारातून सुटका करण्यासाठी एक एक कबूतर बळ मिळवून देण्याचा प्रयत्न करू लागली पण एकाही कबुतराला जाळ्यातून सुटका करता आली नाही. सर्व कबूतर हा तास झाले व त्यांना वाटले की आता आपण शिकार होणार तेवढा कबुतराच्या थव्यातील एक म्हातारी कबूतर पुढे आले व सर्व कबुतरांना सांगत ते म्हणाले, एकट्याच्या बलाने हे जाळ उडणे अतिशय कठीण आहे परंतु सर्व कबुतराने एकसाथ मिळून ताकद लावली तर आपण हे सर्व जाळे घेऊन पडू शकतो.
म्हाताऱ्या कबुतरा चे बोलणे सर्व कबुतरांचा लक्षात आले व सर्वांनी एक साथ मिळून ताकत लावताच जाळे उडाले व सर्व कबूतर जाळ्यात सोबत पळून गेले अशा प्रकारे सर्व कबुतरांची शिकाऱ्याच्या हातातून सुटका झाली.
**तात्पर्य:** मित्रांनो या बोधकथा येतो आपल्याला एकताची ताकद लक्षात येते.

## समर्थवाणी

आधुनिक केसरी


**परम कठीण शीण वाटतो रे ।**
**रामाकारणे कंठ दाटतो रे ।।**
**अंतर गुंतले काय करणें रे ।**
**संसारी धारिष्ट किती धरणें रे ।।**
**वियोग विषम काळ पातला रे ।**
**जीव हा दुःखानळी घातला रे ।।**
**अंतरी आणिक कांहीं नावडे रे ।**
**रामदासी रामकथा आवडे रे ।।**

## नाम सहजपणे येणे याचे नाव 'अजपाजप'



आधुनिक केसरी

एक चांगला गृहस्थ होता. त्याला कसलेही व्यसन नव्हते. त्या गावात एक दिवस एक बुवा आला. या सद्‌गृहस्थाला भविष्याचा नाद होता. त्याला कुणीतरी सांगितले की, हे आलेले बुवा भविष्य अति उत्तम सांगतात. तो त्यांना भेटायला गेला, परंतु ते गांजा ओढीत होते. त्याला काही तो वास सहन झाला नाही. तरीही, भविष्य ऐकण्यासाठी म्हणून तो एका कोपऱ्यात बसून राहिला. असे बरेच दिवस गेले. होता होता त्याला बुवा फार आवडू लागले. त्याप्रमाणे तो रोज तिथे जात असे. एक दिवस बुवांनी सांगितले म्हणून चिलमीत निखारा ठेवला; दुसरे दिवशी फडके ओले करून दिले. पुढे त्याला एकदा बुवांनी सांगितले म्हणून त्याने एक झुरका घेऊन पाहिला; आणि हळूहळू सवयीने तो इतका तरबेज झाला की त्याने गांजा ओढण्यात गुरूलाही मागे टाकले ! असा हा संगतीचा परिणाम फार मोठा होत असतो. ज्याची संगत केली असता भगवत्प्रेम प्रकट होते, तो संत जाणावा. अशाची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. श्रीरामप्रभूला आवडणारे 'नाम' घेऊन मारुतिरायांनी त्याला आपलासा करून घेतला. ते नाम तुम्ही अत्यंत श्रद्धेने घ्या, भगवंताला आपलासा करून घेणे तुम्हालाही अगदी शक्य आहे. नाम कुठेही घ्या, कोणत्याही वेळी घ्या, कितीही हळू घ्या, पण ते श्रद्धेने घ्या, म्हणजे ते भगवंतापर्यंत खात्रीने पोहोचू शकेल. परमेश्वराच्या प्राप्तिसाठी प्राणायाम, योगासने इत्यादि साधने सांगितलेली आहेत. परंतु त्याहून जास्त महत्त्वाचे म्हणजे परमेश्वराची सहजभक्ति. भगवंताचे नाम सहजपणे येणे याचेच नाव 'अजपाजप' होय. हा भक्तिचा प्रकार अत्यंत श्रेष्ठ आहे. यात मीपणाचा शेवट आहे. मीपणा जाणे हीच भगवंताची खरी अनन्यता होय. भगवंताची पूर्ण कृपा म्हणजे भगवंताची एकरूपताच होय. परमार्थ म्हणजे आपली 'सहजावस्था' झाली पाहिजे; आणि तशी व्हायला अंतरंगाची ओळख करून घ्यायला पाहिजे, म्हणजेच अंतर्मुख बनायला पाहिजे. भगवंताच्या नसतेपणाने उठलेले वारे म्हणजे काळजी होय. मनुष्याच्या सर्व दुःखांवर, आजारांवर, आनंद आणि समाधान हेच खरे औषध आहे. जो सदाचरणात आणि भगवंताच्या नामात राहतो, त्याला हे औषध सहजी लाभत असते. या औषधाचा परिणाम नकळत आणि सहजी होत जाऊन तो शेवटपर्यंत टिकून राहतो. आनंदमय राहण्याकरिता भगवंत हवा. भगवंताकडून येणारी शांति हेच समाधान होय. मन आणि भगवंत यांना जोडणारी साखळी म्हणजे नाम. या नामात आपले सर्वस्व गुंतवले तर आपल्याला भगवंतापर्यंत सहज जाता येईल.
**आजचे बोधवचन आहे** – नामाच्या आनंदाचा झटका आला की मनुष्य स्वतःला विसरेल आणि जगालासुद्धा विसरेल. श्रीराम समर्थ



## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**तुटेना फुटेना कदा देवराणा।**
**चळेना ढळेना कदा दैन्यवाणा।**
**कळेना कळेना कदा लोचनासी।**
**वसेना दिसेना जनीं मीपणासी।।१७७।।**

**श्लोकार्थ :–** मुख्य देव म्हणजे ईश्वर कधी तुटत नाही फुटत नाही, चळत नाहीं किंवा ढळत नाही. चर्मचक्षूंना तो कधीही कळत नाही. देहाहंकारास त्याचे अस्तित्व भासत नाही, तो प्रत्ययास येत नाही.

**विवेचन :–** समर्थ म्हणतात की हा जो मुख्य देव आहे तो निर्गुण निराकार आहे. त्यामुळे तो तुटण्या फुटण्याची शक्यता नाही. आपण देव म्हणून मूर्ती देव्हाऱ्यात ठेवतो, मंदिरात प्रतिष्ठापना करतो. त्या मूर्ती कालांतराने भंग पावतात. रोज पूजा केल्याने, मूर्तींना दह्यादुधाचा अभिषेक केल्याने, नाना प्रकारची सुगंधी द्रव्यांचे विलेपन केल्याने मूर्तीची झीज होत असते आणि कालांतराने त्या गुळगुळीत होऊन नाक, डोळे, ओठ काही दिसत नाही अशा विद्रूप होत असतात. खरा देव मात्र कधीही गुळगुळीत होऊन विद्रूप होत नाही, तो फुटत नाही, तुटत नाही.

एखाद्या मोठ्या अधिकाराला भेटायला जाताना मनुष्य लागणारी सर्व कागद पत्रे सोबत घेतो, उचित वस्त्रे परिधान करतो, टापटीप राहून अत्यंत अदबीने त्या अधिकाऱ्याला भेटतो. इथे सगुण उपासना करताना मात्र मनुष्य मी कसा मोठा भक्त आहे, माझ्याकडे संगमरवरी देव्हारा आहे, माझ्याकडे अमुक आहे, तमुक आहे, मी चार तास पूजा करतो, अशा वल्गना करीत असतो. इथे मनुष्याला सर्वोच्च परमात्म्याला भेटायचे आहे, तर त्याने किती अदबीने, अहंकार विरहित होऊन भेटले पाहिजे.
परमेश्वर मीपणाच्या भावनेने पछाडलेल्या जगात रहात नाही. अधिकाऱ्याला देहबुद्धी असल्याने त्याला काही द्यावे लागेल, परंतु हा सर्वोच्च परमात्मा निर्गुण आणि सगुणाच्या पलीकडे आहे. त्यामुळे त्याला जाणून घेणेच गरजेचे आहे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

इतके श्लोक अभ्यासल्यानंतर एक गोष्ट आपल्या लक्षात आली असेल की एक अहंकार हा सर्व दुःखाचे मूळ आहे. तो फक्त दुःखच देतो अस नाही तर, ईश्वरालाही आपल्या पासून खूप दूर नेतो.
आपल्या हिंदूसंस्कृतीमध्ये मूर्तीपूजा हे परमेश्वर प्राप्तीचे सोपे साधन सांगितले गेले आहे. सामान्य मनुष्यासाठी ते अत्यंत उपयुक्त आहे कारण यातूनच मनुष्याला सगुणातून निर्गुणाकडे जाण्याचा मार्ग गवसतो. पण सध्या भक्ती कशी करावी, पूजा कशी करावी किंवा पूजा करणे म्हणजे नक्की काय ? याचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्याची व्यवस्था नसल्यामुळे मनुष्य पूर्णपणे यांत्रिक पद्धतीने म्हणजे आपण एखादे वाहन चालवितो, अगदी त्याच पद्धतीने करतो.
चांदोमामा हा खरा मामा नसून एक ग्रह आहे, अशी अनुभूती होई पर्यंत मूर्तीपूजा आवश्यक आहे. त्यातूनच पुढे मूर्ती म्हणजे खरा देव नव्हे तर खरा देव मूर्तिहून निराळा आहे हे कळते आणि मनुष्य देवरूप होतो. खरं तर देवाला पाहायचे असेल तर वेगळी दृष्टी लागते. ही वेगळी दृष्टी मिळवणे हे सर्वस्वी आपल्या हातात आहे. (सद्‌गुरूंची कृपा प्रयत्न करणाऱ्याच्या पाठीशी असतेच ) आपण ज्या देवाची भक्ती करतो त्या देवाचा किंवा त्यातील देवत्वाचा एकेक गुण आत्मसात करणे. आपण रामाला आपले आराध्य मानतो. पण आपले आचरण कसे असते ? पितृवचन पाळणे दूर, आपण वडील माणसांचे नीट ऐकूनही घेत नाही. राम पितृवचन पाळण्यासाठी वनवासात गेले, आपण मात्र आपल्या वृद्ध मातापित्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवितो. एकवचनी हा शब्द तर..... फारच मोठा !! आपण आपल्या रामाचा एक गुण तरी वर्षभरात आत्मसात करण्याचा प्रयत्न केला तर ती खरी सगुण उपासना होईल. (सगुण म्हणजे स+गुण= गुणासहीत भक्ती करणे ).
हे सर्व करणे सहज शक्य आहे पण त्यासाठी आपला अहंकार समूळ नष्ट केला पाहिजे. आपल्या कुटुंबातील सदस्यांमध्येही राम आहेच, पण आपण त्याला अहंकारापोटी मूर्तीत शोधतो, आणि 'तो' आपल्याला दिसत नाही. आजपासून आपल्या कुटुंबातील सदस्यांमध्ये 'राम' शोधू. तो आपल्याला नक्कीच भेटेल, मग हळूहळू सर्वत्र रामाचे अस्तित्व जाणवू लागेल.

# आजपासून वीर बालदिनानिमित्त शीखसंगतचे विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील तिन्ही गुरुद्वारा तर्फे येत्या २६ डिसेंबर रोजी वीर बालदिन साजरा करण्यात येत आहे. त्या प्रित्यर्थ २५ व २६ रोजी शहरात प्रश्नमंजुषा व कीर्तन आयोजित केले आहे, अशी माहिती शीखसंगत चे अध्यक्ष रणजितसिंग गुलाटी यांनी दिली.

केंद्रशासनाने २६ डिसेंबर रोजी वीर बाल दिवस घोषित केल्यानंतर शहरातील उस्मानपुरा, धावणीमोहल्ला आणि सिंधी कॉलनी याठिकाणच्या शीख संगत यांनी वरील उपक्रमाचे आयोजन केले आहे.

आद्य गुरु गुरुगोविंदसिंग यांची पत्नी व चार मुलांचे बलिदान देश विसरू शकत नाही त्यामुळे सरकार तर्फे वीर बाल दिवस साजरा केला जात आहे. २५ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते ४ पर्यंत उस्मानपुरा गुरुद्वारात साहेबजादे यांच्या जीवनाविषयी प्रश्न मंजुषा आयोजित केली आहे तर संध्याकाळी ७ ते १० पर्यंत सिंधी कॉलनी येथे कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केला २६ रोजी प्रश्नमंजुषा कार्यक्रमात सहभागी स्पर्धकांना पारितोषिक वितरण करण्यात येईल. तसेच जोरावरसिह व फतेहसिंह यांच्या जीवनचरित्राची माहिती नागरिकांना देण्यात येईल. या पत्रकार परिषदेला रणजितसिंग गुलाटी, गुरुजीतसिंग छाबडा, हरदेवसिंग मुच्छल हरविंदर सिंग बिंद्रा, कुलदीपसिंग निरह, यशपालसिंग ओबेराय यांची उपस्थिती होती.

# सोनी कानडे यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** येथील बोधी ट्री एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने राज्यातील 15 शिक्षकांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला असून सदर पुरस्कार वितरण सोहळा जीवन गौरव च्या सातव्या वर्धापनदिनी औरंगाबाद येथे पार पडणार असल्याची माहिती बोध ट्री एज्युकेशनल फौउंडेशनचे रामदास वाघमारे आणि मीरा वाघमारे यांनी दिली. सदर पुरस्कारासाठी जि.प .प्रा. कन्या शाळा माळशिरस येथील उपक्रमशील शिक्षिका व उत्कृष्ट कवयित्री सोनी कानडे यांची निवड झाली आहे. शैक्षणिक, साहित्यिक ,सामाजिक या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. एक उपक्रमशील आणि नेहमीच आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविणाऱ्या सोनी कानडे या एक आदर्श , उपक्रमशील शिक्षिका ,उत्कृष्ट कवयित्री आहेत. त्यांची स्वलिखित दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.



# शेतकरी मेळाव्यात मा.आ. हर्षवर्धन जाधव यांचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजारसावंगी येथे दि.22 डिसेंबर रोजी सकाळी 10 वाजता माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी शेतकरी मेळावा घेतला यावेळी शेतकऱ्यांची नुकसान भरपाई कायमस्वरूपी कशी मिळवायची, आणेवारी ५० पैसे पेक्षा कमी कायमस्वरूपी कशी लावावी, पीक विमा, कायमस्वरूपी कसा मिळवायचा, महावितरण विभागाला वीज तोडणी पासून कायमस्वरूपी कसे रोखायचे, पीक कर्ज, मुद्रा लोन कायमस्वरूपी कसे मिळवायचे,औरंगाबाद शहराचे नाव संभाजीनगर करायची पद्धत काय आसावी, शासकीय गायरान जमीन नावावर कशी करायची, शासकीय कर्मचाऱ्यांकडून सेवा हमी कायद्याअंतर्गत सरकारी कामे कसे करून घ्याची, युरिया योग्य दरात कसा मिळवायचा आदि विषयांवर त्यांनी शेतकऱ्यांचे सविस्तर व योग्य मार्गदर्शन केले. यावेळी इंजी महेशभाई गुजर, सुरेश फुलारे, किरण निकम यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामपंचायत तर्फे मा.आ.जाधव यांचे सत्कार

खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ग्रुप ग्रामपंचायत वतीने मा.आ. हर्षवर्धन जाधव यांचा सरपंच आप्पाराव नलावडे व सदस्य पोपट काटकर यांच्या हस्ते शॉल देवुन सत्कार करण्यात आला.यावेळी सरपंच नलावडे, सदस्य पोपट काटकर माजी सरपंच भिमराव पाटील नलावडे माजी ग्रापं सदस्य चांद पठाण सचिन गवळी सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री गंगागिरी महाराज समाधी दर्शनाने एक धामाचे पुण्य

## महंत रामगिरीजी महाराज : गंगागिरीजी महाराज पुण्यतिथी व महायज्ञाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** ज्ञानोबारायाच्या कृष्णी वेधियली विरहीनी बोंले या गवळणीवरती विवेचन करतांना म्हणाले कि चारही बाजुने पवित्र अशा गोदावरी नदीच्या जलाशयाचे सुरक्षा कवच लाभलेल्या व गोदावरी नदीच्या कुशीत असलेल्या श्रीक्षेत्र सराला बेटाचे नामकरण ‘श्री सद्‌गुरू गंगागिरी महाराज गोदाधाम’ करण्यात आल्याची घोषणा मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी केली. श्री गंगागिरी महाराज यांच्या समाधी दर्शन आणि एक धामाचे पुण्य भाविकांना मिळेल असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी हरिहर महा यज्ञाच्या सांगता काल्याच्या कीर्तनप्रसंगी केले. योगिराज सद्‌गुरू श्री गंगागिरीजी महाराज मंदिर जिर्णोद्धारपूर्वक विविध देवता प्राणप्रतिष्ठा सोहळा व श्री हरिहर महायज्ञ पुर्णाहूती सोहळ्या संप्पन्न झाला. यावेळी महंत रामगिरी महाराज म्हणाले की, सद्‌गुरू गंगागिरीजी महाराज, सद्‌गुरू हरीगिरीजी महाराज, सद्‌गुरू नाथगिरीजी महाराज, सद्‌गुरू सोमेक्षरगिरीजी महाराज, सद्‌गुरू नारायणगिरीजी महाराज या पाचही संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पवित्र अशा श्री क्षेत्र सराला बेटावरील भूमिमध्ये प्रेरणादायी ऊर्जा निर्माण झालेली आहे. अशा गोदावरीच्या पवित्र उदरात आपण आहोत. गोदावरीच्या गोदीत आपण आहोत. गोदावरी मातेने आपल्याला उदरात घेतले आहे. आईच्या गोदीमध्ये जो कोणी असतो, त्याला कधी काहीही कमी पडत नाही. त्यामुळे हे सद्‌गुरू श्री गंगागिरी महाराज संस्थान ‘श्रीक्षेत्र सराला बेट’ या नावाने असलेल्या तीर्थक्षेत्राचे ‘श्री हरिहर महायागा’च्या निमित्ताने ‘गोदाधाम’ असे नामकरण करीत आहोत. ही संकल्पना गुरूवर्य विश्वनाथगिरीजी महाराज यांनी अकरा वर्षापूर्वी व्यक्त केली होती. त्यावेळी त्यांनी गोदावरीच्या उदरामध्ये असलेल्या या तीर्थस्थळाला ‘गोदा धाम’ असे नामकरण करा, असे सांगितले होते. त्यांच्या आदेशानुसार ‘गोदाधाम’ असे नामकरण करीत आहोत, असे महंत रामगिरीजी महाराज यांनी जाहीर केले. या त्यागी ब्रह्मचारी योग्याने ही जबाबदारी नेटाने पेलतांना या तीर्थक्षेत्राचा पूर्णपणे कायापालट करून सर्व समाजाला एकत्रित केले. त्यांच्या निवडीचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे आखाडाचे परमश्रद्धेय कृष्णागिरीजी महाराज यांनी सांगितले.



# एसएसव्हीपीएसमध्ये अग्निवीरांचा सत्कार संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील एसएसव्हीपीएस संस्थेच्या भाऊसाहेब ना.स.पाटील साहित्य आणि मु.फि. मु.अ वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागातील अकरा छात्रसैनिक भारतीय सेनेत अग्निवीर सैनिक म्हणून नुकतेच भर्ती झाले असल्यांने त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. मनोहर तुकाराम पाटील यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. केंद्र सरकारने नुकत्याच अग्निपथ योजने अंतर्गत भारतीय सेनेच्य तीनही दलाकरिता देश पातळीवर भर्ती प्रक्रिया राबविली आहे. मुंबई येथील आर्मी भरती कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या सैनिक भर्ती रैली मध्ये 48 महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या एसएसव्हीपीएस साहित्य आणि वाणिज्य महाविद्यालयातील एनसीसी प्लॉटून क्रंमाक चार व पाच मधील अकरा छात्रसैनिक यशस्वीरित्या अग्निवीर म्हणून भरती झाले आहेत. या छात्रसैनिकांचा देशसेवेत रूजू होण्यापूर्वी महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कारार्थी मध्ये दिनेश शरद पाटील, अभिषेक रमेश गवळे, सतिश संजय पवार, शुभम भीमराव पाटील, गोरख धनराज चव्हाण, नितिन चंद्रशेखर पाटील,



ओंकार धीरज चित्ते, प्रविण संजय बच्छाव, रितेश करणसिंग पवार, हेमराज चतुर बनगर व धनजय रोहिदास धनगर या छात्रसैनिकाचा सत्कार करण्यात आला.

# ज्वारीच्या भाकरीला वाढती मागणी

## भाकरीचे आयुर्वेदिक महत्व वाढले; डॉ. राहुल मेहेत्रे

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** गेल्या अनेक वर्षांपासून सोयगाव तालुक्यात ज्वारीचा धान्य बाजार तेजीत दिसून येतो. गव्हापेक्षा ज्वारीचे भाव वाढले आहे. त्यामुळेच गव्हापेक्षा ज्वारी महाग झाली असल्याचे गृहिणी बोलतात. फर्दापूर येथील हॉटेलमध्येसुद्धा भाकरीची किंमत चपातीपेक्षा जास्त आहे. ज्वारीचा घटता पेरा व आरोग्याला असलेले आयुर्वेदिक लाभ यामुळेच आपसूकच भाकरीकडे अनेक जण वळत आहेत. सध्याच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनशैलीत आहाराला अतिमहत्त्व आले आहे. आरोग्य बंदिस्त होऊ नये याकरिता प्रत्येक जण सतर्क राहतो, त्यादृष्टीनच आहारातील योग्यता पाहता त्याचे सेवन अनेक जण करतात. विशेषतः पोटाचे विकार पचनक्रिया तसेच बदलण्यासाठी अनेकांच्या घरात ज्वारी आणि बाजरीची भाकरी जेवणात वापरतात. सध्या ज्वारीचा भाव वधारल्यानं सर्वसामान्यांची कष्टाची भाकर महाग झाली आहे. बाजारात २० ते ३५ रुपयांपर्यंत दराने एक किलो ज्वारीची विक्री होत आहे. तर, गहू २२ ते २८ रुपये किलोप्रमाणे असल्याचे विक्रेते सांगतात. त्यामुळे गरिबांच्या चुलीवरील भाकर आता श्रीमंतांच्या गॅसकडे फिरताना दिसत आहे. दुष्काळ आणि चालू वर्षी अतिवृष्टीमुळे आणि इतर विविध कारणांमुळे ज्वारीचे उत्पादन कमी झाल्याने ग्रामीण भागातही चूलीवर सर्रास चपाती दिसू लागली आहे. गत अनेक वर्षांपासून ज्वारीच्या उत्पादनात घट झाली आहे, अशातच यावर्षी पावसामुळे ज्वारीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे यापुढील काळात गरिबांची भाकर आणखीनच महागणार असल्याचे चित्र आहे.



### ज्वारीच्या भाकरीचे आरोग्यदायी फायदे

ज्वारीमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने शरीरास पटकन ऊर्जा मिळते . कमी खाऊनही पोट भरल्याची जाणीव होते . ज्वारीमध्ये असणाऱ्या अमिनो ॲसिड्समधून शरीरास मुबलक प्रोटीन्स मिळतात . तसेच फायबर्स असल्याने सहज पचन होते . बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाण्याची सवय लावून घ्यावी . त्यामुळे मूळव्याधाचा त्रास होत नाही . तसेच ज्यांना किडनी स्टोनचा त्रास टाळायचा असेल त्यांनी नक्कीच ज्वारीची भाकरी आहारात आणावी . ज्वारीतील पोषणतत्त्वामुळे किडनी स्टोनला दूर ठेवता येते . ज्वारीमध्ये असणाऱ्या निॲसिनमुळे रक्तातील कॉलेस्ट्रॉलची पातळी कमी होते . तसेच ज्वारीमधील फायटो केमिकल्समुळे हृद्यरोग टाळता येतात . ज्वारीमधल्या पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि मिनरल्समुळे ब्लडप्रेशर नियंत्रणात राहते . भाकरीत लोह मोठ्या प्रमाणात असते . ॲनिमियाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाल्ल्यास त्यांना फायदा होतो . लाल पेशींची वाढ होण्यास मदत होते . या आरोग्यदायी ज्वारीचे फायदे अनेक आहेत .

–डॉ .राहुल मेहेत्रे ( एम .डी .मेडीसन ) मेहेत्रे हॉस्पिटल बुलढाणा





प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# संविधानिक धर्म आणि राजकारण

आधुनिक केसरी

**भारतीय संविधानातील पंचवीस ते तीस ही कलमे आपल्या धर्म आणि संस्कृतीच्या अनुषंगाने आलेली आहेत. आपण धर्माच्या बाबतीत भारतीय संविधान काय सांगते हे न पाहताच मोघम स्वरूपाची विधाने बरेचदा करतो आणि त्यानुसार आपल्या राजकारणाची दिशा सुद्धा ठरवतो. कलम पंचवीस ते अठ्ठावीस हे धर्मस्वातंत्र्याचा हक्क सांगणारी व एकोणतीस व तीस हे कलम सांस्कृतिक व शैक्षणिक हक्काच्या बाबतीत आले आहे. मुळात संविधानाने आपणांस धर्म आणि अनुषंगिक किती स्वातंत्र्य दिले आहे आणि त्याकडे दुर्लक्ष करून कशाप्रकारे राजकारण होत असते, हे पाहणे उद्बोधक ठरेल.**

भारतीय संविधानाने धर्माच्या बाबतीत आपणास किती आणि कोणत्या प्रकारचे अधिकार प्रदान केले, हे पाहण्याअगोदर संविधानाची उद्देशिका आणि त्यात आलेला धर्मनिरपेक्ष हा शब्द समजून घेणे महत्त्वाचे ठरते. बेचाळीसावी घटनादुरुस्ती करून १९७६ साली तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी प्रथमतः समाजवाद आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द उद्देशिकेत अंतर्भूत केले. तोपर्यंत आपण धर्मनिरपेक्ष नव्हतो का? हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. आपल्या उद्देशिकेत लोकशाही गणराज्य, न्याय, स्वातंत्र्य, समानता, एकात्मता आणि बंधुता हे काही महत्त्वाचे शब्द पूर्वीच आलेले होते. या सर्व शब्दांचा किंवा संकल्पनांचा बारकाईने अभ्यास केला तर आपण समाजवादी आणि धर्मनिरपेक्षच होतो, हा अर्थ ध्वनीत होईल. तरीही एकप्रकारची स्पष्टता असावी, थेटपणे कळावे याच उद्देशाने नव्याने दोन शब्द अंतर्भूत करण्यात आले. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ आपण वेगवेगळ्या पद्धतीने घेत असतो. यात सर्वधर्मसमभाव, धर्मसहिष्णूता, राज्याला स्वतःचा धर्म नसणे आणि कोणत्याच धर्माच्या अंतर्गत बाबीत राज्य हस्तक्षेप करणार नाही असे अनेक अर्थ आपण काढत असतो. परंतु आपल्या भारतीय संविधानातील धर्मस्वातंत्र्याचा हक्क या कलमाच्या आधारे अर्थ काढायचा ठरविल्यास तो कसा असेल हे पाहण्यापूर्वी धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचे कलम समजून घेणे इष्ट ठरेल. १. सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य यांच्या व या भागातील अन्य तरतुदींच्या अधिनतेने, सद्सदविवेकबुद्धीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रकट करण्याच्या, आचरण्याच्या व त्याचा प्रचार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत. २. या अनुच्छेदातील कोणत्याही बाबींमुळे - (क) धर्माचरणाशी निगडित असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धार्मिकेतर कार्याचे विनियमन करणाऱ्या किंवा त्यावर निर्बंध घालणाऱ्या ; (ख) सामाजिक कल्याण व सुधारणा याबाबत अथवा सार्वजनिक स्वरूपाच्या हिंदू धार्मिक संस्था, हिंदूंचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खुल्या करण्याबाबत तरतूद करणाऱ्या, कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही किंवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. एवढ्या स्पष्टपणे संविधानाने धर्मविषयक धोरण सांगितले आहे. धार्मिक नीतितत्त्वे आणि भौतिक जगत असा जेव्हा प्रश्न समोर येईल, तेव्हा राज्य भौतिक जगताशी संबंधित कायदा करू शकते. वारीला जाणे धार्मिक असले तरी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्याचा किंवा सुव्यवस्थेचा प्रश्न भौतिक असल्यामुळे राज्य वारीवर निर्बंध आणू शकते. किंवा प्रार्थना अभौतिक असली तरी दानपेटीतील जमा होणारा पैसा हा वित्त विभागाशी निगडित असल्यामुळे त्या पैशाचे काय करायचे हे राज्य ठरवू शकते, तसा संविधानाने त्यास अधिकार प्रदान केलेला आहे. किंवा ईश्वरी तत्त्वाची प्रार्थना अभौतिक असली तरी मंदिर किंवा कोणतेही प्रार्थनास्थळ भौतिक असल्यामुळे तिथे पुजाविधीबद्दल असणाऱ्या पुजाऱ्याची नियुक्ती करण्याचा सर्वस्वी अधिकार राज्याकडे येतो, हे संविधानाने स्पष्टपणे अधोरेखित केले आहे. म्हणजेच धर्मनिरपेक्षतेचे जे विविध अर्थ काढतो, त्यापेक्षा याठिकाणी वेगळा अर्थ संभवतो. तो असा - राज्य तुमच्या अभौतिक स्वरूपाच्या कोणत्याही धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही, परंतु या धार्मिकतेचा संबंध जेव्हा भौतिक जगताशी येईल तेथे कायदा करण्याचा अधिकार राज्याला असेल. हा संविधानाने धर्मनिरपेक्ष या संकल्पनेचा आपणास दिलेला अर्थ होय. आपण जेव्हा संविधान अंगीकृत केलेल्या राज्यात राहून आमचा धर्म आणि धर्मसंस्कार सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहेत किंवा एक जो कोणी आराध्य आहे, त्यासच आम्ही




मानणार. बाकी सर्व गौण आहेत, असे म्हणणे हे संविधानानुसार कायद्याच्या विरोधी आहे, हे आम्हांस समजत नाही. कृपाणे धारण करणे हे संविधानाने शीख धर्माच्या प्रकटीकरणात समाविष्ट केलेले असल्यामुळे इतरांनी कुऱ्हाडी घेऊन फिरता येणार नाही. कारण शीख धर्मीयांच्या शस्त्र बाळगण्यास धार्मिक ठरविले गेले, तसे स्पष्टपणे संविधानात नमूद करण्यात आले आहे. पक्षीय राजकारणाच्या डावपेचात्मक भानगडीत या सर्व बाबींचा विसर पडू लागल्याने आमच्या धर्मावर अन्याय होत आहे किंवा विशिष्ट धर्मियांना झुकते माप दिले जाते, असे बोलले जाते. खरेतर कोणताही धर्म हा राजकारणाचा विषय होऊच शकत नाही. आम्ही जर धार्मिक राजकारण करत असू तर - आम्ही कितीही धार्मिक वगैरे असलो तरी- संविधानविरोधी आहोत, असाच त्याचा अर्थ होईल. कारण आपल्या संविधानाने धर्म फक्त आणि फक्त पारलौकिक गृहीत धरले आहे. असे असताना ऐहिक राजकारण पारलौकिक धार्मिकतेत दखल देणे किंवा पारलौकिकतेचा राज्याच्या अंतर्गत येणाऱ्या गोष्टींवर प्रादुर्भाव पडणे आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी हितावह ठरणार नाही. दोन्ही क्षेत्र वेगळे आहेत आणि दोघांची फलश्रुती सुद्धा भिन्न असल्याने दोन्हींचे संमिलन होत असल्यास राज्याने वेळीच दक्ष होणे मानव्यासाठी हितकारक ठरेल. हे खरे आहे की, संविधानात नसणाऱ्या अनेक गोष्टी होत असतात. जसे की - विरोधी पक्षनेता हे पद संविधानात नाही तरीही विरोधी पक्षनेता आपल्याकडे अस्तित्वात आहे. अल्पसंख्याक कोणास म्हणावे हे संविधानात नसताना आपल्याकडे अनेक अल्पसंख्याक समाज आहेत. तसेच आठव्या अनुसूचित इंग्रजीचा उल्लेख नसताना सुद्धा इंग्रजीचा सर्रास वापर होतो. संसद सदस्यांचे भत्ते किंवा पेन्शनच्या संदर्भात संविधानात काहीच मार्गदर्शन नसतानादेखील सर्वच सांसद एकमुखाने ते वाढवून घेतात. राजकीय पक्ष स्थापन करण्याची कोणतीच प्रक्रिया नसताना आपल्याकडे हजारो राजकीय पक्ष स्थापन होतात. असे एक ना अनेक प्रश्न आहेत, ज्यावर राजकारण होत असते. सध्यातरी संविधानिक धर्म आणि राजकारणाच्या संदर्भात आपणांस गंभीर होणे गरजेचे आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# कठीण प्रसंगाने समाजमन का हेलावत नाही ?

आधुनिक केसरी

**आजही बलात्काराची शिकार होणाऱ्यांमध्ये दलित, मागासवर्गीय, अल्पसंख्याक, कष्टकरी आणि आदिवासी स्त्रियांची संख्या जास्त आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यांतील नफ्याला बांधलेल्या अर्थव्यवस्थेत या स्त्रिया अतिगरीब आणि असंघटित स्तरांत वेगाने ढकलल्या जात आहेत. आपले रोजी-रोटीचे, जगण्याचे घटनादत्त हक्क मागण्यासाठी न्याय्य लढा देणाऱ्या स्त्रियांवर नक्षलवादी म्हणून शिक्का मारून खोट्या आरोपांखाली त्यांना तुरुंगात डांबले जाते. तेथे त्यांचा अनन्वित छळ केला जातो. झणझणीत अंजन घालणारा हा लेख अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत जरूर वाचा...**

स्वातंत्र्यपूर्व व नंतरही समतेच्या आंदोलनाला मनुस्मृती दहनातून पाठबळ मिळाले आहे. १९७०च्या दशकापासून सक्रिय असलेली स्त्री चळवळ अनेक बाजूने वाढली. स्त्रियांवर कुटुंबात आणि कुटुंबांबाहेर होणाऱ्या हिंसेच्या प्रश्नावर काम केले. दलित, मागासवर्गीय, अल्पसंख्याक, कष्टकरी आणि आदिवासी स्त्रीचे आजच्या समाजव्यवस्थेत तिहेरी शोषण होते, ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली. त्यामुळे १९९०च्या दशकात या स्त्रियांच्या प्रश्नांभोवती वेगवेगळ्या संघटना तयार झाल्या. त्याचाच एक भाग म्हणून सन १९९६मध्ये विकास वंचित दलित राष्ट्रीय महिला परिषदच्या डॉ.प्रमिला लीला संपत यांनी चंद्रपूर येथे हजारो महिलांच्या साक्षीने मनुस्मृती दहन दिवस- भारतीय महिला दिन म्हणून जाहीर केला. त्यामागचा विचार असा होता- प्राचीन काळी मनुस्मृतीने स्त्री आणि शूद्र यांना दुय्यम मानले. स्वातंत्र्यानंतर घटनेत वर्ग, वर्ण, लिंग आणि जातिभेदाला नकार देत समतेचे तत्त्व आपण स्वीकारले; पण आजही अनेक बाबतींत घटनेच्या विरोधात जाऊन मनुस्मृतीच्या पाठबळाने असा भेदभाव केला जातो. त्याचे भान जागृत ठेवण्यासाठी मनुस्मृती दहन दिवस आणि भारतीय महिला दिवस यांची सांगड घालायला हवी. त्यामुळे अशा भेदभावाला विरोध करण्याची आपली ताकद वाढेल. हा विचार गेल्या दशकात आपलासा होत आहे. त्याप्रमाणे अनेक शहरांतून या भारतीय महिला दिवशी स्त्री-पुरुष आणि जातिभेदांवर आधारित शोषणाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वळवण्यात येते. मनुस्मृती दहन दिन हा दिवस दलित-बहुजन जनतेद्वारे दरवर्षी २५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. महाड सत्याग्रहानंतर मनुस्मृती या पुरातन विषमतावादी हिंदुग्रंथाचे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दि.२५ डिसेंबर १९२७ रोजी जाहिरपणे दहन केले होते. या घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रतीकात्मक पद्धतीने केलेल्या मनुस्मृती दहनाची आठवण आजही प्रकर्षाने जागी होते.



महाडच्या चवदार तळ्याचा खुला वापर आणि काळाराम मंदिर प्रवेशाचा संदर्भ यामागे होता. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली केलेल्या त्या कृतीतून एकाच वेळी जातिभेद आणि स्त्रीदास्य या दोहोंच्या अंतासाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त झाला होता. मनुस्मृती दहनाची कृती हिंदू धर्मातील भेदभाव आणि शोषणाला समर्थन देणाऱ्या विचारसरणीच्या विरोधात होती. त्यातूनच समता, न्याय आणि परस्पर आदर यावर आधारित समाज तयार होईल, याची बाबासाहेबांना खात्री होती. त्या वेळी भाषणात ते म्हणाले होते, की ज्ञान ही पुरुषांची किंवा कोण्या एका जातीची मक्तेदारी नाही. सर्व जातीतील स्त्री-पुरुषांना ते उपलब्ध असायला हवे. भेदभावाचे समर्थन करणाऱ्या विचारसरणीचा पगडा समाजमनावर आजही आहे. याची अनेक उदाहरणे आहेत. जयपूर न्यायालयासमोर मनूचा पुतळा स्थापन केला आहे. तो हटवण्यासाठी गेली कित्येक वर्षे आंदोलने होत आहेत; परंतु ते दुर्लक्षित राहते. राजस्थान सरकारच्या महिला विकास प्रकल्पात साथी म्हणून काम करणाऱ्या भटेरी गावातील भंवरीदेवीने तिच्या कामाचा भाग म्हणून बालविवाह रोखला; पण ते घर होते उच्चजातीय मुखियाचे. जात आणि वर्ग हितसंबंध डिवचल्याने धडा शिकवण्यासाठी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. दाद मागण्यासाठी कोर्टात गेलेल्या भंवरीदेवीला खोटी ठरवत न्यायाधीश निकालात म्हणाले होते, की खालच्या कुंभार जातीच्या भंवरीदेवीवर उच्च जातीतील ज्येष्ठ ब्राह्मण बलात्कार कसे करतील? या संतापजनक निकालाचा स्त्री आंदोलनाने निषेध केला. तर उच्च जातीच्या समर्थनार्थ समविचारी राजकीय पक्षाच्या पुढाकाराने बलात्कारींचा जाहीर सत्कार केला. ही घटना सन १९९७ची आहे.

आजही बलात्काराची शिकार होणाऱ्यांमध्ये दलित, मागासवर्गीय, अल्पसंख्याक, कष्टकरी आणि आदिवासी स्त्रियांची संख्या जास्त आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यांतील नफ्याला बांधलेल्या अर्थव्यवस्थेत या स्त्रिया अतिगरीब आणि असंघटित स्तरांत वेगाने ढकलल्या जात आहेत. आपले रोजी-रोटीचे, जगण्याचे घटनादत्त हक्क मागण्यासाठी न्याय्य लढा देणाऱ्या स्त्रियांवर नक्षलवादी म्हणून शिक्का मारून खोट्या आरोपांखाली त्यांना तुरुंगात डांबले जाते. तेथे त्यांचा अनन्वित छळ केला जातो. माध्यमांत थोडासा बोलबाला झालेले सोनी सोरी या छत्तीसगढमधील गोंड आदिवासी शिक्षिकेचे अलीकडीलच उदाहरण आहे. दिल्लीत १६ डिसेंबर रोजी झालेल्या निदर्शनात बेलवर सुटलेल्या सोनी सोरीने भाग घेतलेला होता. त्या वेळी ती म्हणाली, "माझे शिक्षण झाल्याने मी अन्यायाची दाद मागण्याचे धैर्य दाखवले. माझी लढाई चालूच आहे; पण माझ्यासारख्या कितीतरी स्त्रिया तुरुंगात डांबलेल्या आहेत. त्यांना आपण कोणता गुन्हा केला, हे माहीतही नाही. त्यांना कोण न्याय मिळवून देणार?" सोनी सोरीने विचारलेल्या प्रश्नाने आपण अंतर्मुख व्हायला पाहिजे. घटनेतील हक्क प्रत्यक्ष मिळवायचे असतील, तर अनेक पातळीवर संघर्ष करायला हवा. या वास्तवाकडे ती आपले लक्ष वळवते. आज सर्व जाती-वर्गातील स्त्रियांच्या आणि पुरुषांच्याही जगण्याला स्वतंत्र भारताच्या घटनेचा आधार असण्याऐवजी त्यांच्या त्यांच्या धर्म आणि जातींच्या अस्मितांचा आधार बळकट होत आहे. समताधिष्ठित समाजासाठी ही धोक्याची बाब आहे.

उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथे सप्टेंबर महिन्यात बहू-बेटी बचाव महापंचायत भरवून, वास्तवाचा आधार नसलेले भडक व्हिडिओ दाखवून समाजात मुस्लिम द्वेष पेटवून दिला. त्यानंतर दंगली घडवण्यात आल्या. त्यामध्ये मुस्लिम समाजातील स्त्रियांवर अमानुष हिंसा करण्यात आली. त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त केली. मुले-बाळे पोरकी झाली. आज मदत छावणीतील कडाक्याच्या थंडीत गारठणारी तीन लेकरांची आई म्हणाली, की तिच्याजवळ एकच कोट आहे. त्यामुळे दर तीन दिवसांतून तो ती एकाला घालते. तेवढीच एक रात्र पाळी-पाळीने ऊब मिळते. थंडीने कित्येक लहानगी मरण पावल्याने नुकतेच न्यायालयाने राज्य शासनाला प्रश्न विचारले आहेत. या गोष्टीने आपले समाजमन का हेलावत नाही, हा प्रश्न जणू ती लहानगी विचारत आहेत. एवढेच नव्हे, तर पंतप्रधान मोदी साहेबांच्या प्रचाराच्या सभेत ज्या सदस्यांवर दंगलीतील सहभागाचे गुन्हे दाखल आहेत, अशांचा सत्कार करण्यात आला. आपले सामाजिक न्याय या संदर्भातील व्यवहार संसदेपेक्षा धर्मसंसदेनुसार व्हावेत, याला दुजोरा देणारी गोष्ट नुकतीच अहमदाबाद येथे घडली. आसाराम आणि त्यांच्या मुलावर झालेल्या लैंगिक शोषणाच्या आरोपामागे षडयंत्र होते आणि याचा निवाडा धर्मसंसद करेल, असे सांगण्यात आले. ही गोष्ट देशातील पोलिस- न्याय यासारख्या घटनादत्त प्रक्रियेला आव्हान देणारी आहे. शिवाय स्त्रियांवर केलेल्या अत्याचारांचे निराकरण करण्याऐवजी तो झालाच नाही, अशी हुक उठवणे गैर आहे. आज वरील संदर्भांची उजळणी करणे अत्यंत निकडीची आहे. समताधिष्ठीत समाजाची आस असणाऱ्या सर्वांसाठी यातून मार्ग काढण्याचे आव्हान आहे. आजचे वास्तव दाहक असले, तरी ते बदलणे आवश्यक आहे. सामान्य स्त्री-पुरुष प्रचंड धैर्य दाखवत वास्तवाला सामोरे जात आहेत. मुद्दा आहे आपण त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा. संकुचित अस्मिता न उगाळता दलित, मागासवर्गीय, कष्टकरी, आदिवासी आणि अल्पसंख्याकांच्या जगण्याचा अर्थ लावण्याचा. सम्यक सामाजिक परिवर्तनासाठी काही गोष्टी सजगतेने करण्याचा. समतेसाठी पितृसत्ताकता, जात-धर्म-अर्थ आणि राजसत्ता या सर्वांबरोबर संघर्ष करण्याचा. हा संघर्ष सर्वंकष होण्यासाठी मनुस्मृती दहन आणि भारतीय महिला दिवस या दोन्हींचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, घनिष्ठ संबंध आहे, हे नक्कीच पटून येते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी


**लियानेलं मेस्सीच्या अर्जेंटिनाने फ्रांसवर रोमहर्षक विजय मिळवत फुटबॉलचा विश्वचषक आपल्या नावे केला. कतारमध्ये पार पडलेली ही विश्वचषक स्पर्धा सर्वार्थाने यशस्वी ठरली. फुटबॉलच्या विश्वचषकात संपूर्ण जग महिनाभर न्हाऊन निघाले. जगभरातील ३४ देश या स्पर्धेत सहभागी झाले होते. अर्थात हे सर्व संघ पात्रता फेरीत विजय मिळवून विश्वचषकासाठी पात्र ठरले होते. विश्वचषक खेळणाऱ्या ३४ संघांची यादी पाहिली तर त्यात घाना, इक्वेडर, ट्युनिशिया, सेनेगल, उरुग्वे यासारखे देशांची नावे दिसतात. हे देश जगाच्या नकाशात शोधायला गेले तर लवकर सापडणारही नाही. अगदी टिंबा एव्हढ्या या देशांची लोकसंख्याही काही लाखांच्या घरात. बरे हे देश प्रगत म्हणावे तर तसेही नाहीत.**

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा



पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# बीज अंकुरे अंकुरे



सुजाता नवनाथ पुरी
अहमदनगर
संपर्क 8421426337

आधुनिक केसरी

**घराघरातून तयार व्हावेत ज्ञानेश्वर अन् तसेच आपुले शिवराय बिजा मिळता योग्य संस्कारधन्य होईल ती माय... आपला भारत देश स्वतंत्र होऊन पंचाहत्तर वर्ष झाली आहेत.या ७५ वर्षाचा आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतोय. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपण सर्वांनी निपुण भारत ची मुलांसाठी आपली कर्तव्य असणारी शपथ ही घेतली आहे.**

घरी जाऊन जरी ती पूर्ण आठवत नसेल तरी ही मुलांना योग्य शैक्षणिक वातावरण आम्ही देऊ,त्यांना त्यांच्यातील विविध कौशल्यासह फुलण्या फळण्यास वाव देऊ अशाच अर्थाची ती प्रतिज्ञा आहे, एवढं जरी सर्वसामान्यांच्या लक्षात राहीलं तरी खूप आहे.

बीज अंकुरे अंकुरे ओल्या मातीच्या कुशीत, कसे रुजेल बियाणे माळरानी खडकात शेतकरी हा तर आपल्या सर्वांचा पोशिंदा आहे. आई जन्म देते पण त्या नंतर आयुष्यभर आपले पोषण,भरण हा पोशिंदाच करत असतो. शेतकरी बिचारा बऱ्याच वेळा निरक्षर असतो मात्र अडाणी कधीच नसतो. आपण मात्र गावातल्या संस्कृतीचे रक्षक असणाऱ्या या साध्या भोळ्या भाबड्या माणसांना अडाणी म्हणून मोकळे होतो. पण त्यांना जे ज्ञान असतं ते आपल्याला नसतं.त्यांचं ज्ञान जीवनाच्या शाळेत शिकत असताना आलेल्या अनुभवातून सिध्द होऊन आलेलं असतं. असा हा शेतकरी शेतात राबत असताना कोणत्या बिजासाठी कोणते वातावरण,कोणते खत आणि कोणती जमीन योग्य असते हे अचूक सांगत असतो. कारण त्याला माहित असते कि बीज अंकुरण्यासाठी ओली माती हवी असते.माळ रानातील खडकात बी रुजणार नाही हे ही त्याला ठाऊक असते.

आपण शिकलेली माणसे मात्र उगाच ज्ञानी आहोत असा आव आणून जगत असतो.आपल्या घरात ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवराय तयार व्हावेत अस सगळ्यांनाच वाटत असतं पण फक्त वाटून काय उपयोग ? त्या लेकरांची वाढ सर्व बाजूंनी व्हावी म्हणून आपण काय करतो याचा कधी विचार केलाय का ? आपलं होत काय कि माझ्यसहीत आपण सगळेच जण मुलांना काही कमी पडू नये म्हणून दिवस भर मरमर अर्थार्जन करतो आणि मुलांना भौतिक वस्तूंच्या रेलचेलित बुडवून टाकतो.



या व्यतिरिक्तही आपली काही कर्तव्ये आहेत हे पार विसरूनच जातो आणि मग आम्हाला नव्हत हो एवढं मिळत हा नेहमीचा डायलॉग म्हणून मोकळे ही होतो. परिणामी आपल्या सर्वांची मुले लाडावलेली, बेशिस्त आणि आपल्या कष्टाची परवा न करणारी तयार होतात. त्यांना आपण गरुड न बनवता पोल्ट्री मधली कोंबडीची पिल्लं बनायला मदत करत असतो. आताच्या या धावत्या युगात प्रत्येक घरात एक अथवा दोन अपत्ये आहेत आणि आम्ही त्यांना तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपत असतो,खरं तर जपत नाही तर त्यांना त्यांचे व्यक्तीमत्व सिद्ध करण्या पासून दूर करत असतो. बिजा हवी निगराणी हवी मायेची पाखर लख्ख प्रकाश निर्मळ त्यात कष्टाचा पाझर हवी अंधार गाडाया चंद्र किरणाची साथ मुलांना जशी प्रेमाची गरज आहे तितकीच गरज शिस्तीचीही आहे नाहीतर -अति लाडाने मूल बिघडते जसे जास्त पाण्याने रोप कुजते रोपाच्या अवती भवती वाढणारी तने रोपाच्या वाढीसाठी मारक असतात म्हणून मुलांच्या मनातील कुविचारांचे तण निगराणी करून काढायला हवे आणि तिथं जाणीवपूर्वक सुसंस्काराचे बीज टाकायला हवे. मुलांचा विकास हा त्यांचे मालक बनून न करता मार्गदर्शक बनून केला तर तो टिकावू,दर्जेदार होतो. म्हणूनच दिव्याभोवती अलगद धरलेली ओंजळ दिव्याला विझण्यापासून वाचवते आणि बळ ही देते. असा असावा आधार देण्याचा दिखावा नको वाटू नये समोरच्याला त्याच्या मनावर भार जाणीव ही होऊ नये आणि उणीव ही भासू नये असा आपला हात मुलांभोवती असला कि मग स्व प्रयत्न करणे मुलांना गरजेचे वाटू लागते. जसा सूर्यप्रकाश गरजेचा असतो तसाच अंधारात शीतल असा चंद्रप्रकाश ही हत्वाचा असतो हे आपण मोठ्यांनी समजून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर मायेची पाखर अति लाडाची नव्हे हे ही समजून घेणे आवश्यक आहे. जंगलातली झाडे कशीही वाढतात.मात्र एखाद्या बागेतील कलात्मक झाडे येण्यासाठी त्यांना वेळोवेळी मशागत आणि देखभालीची गरज असते.फक्त ही देखभाल करत असताना वटवृक्षाचे रूपांतर बोन्साय झाडात होऊ नये हीच अपेक्षा. म्हणूनच सुजाण पालकत्वाची गरज आज समाजाला आहे.

# मोड आलेले शेंगदाणे खाण्याचे अनेक फायदे !

आधुनिक केसरी

मोड आलेले शेंगदाणे खाण्याचे पुरुषांना अनेक फायदे होत असल्याचं दिसून आलं आहे. मोड आलेल्या शेंगदाण्यांमध्ये व्हिटॅमिन, प्रोटिन, फायबर, अँझायम, ॲमिनो ॲसिड यासारखे अनेक आरोग्यपूर्ण घटक असतात.

त्याचप्रमाणे हे मोनोसॅच्युरेटेड फॅट्स आणि इतर अनेक पोषक घटकांनी समृद्ध असतात. जाणून घेऊया, नेमक्या कुठल्या समस्या त्यामुळे दूर होऊ शकतात.

१. पोटावरील अतिरिक्त चरबी

वाढलेलं पोट ही बहुतांश पुरुषांची समस्या असते. मोड आलेल्या शेंगदाण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात फायबर आढळतं. त्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट साफ होतं. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. यात मुबलक प्रमाणात प्रोटिनही असतं. त्यामुळे वारंवार भूक लागण्याचे प्रकार बंद होतात. अतिरिक्त आणि अनावश्यक खाणं बंद झाल्यामुळे वजन कमी होण्याचा वेग वाढू लागतो.

२. मसल बिल्डिंगसाठी फायदेशीर

मोड आलेले शेंगदाणे हे मसल बिल्डिंगसाठी उत्तम मानले जातात. स्नायूंचा आकार वाढवण्यासाठी आणि तो टिकवून ठेवण्यासाठी याची मोठ्या प्रमाणावर मदत होत असते. ज्यांचे स्नायू कमकुवत आहेत, त्यांना ते सशक्त बनवण्यासाठीदेखील मोड आलेल्या शेंगदाण्यांचा चांगला उपयोग होतो.



# जगाला प्रेमाचा संदेश देणारे सानेगुरुजी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारताला निर्मळ विचार आणि निरामय वृत्ती यांची गरज आहे,असे सानेगुरुजी म्हणत. प्रांतीयता, फुटीरता, जातीयता, कडवी आणि अंध भाषिकता हे देशाच्या प्रकृतीशी आणि संस्कृतीशी विसंगत आहे. आपण सारे एक आहोत. सारे प्रांत,भाषा माझे आहेत, आपण सारे भाऊ आहोत, असे ते म्हणत. सर्व भारतीय भाषांचा अभ्यास करणारे आंतरभारतीसारखे नवभारताच्या निर्मीतीचे एखादे मंदिर असावे, असे त्यांना वाटे. 24 डिसेंबर1899 रोजी जन्मलेले पांडुरंग साने एम.ए. झाल्यावर अंमळनेर येथील एका शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले आणि ते साने गुरुजी झाले. त्याचवेळी त्यांनी वसतिगृहाची जबाबदारीही स्वीकारली. तिथे त्यांनी मुलांसाठी अनेक उपक्रम सुरू केले. 'विद्यार्थी' मासिक सुरू केले.**

मुले वाचन,मनन, श्रवण आणि प्रतिपादन यांतून समृद्ध व्हावीत असे त्यांना वाटे. शिक्षणाविषयी सानेगुरुजी यांची एक निश्चित भूमिका होती. ते म्हणत,'शिक्षक हा मुले आणि पुस्तके यांमधला दलाल नसतो, तो पुस्तकातील ज्ञानाचा भार वाहणारा हमाल नसतो, मुलांना जीवनदृष्टी देणारा त्यांचा मार्गदर्शक व मित्र असतो.'

त्यांच्या शाळेत घडलेली एक गोष्ट. एका मामलेदार साहेबांचा मुलगा अभ्यासात बेताचा होता. गुरुजींनी त्याच्या प्रगतीपुस्तकांत नोंद केली,'Weak in study.' साहेबांनी याबाबत गुरुजींकडे विचारणा केली,'मुलगा कच्चा कसा राहतो ?शिक्षक काय करतात ? गुरुजींनी त्यांना उलट विचारले,'मुलगा शाळेत सहा तास असतो. त्याचे पालक काय करतात ?' खरा शिक्षक काय करतो याविषयी गुरुजी लिहितात, 'खरा शिक्षक मुलांना भूतकाळाची कल्पना देऊन, भविष्यकाळाच्या दरवाजापर्यंत आणून ठेवतो. आजपर्यंत जगाने काय केले याची कल्पना देऊन उद्या मानवजातीला काय करायचे आहे,याची सूचना देतो. अशा विशाल दृष्टीचे शिक्षक मुलांना मिळायला हवेत.

सानेगुरुजी 'छात्रालय' नावाचे दैनिक चालवत. त्यात ते मुलांना 'नित्य नवा दिस जागृतीचा' दाखवत असत. त्यात इतिहास असे, समाज दिसे, शिक्षण भेटे, धर्म लाभे. गुरुजींचा हेतू विद्यार्थी घडवणे हा होता. या मुलांचे हात कामसू हवेत, बुद्धी कर्तव्यपरायण व्हावी, मन मोठे व्हावे यासाठी ते सतत प्रयत्नरत होते. मुलांनी आदर्श डोळ्यांसमोर ठेवावा म्हणून त्यांच्यासाठी सानेगुरुजी यांनी अनेक व्यक्तीचारित्रे लिहिली. राणी लक्ष्मी,अब्राहम लिंकन, रवींद्रनाथ टागोर, गौतम बुद्ध, रामकृष्ण परमहंस, संत मीराबाई, संत जनाबाई, देशबंधू अशी कितीतरी देश-परदेशातील आदर्श व्यक्तिमत्त्वे त्यांनी लिहिली. त्यांचा व्यासंग दांडगा होता.



गुरुजी हे एक राष्ट्रीय शिक्षक होते. त्यांच्या आईवर त्यांचे प्रचंड प्रेम होते. आई गेल्यावर त्यांनी मातृभूमीला आपली आई मानले. मातृदेवतेच्या जागी त्यांनी राष्ट्रदेवतेची प्राणप्रतिष्ठा केली होती. देशाची बांधिलकी हे त्यांच्यापुरते सर्वोच्च मूल्य होते. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभाग घेतला. देशसेवेला वाहून घेतले. अनेकदा त्यांना तुरुंगवास झाला,पण ते तिथेही गप्प बसले नाहीत. तिथे त्यांनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. तामिळनाडूतील त्रिचनापल्ली कारागृहात असताना त्यांनी तिरुवल्लूवर यांच्या 'कुरल' काव्याचे मराठीत भाषांतर केले. धुळ्यातल्या कारावासात विनोबा भावे तुरुंगातल्या कैद्यांना गीताप्रवचने देत.ते शब्दबद्ध करण्याचे काम सानेगुरुजी यांनी केले. विनोबा भावे यांचे ते शिष्य बनले. संस्कृत, कन्नड,तेलगू, मल्याळम, हिंदी, बंगाली आदी भाषा ते संपर्कातून ऐकून शिकले. बोलून त्या भाषांचे जाणकार झाले. त्या भाषेतील ग्रंथ त्यांनी मराठीत अनुवादित केले. अटकेत असताना त्यांनी बालगोपाळांसाठीही अनेक पुस्तके लिहिली.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे उराशी बागळलेले स्वप्न पूर्ण झाले. पण आपला नवभारत कसा असावा, याचेही चित्र त्यांनी रेखाटले होते. यावर त्यांनी लिहिले आहे,' भारतात सारे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. द्वेष शमले आहेत. लोक परस्परांची संस्कृती अभ्यासत आहेत. अनेक भाषा शिकत आहेत. विकास करून घेत आहेत. ज्ञानाविज्ञान वाढत आहे. कला फुलत आहे. व्यक्तीस्वातंत्र्यासाठी प्रतिष्ठा राखणारा समाजवाद आला आहे. अज्ञान,रूढी, रोग नष्ट होत आहेत. प्रयोग चालले आहेत. हिमालयावर युवक चढाई करत आहेत. ज्ञानासाठी समुद्राच्या तळाशी जात आहेत. ज्ञानासाठी नचिकेताप्रमाणे मृत्यूशी स्नेह करत आहेत.' देश स्वतंत्र झाला,पण देशभर भ्रष्टाचाराचे, जातीयतेचे, ध्येयशून्यतेचे धुके दाटत चालले. त्यामुळे गुरुजी खचले. आणि शेवटी त्यांनी 11 जून 1950 रोजी आपला देह ठेवला.

# राजकारणातील सुस्कृंतपणा लोप पावला का ?




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**भारतीय घटनेच्या अनुच्छेद १९ नुसार प्रत्येकाला भाषण स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. परंतु अनुच्छेद १०५ मध्ये व १९४ मध्ये संसद विधिमंडळ सदस्यांना भाषण स्वातंत्र्याचा विशेषाधिकार देण्यात आला आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते,यात लोकप्रतिनिधी संसद व विधिमंडळात जनतेचे प्रश्न मांडत असतात. तेव्हा सदस्यांना सभागृहात बिनधास्तपणे बोलण्याचे स्वातंत्र्य आहे. विरोधी पक्ष सदस्य सरकारच्या धोरणावर टीका करू शकतात. आजकाल तर लोकप्रतिनिधीच संसदीय सभ्यता, शिष्टाचाराची पायमल्ली करत आहेत.**

संसद आणि विधिमंडळ नियमाचे,पंरपरेचे,शिस्तीचे पालन करणे, हे लोकप्रतिनिधींनी कर्तव्य आहे.सदस्यांनी बोलताना अपमानकारक, शिवराळ शब्द वापरू नये.अश्या शब्दाची संसदेने व विधिमंडळांनी सूची तयार केली.त्यास"असंसदीय' शब्द म्हंटले जाते.हे केवळ भारतात नव्हे इतर ब्रिटेन,कॅनाडा,आस्ट्रेलिया,बेल्जियम,न्यूजलैंड या राष्ट्रांच्या संसदेतही 'संसदीय' शब्द वापरण्यावर निर्बंध आहेत.तशी 'असंसदीय शब्द' न वापरण्याची परंपरा जुनी व सुमारे ४१८ वर्षाची आहे. ब्रिटेन मध्ये १६०४ प्रथम असंसदीय शब्द" वापरला गेला. तर भारतात पहिला असंसदीय शब्द कोष १९५४ मध्ये करण्यात आला. त्यानंतर १९९६, १९९९, २००४, २००९, २०१०. मध्ये असंसदीय शब्दाची सुमारे १४२० पानाची पुस्तिका काढली गेलीआहे. भाजपा व मोदी सरकारने २०२० मध्ये 'असंसदीय' शब्दांची सूची जाहीर केली. तेंव्हा संसदेत गोंधळ घातला गेला. यात तानाशहा,जुमलाजीवी, जयचंद, बालबुध्दी, अहंकार, दोहरा चरित्र,बहरी सरकार,गुंडो की सरकार, चौकडी व काला दिन, उच्चके, तडीपार, कालादिन,असे शब्द असंसदीय शब्द ठरविण्यात आले.जरी ससंद सदस्यांनी शब्द वापरले तरी ते त्यांच्या भाषणातून वगळण्याचे अधिकार संसदेच्या अध्यक्षाना आहेत. संसदीय परंपरेत सत्ताधारी व विरोधी पक्ष आरोप-प्रत्यारोप करत असतात.पण संसद विधिमडळ सभागृहात सकारात्मक चर्चा करण्याचे माध्यम आहे. केंद्रात २०१४पासून भाजपाचे (एन.डी.ए.) चे सरकार आल्यापासून अनेकवेळा लोकसभा व राज्यसभा गोंधळामुळे स्थगित करावी लागत आहे.हे चित्र निकाप लोकशाहीसाठी अतिशय निराशाजनक आहे. संसदेच्या एका तासाला कामकाजावर १.५ कोटी रूपये खर्च होतात,हा पैसा जनतेचा आहे,याचे लोकप्रतिनिधींना भान आहे काय? संसदेतील गोंधळातून १९८९ मध्ये ६३ खासदारांना एकाचवेळी निलंबित केले होते.२००६ ते २०१४ पर्यंत ५१ खासदाना निलंबन केल गेल.२०१७ ते पुढील संसदीय अधिवेशनापर्यंत एकूण १३९ खासदार निलंबित केले गेले. यातून मोदी सरकारने गोंधळवीर २० सदस्याना निलंबन केल्याचे प्रकरणावरून राजकारण तापले होते. महाराष्ट्र विधिमंडळाने असंसदीय शब्दाची पुस्तिका तयार केली आहे. यात तोंडपाणी, रानडुक्कर, बोकड, गाढवपणा, भडवे, रेडे, सोंगाड्या, कुत्रा नौटंकी, नपुंसक, नुकताच भिकारचोट हा शब्दावरून रॉ.कॉं ने पक्षाने तर मंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी केली होती. दुसकीकडे राष्ट्रवादीला कॉंग्रेसला उध्दव ठाकरे शिवसेनेचे संजय राऊत, कॉंग्रेसचे नाना पाटोले, जितेंद्र आव्हाड, मिटकरी हे राजकीय नेत्यांचे विधाने हे सभ्यपणाचे लक्षण वाटतात, याचे आश्चर्य वाटते. राज्यातील राजकीय नेते टीका करतात का? शिमगा साजरा करत असतात? हेच समजत नाही! सद्या नेत्यात 'असंसदीय शब्द' व शिवराळ व कमरेखालील भाषेचा वापर करण्याचे प्रमाण वाढले आहे.नुकतेच राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी तर महाराष्ट्रात विधानसभेत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील या नेत्यांनी 'अपशब्द' वापरल्यावरून गोंधळ सुरु आहे. कॉंग्रेस पक्षात तर मोदींना शिवराळ भाषेत बोलण्याची परंपरा सुरु झाली आहे. कॉंग्रेस नेते गांधी परिवाराला खूष करण्यासाठी अशी भाषा वापरत असावेत, असा आरोप भाजपा नेत्यांचा आहे. यात पक्षाच्या तत्कालिन अध्यक्षा सोनिया गांधी यांनी २०१४ मध्ये मोदींबाबत 'मौत का सौदागर' हा शब्दप्रयोग केला त्यानंतर कॉंग्रेसचे राजपूत्र राहुल गांधी यांनी तर मोदी विरोधात टीका करण्याची सीमा ओलांडली आहे.याची कॉंग्रेस पक्षाला अजिबात खंत वाटत नाही. यामुळे पक्षातील इतर नेत्यांची जीभ लांबतच चालली आहे. खरगेंनी राजस्थान मधील अलवार सभेत 'स्वातंत्र्याच्या लढ्यात आमच्या नेत्यांनी बलिदान दिले, तुमच्या कुत्र्याने तरी बलिदान दिले काय?' असे वक्तव्य केले तसेच चीनसीमा प्रश्नावरून मोदींना उंदराची उपमा दिली.वास्तविक कॉंग्रेस चळवळ होती, त्यात सर्व विचाराचे पक्ष होते. स्वातंत्र्याच्या लढ्यात पक्षाचा एकही अध्यक्ष व नेता मृत्यू अथवा जखमी झालेला नाही. यात गांधी कुटुंबामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले, असे म्हणणे इतर शहीदांचा अवमान आहे. श्रीमती गांधी व राजीव गांधी यांची हत्या झाकरण्यात आली.या नेत्यांची घटना करणे निंदनीय आहेच. पण



त्याचे राजकीय भांडवल करून शहीद म्हंटले जाते. ते भाजपाचा आक्षेप आहे.कॉंग्रेसने पंतप्रधान मोदीवर शंभराच्यावर 'अपशब्दांचा' वापर केला असावा!. खर तर! कॉंग्रेसच्या या अभद्र शब्दांची 'गिनीज ऑफ वर्ल्ड रिकॉर्ड' मध्ये नोंद करावयाला हवी! पक्षाने मोदीच्या विरोधात एकही प्राणी सोडला नाही. अध्यक्ष खडगेंच्या वक्तव्यावरून राज्यसभेत सत्ताधारी भाजपा सदस्यांनी आक्षेप घेत माफीची मागणी केली,त्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, अशा शब्दात सुनावले. परंतु खरगें यांनी,'मी ते वक्तव्य सभागृहा- बाहेर केले आहे व तो राजकीय आरोप आहेत' असा पवित्रा घेतला. त्यांनी माफी मागण्यास नकार दिला.खरगे यांचे म्हणणे खरे मानले, ते संसदेचे बाहेर बोलले असले तर भारतीय राजकारणात सुस्कृंतपणा आहे की नाही?राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्षाने पंतप्रधानाबाबत असे "अपशब्द' वापरणे हे मुळीच शोभणारे नाही.ते गल्लीबोळातील नेता आहेत काय? राज्यसभेत यावरुन अजूनही सत्ताधारी व कॉंग्रेस सदस्यांत खडाजंगी चालूच आहे. दुसरीकडे महाराष्ट्र विधानसभेत महाविकास आघाडी व सत्ताधारी शिंदे बाळासाहेब शिवसेना व भाजपात कुरघोडीचे राजकारण सुरु आहे, यात सद्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नगरविकास मंत्री असताना नागपूर येथील भूखंड नियमीत केल्याचे १८ वर्षापूर्वीचे जुने प्रकरण उकरून काढले. यावरून शिंदे यांचेवर भ्रष्टाचाराचा आरोप करत राजीनाम्याची मागणी केली गेली. जेंव्हा शिंदे तर मंत्री होते. केवळ यात मुख्यमंत्री शिंदे अडचणीत आणण्याचा डाव जितेंद्र आव्हाड यांनी रचला होता. पण तो बार फूसका ठरलेला आहे!त्यांनी भूखंड वाटपाचा निर्णय लगेचच रद्द करून टाकला. यात त्यांनी भ्रष्टाचार केला असता बचाव करता आला असता. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते शरद पवार यांचेवरही सत्तेत असताना 'भूखंडाचे श्रीखंड' प्रकरण गाजले होते. तेव्हा पक्षाच्या नेत्यांनी कधी नैतिकता पाळली काय? यांची स्मृती गेलेली दिसतेय!आता तर नबाब मलिक,अनिल देशमुख,संजय राऊत यांचेवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत! याच नेत्यांना पक्ष नेते "चारित्र्यवान' म्हंणत आहेत. आघाडीच्या नेत्यांची भ्रष्टाचाराबात भूमिका दुटप्पीपणाची आहे म्हणजे 'आपला तो बाब्या दुसऱ्याच कारट' अशी आहे.सत्ताधारी भाजपा यात मागे नाही. त्यांनी दिशा सॅलियन मृत्यू प्रकरणाच्या पुनश्च चौकशीची मागणी केली. भाजपा सदस्यांनी कोणाचेही नाव घेतले नाही. पण महाविकास आघाडीला नेत्यांना कळाले आणि झोंबले! त्यांनी विरोध तर केलाच व गोंधळ घातला! या प्रकरणात कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस नेते नवीन मित्र पक्ष नेत्याच्या मुलाला वाचविण्यासाठी धडपडत करत आहेत. याचवेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष तपास पथकांमार्फत चौकशीची करण्याची घोषणा केली. यात विरोधी पक्षाचे नेते गोंधळले, त्यांनी यावर बोलू देण्याची मागणी केली.पण अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी मागणी फेटाळली.या गोंधळात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी 'तुम्ही विरोधकांना बोलू देत नाही,असला निर्लज्जपणा करू नका.'या अपशब्दाचा वापर केला. हा शब्दावर पाटील फसले आणि ते भोवले! त्यानंतरच नेते पाटील यांना अधिवेशन कालावधीपर्यंत निलंबित केले गेले.पाटील यांनी 'अपशब्द' वापरला की नाही?हे कोण ठरविणार? बोलीभाषत अपशब्द ही शिवी समजली जाते. धर्मशास्त्रांनुसार अपशब्द वापरणे म्हणजे हिंसा ठरते,ती टाळली पाहिजे.यात निंदापर शब्दात 'अपशब्दा' चा समावेश होतो.जेंव्हा अपशब्द वापरला जातो,तेंव्हा तीव्र शब्दात निंदाच असते. अपशब्द हा रूढी संकेताचा व नीतीकल्पनांचा भंग,असेच सूचित होते.या प्रकरणी विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी सभागृहात संयमाची,सामंजस्याची भूमिका मांडली.पण पाटील ऐवजी त्यांनीच माफी मागितली.या प्रकरणावर पडदा पडला,असे वाटले!पण पवार सभागृहाबाहेर येताच बदलले,!आक्रमक बनले.यावेळी पाटील यांचे बचावासाठी व निलंबन मागे घ्यावे,यासाठी कॉंग्रेस व उध्दव ठाकरे शिवसेना राष्ट्रवादीला साथ देत आहेत. या विरोधी पक्षांनी विधानसभा कामावर बहिष्कार टाकला. विरोधी पक्ष प्रकरणावर "सत्या 'ग्रह करत आहे.नागपूरचे हिवाळी अधिवेशनात राज्य सरकार विदर्भातील प्रश्नावर चर्चा करते व निर्णय घेतअसते. या अधिवेशनात 'राजकारणाचे गजकरण' झाले आहे.संसद अथवा विधिमंडळातील कालचा गोंधळ बरा होता! अशीच म्हणण्याची वेळ आली आहे. यात सत्य व असत्य हे कोण ठरविणार? महाविकास आघाडीच्च्या नेत्यांनी २०२१ मधील घटना विरोधी पक्ष नेत्यांनी स्मरण करावे! विधानसभा अध्यक्षाच्या कक्षेत अध्यक्षाला शिवीगाळ केल्याचे कारणावरून अध्यक्ष भास्कर जाधव यांनी भाजपा च्या बारा आमदारांना एक वर्षासाठी केले होते!तेंव्हा सत्तेची धुंदी होती. त्यावेळी असत्य, अन्याय, लोकशाही शब्दांची जाणीव झाली नाही. हे प्रकरण न्यायालयात गेले व न्यायालयाने घटनेच्या कलम १९० नुसार अधिक काळापर्यंत निलंबन करता येत नाही,अश्या शब्दाने 'कानात तेल ओतले' पाटील यांना अधिवेशन कालावधीपर्यंत निलंबन केले आहे. तेंव्हा विरोधी पक्षांनी उगाच अगस्ताळपणा करू नये! सत्ताधारी व विरोधी पक्ष नेते तडतोड करू शकतात.पाटील यांनी माफी मागितली असते तर प्रकरण तेथेच संपले असते.पण विरोधी पक्षाला याचेही राजकीय भांडवल करावयाचे आहे, असेच दिसतेय! यात विधान परिषदेत उध्दव ठाकरे शिवसेनेने राजकीय ईलटी खेळी खेळली. या सभागृहात उपसभापती नीलम गोऱ्हे या उध्दव ठाकरे सेनेचे आहेत. त्यांनी सत्ताधारी पक्षाची सॅलियन मृत्यू प्रकरणाची मागणी फेटाळली, पण मुंबईतील खासदाराची चौकशी विशेष तपास पथकामार्फत करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले. नागपूरच्या अधिवेशनात दोन्ही सभागृहात सत्ताधारी विरोधात महाविकास आघाडी नेते एकमेकाचे उकरडे उकरून काढत आहेत. महाविकास आघाडीतील पक्षाचे सदस्य 'पन्नास खोके सरकार ओके'असे घोषणा देत होते.तेच शिंदे व भाजपा 'सदस्यानी खंडणीचे खोके महाविकास आघाडीतील बोके' दिले तर मग मात्र मिरच्या लागतील! राज्यातील राजकीय संघर्ष विकापाला जाईल, अशी भीती वाटते! कारण हे शिंदे व भाजपा सरकार कोसळावे ! यासाठी आटापीटा चालू आहे.शिंदे सरकार पडणार ! हे यांचे भविष्य राऊत सांगत आहेत. महाराष्ट्र विधिमंडळातील आमदारांना निलंबन करण्याचा इतिहास पहाता,१९६४ मध्ये जांबुवंतराव धोटे यांना अध्यक्षाच्या दिशेने पेपेरवेट फेकल्याच्यावरुन निलंबित केले गेले होते. १९६६ सीमा प्रश्नावरून गोंधळ घातल्याचे कारणास्तव संयुक्त महाराष्ट्र समितीच्या २० सदस्यांना, तर १९६७ मध्ये ४३. तर १९७३ शे. का.पक्षाच्या २७ आमदारांना, १९७४ ला महागाईच्या प्रश्नावरून गोंधळ घातला म्हणून १७ आमदार, १९८५ मध्ये १३ आमदारांना निलंबित केले गेले.१९९९ ते २०१४ पर्यंत २९ निलंबनाची प्रकरणे घडली.२०११ मध्ये तत्कालिन अर्थमंत्री असताना अजित पवार अर्थसंकल्प सादर करताना भाजपा व शिवसेनेच्या ९ आमदारांना निलंबित केले होत. तेंव्हा कॉंग्रेस राष्ट्रवादी कॉंग्रेसने सत्तेत असताना निलंबनाची परंपरा होती ना!मग आता राजकीय गोंधळ कशासाठी? महाराष्ट्र विधानसभेत आचार्य अत्रे, जांबुवंतराव धोटे, केशवराव धोंडगे, प्रमोद नवलकर, एन.डी पाटील, मृणालताई गोरे, अहिल्याताई रांगणेकर हे नेते मंडळी सरकारवर कडाडून हल्ला करून सभागृह गाजवत असत. पण तेंव्हा सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या नेत्यांनी राजकारणातील सुस्कृंतपणा पाळला. विरोधी पक्षाचा आदर केला, त्यांना कधी शत्रू मानले नाही. अत्रे यांनी तर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नीविषयी अपशब्द वापरला होता,नंतर अत्रे यांनी चव्हाणांच्या घरी जाऊन त्यांची माफी मागितली. चव्हाणांच्या पत्नी वेणूताईंनी अत्रे यांना माफ तर केलच, पण मला एक भाऊ भेटला! असे म्हटलं! वसंतराव नाईक व धोटे हे दोन नेते एकमेकाचे विरोध होते. पण नाईकांनी धोटेंना कधी शत्रू" मानले नाही.धोटेंची आई आजारी असताना नाईक राजकीय मतभेद बाजूला ठेऊन रूग्णालयात भेटण्यास गेले होते. आता राष्ट्रीय पातळीवर व पुरोगामी महाराष्ट्रातील राजकीय नेत्यातील 'सुस्कृंतपणा' मात्र आता लोप पावलेला दिसत आहे.यास सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षही तितकाच जबाबदार आहे.

# भारतीय परिचारिकांना जगभरात मागणी



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**एक उदात्त व्यवसाय म्हणून जगभरात ओळखला जाणारा व्यवसाय म्हणजे परिचारीकेचा व्यवसाय. हा व्यवसाय संयमाने सेवेत समर्पण करण्याची मागणी करतो. परिचारिकांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या कामाचे वातावरण आणि पात्रता पातळीनुसार बदलतात. प्राथमिक स्तरावर रुग्णांची काळजी घेणे परिचारिकांना आवश्यक असते, तर वरिष्ठ स्तरावर परिचारिकांना मनोरुग्ण, मुले, आयसीयू रुग्ण अशा विशेष गटांची काळजी घ्यावी लागते. यासाठी विशेष कौशल्ये आवश्यक आहेत.**

याशिवाय, नर्सिंग कर्मचारी औषधे वाटप करणे, रुग्णांचे अहवाल अद्ययावत ठेवणे, वैद्यकीय उपकरणे बसवणे, प्रशासकीय आणि इतर अनेक कामे देखील करतात. जीवन-मृत्यूशी लढा देणा-या रुग्णाची २४ तास सेवा फक्त परिचारकाच करते. भारतातही परिचारिका न थकता, न थांबता रात्रंदिवस अनेक तास रुग्णांची सेवा करतात, पण त्यांना खूप कमी पगार मिळतो. देशात प्रत्येक परिचारिकेवर ६-८ रुग्णांची जबाबदारी असते. न्याहारी, दुपारचे जेवण किंवा रात्रीचे जेवण वेळेवर करायला कधीच वेळ मिळत नाही. इमर्जन्सी केस असेल तर वॉशरूममध्येही जाता येत नाही. परिचारिकांना पाठदुखी, कंबरदुखी आणि पाय सुजणे हे सामान्य आहे. पण त्यांच्या पगाराबद्दल बोलायचे झाले तर फ्रेशरला फक्त १५ हजार रुपये पगार मिळतो. ५-६ वर्षांच्या अनुभवानंतर पगार ३० हजारांपर्यंत जाऊ शकतो. लष्करी सेवेत काम करणाऱ्या परिचारिकांना तुलनेने जास्त पगार मिळतो. खासगी रुग्णालयांमध्ये काम करणाऱ्या परिचारिकांना तर रोजंदारीवर काम दिले जाते, तर नामांकित नर्सिंग होमकडून त्यांना चांगल्या सुविधा दिल्या जातात. पण परिचारिकेला ना तिच्या कामाची दाद मिळते ना योग्य मोबदला. त्यामुळे परिचारिकेचा हा व्यवसाय सेवाभावी मानला जात असला तरी तरी पालक आपल्या मुलांना डॉक्टर बनवण्याचेच स्वप्न पाहतात. रुग्णालयामध्ये रुग्णसेवेसाठी विविध प्रकारच्या परिचारिका कार्यरत असतात. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व कामाच्या प्रकारानुसार विविध पदांवर त्या काम करतात. परिचारिकेला काम करित असताना तिच्याहून वरिष्ठ व कनिष्ठ परिचारिकांसोबत काम करावे लागते. रुग्णालयात परिचर्या अधिक्षिका किंवा अधिसेविका, उप अधिक्षिका किंवा साहाय्यक अधिसेविका, बालरोगतज्ञ परिचारिका, मनोरोगतज्ञ परिचारिका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, परिसेविका, अधिपरिचारिका, विद्यार्थिनी परिचारिका अशा विविध संवर्गाच्या परिचारिका कार्यरत असतात. रुग्णासाठी रुग्णालय आणि सर्व



रुग्णालयातील वातावरण, त्यात कार्यरत सदस्य हे नवीन असतात. त्यामुळे रुग्ण मानसिकरित्या घाबरलेला असतो. अशावेळी परिचारिका त्याची भीती दूर करून त्याच्या सर्व शंकांचे निरसन करण्याचे महत्त्वाचे काम करते. रुग्णाच्या आजाराविषयी तक्रारी, तब्येतीमध्ये होत असलेल्या सुधारणा, वेळोवेळी होत असलेले बदल डॉक्टरांना सांगते व रुग्ण बरा होण्यामध्ये महत्त्वाचा वाटा उचलते. परिचारिका व्यवस्थापन, पर्यवेक्षण, शिक्षण तसेच रुग्णसेवा अशी सर्व कामे अति कुशलतेने करत, आरोग्य संघातील परस्पर संबंध जपत, संघ कार्य उत्तम रीतीने पार पडते. देशातील विविध संस्था नर्सिंग आणि मिडवाइफरीमध्ये डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम देतात. भारतातील नर्सिंग स्कूलमधून दरवर्षी २ लाखांहून अधिक परिचारिका आपले प्रशिक्षण पूर्ण करून बाहेर पडतात. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या मते, दर एक हजार लोकसंख्येमागे ४ परिचारिका असायला हव्या पण भारतात १००० लोकसंख्येमागे १.७ परिचारिका आहेत. भारतातील बहुतांश परिचारिका केरळमधून येतात आणि केरळमध्ये १०,००० लोकांमागे ९६ परिचारिका आहेत. हे प्रमाण आंध्र प्रदेशात ७४ आणि मिझोराममध्ये ५६ आहे. इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या म्हणण्यानुसार, याचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांची खराब कामाची परिस्थिती आणि भारतात मिळणारा कमी पगार. त्यामुळे येथे शिक्षण घेतल्यानंतर परिचारिका परदेशात काम करण्यास प्राधान्य देतात.परदेशात मात्र भारतीय परिचारिकांना चांगला पगार दिला जातो. त्यामुळे यापैकी ४०-५० टक्के मुली २ वर्षातच करिअर करण्यासाठी परदेशात जातात. भारतीय परिचारिकांच्या जगभरातील मागणीचे एक कारण म्हणजे त्यांची मेहनत. सोबत आपल्या देशातील नर्सिंग शिक्षण हे जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त असल्याने आपल्या देशातील परिचारिकांना विदेशात प्रचंड मागणी आहे. भारतात, जिथे केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या रुग्णालयांमध्ये एमबीबीएस डॉक्टरांचा प्रारंभिक पगार १ ते १.२५ लाख रुपये प्रति महिना आहे, तिथे भारतीय परिचारिका परदेशात जाऊन यापेक्षा कितीतरी जास्त कमाई करत आहेत. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या मते, विकसित देशांतील भारतीय परिचारिका महिन्याला २ ते २.५ लाख रुपये कमावतात. त्यामुळे यापैकी बहुतांश परिचारिका प्रशिक्षणानंतर परदेशात जातात. भारतीय परिचारिकांना अमेरिकेत प्रचंड मागणी आहे. भारतीय परिचारिकांना अमेरिकेचा व्हिसा वगैरे लगेच मिळतो आणि त्यांना त्यांच्या कुटुंबाला घेऊन जाण्याची परवानगीही मिळते. अमेरिकेनंतर भारतातील प्रशिक्षित नर्सेसची मागणी माल्टा, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, नेदरलँड, फिनलंड आणि सौदी अरेबियामध्ये सर्वाधिक आहे. फिलिपिन्सनंतर जगात सर्वाधिक भारतीय परिचारिका काम करत आहेत. म्हणजेच भारताला परिचारिकांचा दुसरा सर्वात मोठा ;निर्यातकर्ता; म्हणणे चुकीचे ठरणार नाही. चांगला पगार आणि स्वच्छ जीवनशैली हे त्यामागचे कारण आहे. आजमितीस ७ लाखांहून अधिक भारतीय परिचारिका परदेशात कार्यरत आहेत. भारतात आताही २४ लाख नर्सिंग स्टाफची गरज आहे. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येसह चांगल्या आरोग्य सेवांच्या वाढत्या मागणीमुळे देशात परिचारिकांची कधीही नसंपणारी मागणी निर्माण झाली आहे. तथापि, या वाढत्या मागणीच्या तुलनेत पुरवठा फारच कमी आहे.

# साहित्यिकांनी महामानवांबद्दल जपून बोलावे




लक्ष्मण जांभळीकर
संपर्क क्र. 8624867272

आधुनिक केसरी

**साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ हे जातीयतेच्या पलीकडचे साहित्यिक आहेत, असा जेव्हा त्यांच्या लेखन कौशल्याचा जागर होतो आणि मग अध्यक्षीय भाषणातून विचार प्रकट करणारी उच्चविद्याविभुषित व्यक्ती माननीय उत्तम कांबळे यांच्या विधानातून अण्णा भाऊ मांडत असताना अलगदपणे अण्णा भाऊंची वाढलेली हिमालयाऐवढी उंची कमी कशी करता येईल, त्या पद्धतीने थोडेफार का होईना प्रयत्न केले गेले.**

तीन व चार डिसेंबर 2022 रोजी कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या संकल्पनेतून प्रगतिशील लेखक संघाचे 11 वे कॉम्रेड अण्णा भाऊ साठे राज्यस्तरीय साहित्य संमेलन नुकतेच औरंगाबाद येथे मोठ्या थाटात संपन्न झाले. तसे अण्णा भाऊंचे साहित्य संमेलने या अगोदर भरपूर झालीत, पण या साहित्य संमेलनातील शिस्तबद्धपणा विविधता अनेक वक्त्यांनी केलेली व्याख्याने आणि कवी संमेलन व नाट्य अभिनय या सर्वच बाबींचा आढावा घेणे शक्य नाही, पण एकंदरीत मनाला भावलेल्या काही घटना या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करत आहे. साहित्य संमेलन सुरुवात होण्याअगोदर एक दिवस दिनांक 2 डिसेंबर शुक्रवार पाच वाजता प्रगतिशील लेखक संघाचे राज्यभरातील सभासद व विविध संघटनांचे प्रतिनिधी साहित्यिक मंडळी यांनी संविधान उद्देशिका अभिवाचन कार्यक्रम राबविला आणि शनिवार दिनांक 3 डिसेंबर 2022 सकाळी आठ ते दहा कविता मार्च महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले पुतळा औरंगपुरा ते संमेलन स्थळापर्यंत राज्यभरातील निवडक कवीच्या कवितांचे खुल्या वाहनावरून सादरीकरण अतिशय जोश पूर्ण आणि उत्तम असे झाले. सकाळी दहा ते साडेदहा वाजता कवी सतीश काळसेकर ग्रंथ दालन उद्घाटन झाले आणि साडेदहा ते एक मुख्य साहित्य संमेलनाचे उद्घाटन हसन कमाल ( ज्येष्ठ उर्दू शायर गीतकार व पत्रकार ) यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले.

उद्घाटन समारंभाचे नियोजित अध्यक्ष माननीय सूर्यनारायण रणसुभे ( ज्येष्ठ साहित्यिक तथा अनुवादक लातूर ) तसेच प्रमुख अतिथी माननीय सुखदेवसिंग सिरसा यांनी उद्घाटन समारंभास संबोधित केले. उद्घाटन समारंभात प्रमुख उपस्थित कामगार नेते डॉ. भालचंद्र कानगो, ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक उत्तम कांबळे, डॉ. जी. के. ऐनापुरे, प्रा. तानाजी ठोंबरे, मा.राकेश वानखेडे उपस्थित होते. दुपारी दोन ते चार वाजता पहिल्या परिसंवादाला सुरुवात झाली. विषय होता साहित्याला चळवळीची गरज असते का ? या विषयाच्या अनुषंगाने मान्यवर सहभागी वक्ते दिलीप चव्हाण नांदेड, संजय बालाघाटे नांदेड, डॉ. विजयकुमार कुमठेकर जालना यांनी अतिशय अभ्यासपूर्ण अशी मांडणी करून साहित्य प्रेमींना वैचारिक मेजवानी दिली. तसेच दुपारी चार ते सातपर्यंत निमंत्रितांचे कवी संमेलन प्रसेनजीत गायकवाड नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. सात ते दहा पर्यंत कामगार चौक राज्य पुरस्कार प्राप्त एकांकिका नाट्यलेखक दिग्दर्शक प्राध्यापक अनिल कुमार साळवे यांच्या कल्पनेतून सुशिक्षित बेरोजगारांच्या हृदयाला पाझर फोडणारी एकांकिका सादर झाली, तसेच शाहीर जलसा आणि अण्णा भाऊंची गाणी सादर करण्यात आली. डॉ. गणेश चंदनशिवे ( मुंबई ) शाहीर धम्मा खडसे, शाहीर अमरजीत बाहेती, शाहीर वसुंधरा कल्याणकर यांच्या भारदस्त आवाजाने तापडिया नाट्यगृह दणाणून गेले होते. चार डिसेंबर 2022 सकाळी 9 ते 10 एक तासाची विशेष अशी मुलाखत जी.के. ऐनापुरे ( सांगली ) विषय भारतीय साहित्य, मराठी साहित्य, डाव्या चळवळी आणि प्रगतिशील लेखक संघ संवाद होते. डॉक्टर सुदाम राठोड, दयानंद कनकदंडे अशा ह्या मुलाखतीनंतर दहा ते बारा पर्यंत दुसरा परिसंवाद विषय कॉम्रेड अण्णा भाऊ साठे आणि वर्तमानकालीन अस्मितेचे राजकारण परिसंवादाचे अध्यक्ष होते. डॉ.महेंद्र कदम टेंभुर्णी डॉ. दत्ता घोलप सोलापूर, डॉ.प्रवीण बनसोड यवतमाळ, डॉ. शिरीष मोरे कोल्हापूर, महादेव खुडे नाशिक यांनी अतिशय महत्त्वाचा विचार मांडला आणि बारा ते एक विशेष व्याख्यान प्राध्यापक रावसाहेब कसबे विषय भारतीय संसदीय राजकारणाची सध्या कालीन दिशा अतिशय अभ्यासपूर्ण आणि विषयाच्या अनुषंगाने केलेले व्याख्यान हे साहित्य प्रेमिना चिंतन करायला लावणारे होते. दोन ते चार तिसरे परिसंवाद विषय होता समांतर सिनेमाने डाव्या चळवळीला फसवले का ? वक्ते डॉ. अनिल सकपाळ ( सातारा ) माननीय प्रशांत पवार मुंबई डॉक्टर बापू चंदनशिवे अहमदनगर आणि परिसंवादास अध्यक्ष म्हणून डॉक्टर मुस्तजीब खान औरंगाबाद हे होते चार ते सहा मुख्य कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



मुख्य कार्यक्रमाच्या साहित्य संमेलनात अध्यक्ष समारोप माननीय उत्तम कांबळे यांनी केला तो असा.....

साहित्य प्रेमिकांना आता वैचारिक मेजवानी अध्यक्षीय समारोपाच्या माध्यमातून मिळेल आणि तशी मिळाली. पण परंतु एकंदरीत दोन दिवशीय विचार प्रक्रियेमध्ये बोलणारी मंडळी तशी प्रचंड विपुल साहित्य संपदा निर्माण केलेली होती आणि आपल्या शब्द सामर्थ्याच्या जोरावर समाज बदलाची दिशादर्शक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणारी होती. हे जरी खरे असले तरी कार्यक्रमाचा अध्यक्ष हा त्या कार्यक्रमाचा गाभा असतो. त्याच्या भाषणातून कोणत्याही व्यक्तीच्या भाव विश्वाला ठेच पोहोचणार नाही, याची खबरदारी घेणारी विधाने होणे अपेक्षित होते, परंतु एकंदरीत इतकी उच्च विद्याभूषित माणसे सुद्धा जात नावाच्या चौकटींना स्पर्श न होऊ देता त्या चौकटीची कोणतीही बाजू कमजोर होणार नाही. याचा जाणीवपूर्वक विचार करून आपली विद्वत्ता सिद्ध करत असतात. ती एक मला जाणवलेली केविलवाणी अवस्था अध्यक्षीय भाषणाची होती. याचे संदर्भ देणे मला अपेक्षित वाटते कारण अण्णा भाऊंच्या साहित्या निर्मितीला तोडच नाही आणि साहित्यनिर्मिती पेक्षाही त्या साहित्याच्या अनुषंगाने समाजाचा केलेला समतावादी विचारच हा समाजाला दिशा देणारा आहे आणि सामाजिक जाण-भान असणाऱ्यांनी तो चांगला आणि त्यांच्या साहित्यनिर्मितीची आणि त्यांच्या आंतरिक ऊर्जेची जाणीव किती महत्त्वाची होती ही जेव्हा समाज म्हणाला पटते. अण्णा भाऊ हे जातीयतेच्या पलीकडचे साहित्यिक आहेत, असा जेव्हा त्यांच्या लेखन कौशल्याचा जागर होतो आणि मग अध्यक्षीय भाषणातून विचार प्रकट करणारी उच्चविद्याविभुषित व्यक्ती माननीय उत्तम कांबळे यांच्या विधानातून अण्णा भाऊ मांडत असताना अलगदपणे अण्णा भाऊंची वाढलेली हिमालयाऐवढी उंची कमी कशी करता येईल, त्या पद्धतीने थोडेफार का होईना प्रयत्न केले गेले. अण्णा भाऊंच्या साहित्याचा मागोवा घेत असताना थोड्याफार का होईना अलगदपणे त्यांच्या व्यसनाचा उद्घोष करायला उत्तम कांबळे विसरत नाहीत. यात ह्या अध्यक्षीय समारोपाच्या तत्ववेत्याची उंची स्वतः कमी करून घेतात याचीही त्यांना जाणीव असते आणि हे वैचारिक भाषण ऐकल्यानंतर माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना निश्चितपणे वाटते की अण्णा भाऊंचे सांगण्यासारखे विश्व एवढे मोठे असताना त्यांच्या व्यसनाचा उल्लेख करून स्वतःचीसुद्धा उंची कमी करून घेण्याची मानसिकता ही कुठून येत असेल ? सर ती केवळ आणि केवळ जातीतूनच येत असते, तेव्हा माझ्यासारख्यांना वाटते की महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की, आपण जातीअंताची लढाई लढली पाहिजे. जाती कमजोर व्हाव्यात म्हणून काम केले पाहिजे, पण उच्चशिक्षित जरी आमचा समाज झाला तरी जात न विसरता जातीचा उल्लेख करून जात समोर आणण्याचे काम करत आहेत, असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा मातंग समाज निश्चितच शैक्षणिक मागास आहे. त्यांच्यात उणीवा असतीलही म्हणून काय समाजाच्या व उणीवा सांगत बसण्यापेक्षा त्या समाजाला किती विश्वासात घेऊन त्यांचे प्रबोधन केले, याचाही विचार करणे महत्त्वाचे ठरते. दुसरी महत्त्वाची गोष्ट प्रस्थापित समाज हा कमजोर आणि अज्ञानी समाजाला हाताशी धरून आपले उद्देश साध्य करत असतो, हे तर बाबासाहेबांच्या काळापासूनही चालत आलेली परंपरा आहे आणि मग एखाद्या जिल्ह्यामध्ये प्रस्थापित समाजाने हाताशी धरून त्या कमजोर जातींना मदत करण्यासाठी त्यांच्या जागा निवडून आणल्या म्हणजे ती माणसे चळवळीस घातक ठरतात असा सूर काढायचा आणि आपल्या समाजाने कोणत्याही युत्या करायच्या आणि मनुवादी प्रवृत्तीच्या लोकांच्या मांडीला मांडी लावून त्यांच्या व्यवस्थेमध्ये सामील होऊन सत्ता उपभोगत असताना बाबासाहेबांची तत्त्व बाजूला सारून आपला स्वार्थ साध्य करायचा त्यांचा नाम मात्र उल्लेखही न करता आपण मातंग समाजाला एखाद्या जिल्ह्यातील मातंग समाजाच्या निवडून आलेल्या जागेचा उल्लेख या ठिकाणी करायला विसरत नाही म्हणून माननीय उत्तम कांबळे जेष्ठ साहित्यिक यांच्या अध्यक्षीय भाषणाचे मला समजलेले विवेचन मी या ठिकाणी मांडत आहे. **(लेखक हे लसाकम औरंगाबाद या संघटनेचे जिल्हा अध्यक्ष )**

# पोवारी संस्कृतीचा आरसा - पोवारी संस्कृती

आधुनिक केसरी

**साहित्यिक ऋषि बिसेन हे भारतीय प्रशासकीय सेवेतील (भारतीय राजस्व सेवा - IRS) २०१० च्या तुकडीचे प्रशासकीय अधिकारी. आपल्या प्रशासकीय सेवेसोबत साहित्य सेवा करणारे एक सर्जनशील साहित्यिक. हिंदी भाषिक वातावरणात वाढलेल्या कवी ऋषी बिसेन यांना आपल्या मायबोली "पोवारी" विषयी विशेष आस्था असल्यामुळे त्यांनी प्रथम विस्मरणात गेलेली पोवारी बोली शिकून घेत पोवारी साहित्य सर्जनाला सुरूवात केली. पोवारी बोली बोलायला आणि लिहायला शिकून लुप्त होवू पाहत असलेल्या पोवारी बोलीला नव संजिवणी देण्याच्या कार्यात ते झोकून देवून काम करत आहेत.**

पोवारी संस्कृति हा कवी ऋषी बिसेन यांचा पहिलाच कविता संग्रह. एखादी विस्मरणात गेलेली बोली शिकून घेत त्यात कविता लिहून त्या प्रकाशित करणारे पोवारी बोलीतील हे पहिलेच साहित्यिक असावेत. महाराष्ट्रातील भंडारा, गोंदिया आणि सिमावर्ती मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट, सिवनी या जिल्ह्यातील मूळ असलेली पोवारी बोली इतर भाषांच्या आक्रमणांत नामशेष होण्याच्या मार्गावर गेली असताना साहित्य सर्जनाच्या माध्यमातून तिचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम आज शेकडो साहित्यिक करत आहेत. त्यातीलच एक प्रमुख साहित्यिक ऋषि बिसेन हे होत. पोवारी संस्कृति या संग्रहाची सुरूवात गणेश स्तुतीने करत कुलदेवी महामाया गढकालिकाला स्मरत कवी लिहितात,

देवीका उपासक आती, आमी क्षत्रिय पंवार माय गढकालिकाला से कुलदेवी, महामाया अवतार नवरात्रीका नव दिवस, होसे मायकी महापूजा पोवार समाज मा उपासी रहोसेत सब ऊजा

पोवारी संस्कृती ही शिवाची उपासक आहे. पोवार समाजात घरोघरी शंकराचे शिवलींग स्थापित असते. 'हर हर महादेव जय महाकाल' या कवितेतून कवीने शिववंदना केली आहे. पोवारी संस्कृती ही शिवपूजक आहे तशी मातृपूजकही आहे. माता गढकालीका कुलदेवी असलेला पोवार समाजात त्यामुळेच नवरात्री सणाला विशेष महत्व आहे.

नवरात्री या कवितेत कवी लिहितात,

***सर्वशक्ती से माय तू करूसू भक्ती मी तोरी।***
***दे वर असो मोला लगायदे नईया पार मोरी।।***
***हर युगमा हर कालमा महिमा से सबदुन तोरी।***
***हर बेटीला दे आपरी शक्ती या आश से मोरी।।***

पोवार वंशाचे पूर्वज सम्राट विक्रमादित्य, योगी भृतहरी, राजा वाक्पती मुंज, महाराज लक्ष्मण देव, महाराजा भोजदेव, महाराज जगदेव पंवार, मालवाधीश भोजदेव या युग पुरूषांच्या कार्य कर्तृवाचा विवेचन कवितांतून कवीने केले आहे.

***'मालवाधीश भोजदेव' या कवितेत कवी लिहीतात,***
***धरम, ज्ञान अना भक्ती का पुरोधा***
***मालवाधीश सेती भोजदेव महाराज***
***धारानगरीको राजा हिंदुत्वको रक्षक***
***चक्रवर्ती सम्राट भोज राजाधिराज***
***भोजदेवन् करी होतीन सदा सत्य, तथ्य***
***ज्ञान की, विज्ञानकी मोठी मोठी***
***खोज***
***जन***
***मानुषका***
***मोठा***
***महानायक***
***आती***
***आमरो***
***पंवारवंशीय***
***महाराज भोजदेव***

या संग्रहातील कविता वाचताना वाचकापुढे पोवार वंशिय महान वंशजांच्या कार्याचा संपूर्ण इतिहास डोळ्यापुढे उभा राहतो.

कवीने या संग्रहामध्ये पोवार समाजाचा सांस्कृतीक वारसा असलेल्या चालीरीती, देवघर, डोकरी पूजा, दीवारी को सन, होरी को सन, मातामाय अशा कवितांतून कविने पोवारी संस्कृतीत सणांचे असलेले महत्व अधोरेखित केले आहे. पोवारी संस्कृती ही सणांतून आपले वेगळेपन जपून आहे. त्याचे दर्शन या कविता संग्रहातील कविता वाचताना घडते. या कविता संग्रहातील १०८ कवितांमध्ये वैविध्यपूर्ण अशा पोवारी संस्कृतीपासून ते पोवारी बोली, पोवारी आदर्श, वीर पोवार, पोवारी संस्कार, कवीचे बालपण, नाती गोती उलगडून दाखवतानाच नवपिढीला व्यसन सोडो, नवी शिक्षा, सुविचारी बनो अशा प्रेरक कवितातूंन जिवनाचा मतितार्थ पटवून देण्याचा प्रयत्न कवीने केला आहे.




कवी पोवारी संस्कृतीचे उपासक असून मायबोली पोवारीवर त्यांचे नितांत प्रेम आहे. त्याचीच प्रचिती त्यांच्या 'लिखो पोवारी बोलो पोवारी' या कवितेतून होते.

***पोवारी बोली पुरखाईनकी बोली,***
***आमरो संस्कार आमरी मायबोली***
***आओ भाऊ आओ बाई सबजन***
***मिलकन गावबिन पोवारी गाना ज्ञान***
***की भाषा, विज्ञान की भाषा***
***पोवार पंवार को अभिमान की***
***भाषा पोवारी पंवारी से स्वाभिमान***
***की भाषा जीवित रहे सदा पोवारी***
***या से अभिलाषा***

पोवार समाज हा वैनगंगेच्या खोऱ्यात वसलेला आहे. सिवनी जाल्ह्यात उगम पावणारी वैनगंगा बालाघाट, गोंदिया करत भंडारा जिल्ह्यातून वाहते. वैनगंगा ही पोवारी संस्कृतीची जीवनदायीनी आहे. मुख्यतः शेती करणारा पोवार समाज वैनगंगेच्या पाण्यामुळे सुजलाम सुफलाम झालेला आहे. अशा या वैनगंगेची महती कवी 'आमरी माय वैनगंगा' या कवितेतून मांडताना लिहितो,

***मुंडारा सिवनीलक जन्मी से पावन नदी वैनगंगा।***
***सिवनीलक बालाघाट को क्षेत्र मा जासे वैनगंगा।।***
***सिवनी लक बालाघाट, गोंदिया लक भंडारा जिला***
***क्षत्रिय संस्कार को रंगमा रंगीसे योव पोवारी किला***

पोवार समाज हा गाव खेड्यांतून वसलेला आहे. पोवारी संस्कृती ही कृषी संस्कृती आहे. परहा की पात, किसान अना गाहनी, उरकुडा, किसानकी सकार, गवतको गठ्ठा, आमरी अमराई, गोहन, रांधन खोली, जूनो घर की खोली, मोरो मित्र बईल, खासरकी बरात, बारा डेरीको मांडो या कविता वाचताना गावगाड्यातील पोवारी संस्कृतीचे दर्शन वाचकाला घडते. कवीचे बालपण गावखेड्यात गेले असल्याने त्यांची ग्रामिण जीवनाची ओढ त्यांच्या कवितांतून दिसून येते. 'गाव को मज्या' या कवितेत कवी म्हणतात,

**गावमा सेती रीति रिवाज गाव सेती देश की शान**
**अमराई, हुडकी गावकी शान खेती बाडी आय हामरी**
**पहचान पोवारी दिससे आमरो गावमा संस्कृती भी बची से**
**गावमा**

शहरीकरणामुळे गावापासून दूरावलेल्या बालकांना गाव दाखवा हे कवी खालील ओळीत लिहीतात,

***धरती को से स्वर्ग हामरो गाव नवी पीढी ला गाव लेय जाव.***

पोवारी संस्कृती ही कुटुंब व्यवस्थेवर आधारीत असल्याने यात नात्या गोत्यांना खूप महत्व आहे. मोरा पुरखा, बडीमाय, माय बापको राखो मान, अजी को अजी, मोरी माय, आजी माय, मोरी फूफाबाई, भाई बहिन को पिरम, बहु बेटी अना बेटा जवाई या कवितांतून कवीने नात्यांचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. या सोबतच कवीने गोलीको खेल, संगी साथी, मोरी प्यारी सायकल, याद आवसे अशा कवितांतून बालपणातील आठवणींना उजाळा दिलेला आहे.

कवी आपल्या कवितांतून ज्याप्रमाणे वाचकाला पोवारी संस्कृतीशी जोडतो तसेच तो नवपिढीला नवी शिक्षा, व्यसन सोडो, सुविचारी बनो, मन को डोरा, जीवनयात्रा, जीवन काजक आय, उठो सोडो आलस्य, नवी दुनिया नवो रंग अशा कवितांच्या माध्यमातून आदर्श जीवन जगण्याची नवी आशा जागृत करतात. १०८ कवितांनी समृद्ध असलेला हा कविता संग्रह पोवारी संस्कृतीचा आरसाच म्हणावा लागेल.

**पोवारी संस्कृती (कविता संग्रह)**
**कवी - ऋषी बिसेन (IRS)**
**प्रकाशक - हृदय प्रकाशन**

- गुलाब बिसेन
9404235191

# अस्थिरतेच्या भोवऱ्यात नेपाळ



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**हिमालयाच्या निसर्गरम्य कुशीमध्ये वसलेले नेपाळ हे हिंदूबहुल राष्ट्र असूनही ते वारंवार राजकीय भूकंपाच्या हादऱ्यांनी दक्षिण आशियाचे लक्ष वेधून घेत आहे. चार वर्षांपूर्वी येथे एक मोठा भूकंप झाला होता. त्यानंतर तेथे अनेक राजकीय भूकंप ही झाले; परंतु नोव्हेंबरच्या अखेरीस झालेल्या सार्वजनिक निवडणुकीचा निकाल समिश्र कौल देणारा असला तरी भारताच्या दृष्टीने आशादायक आहे. कारण पंतप्रधान शेर बहादूर देउबा यांच्या नेतृत्वाखाली पाच पक्षाच्या लोकशाही आघाडीने चांगली कामगिरी केली आहे. त्यानंतर के.पी. ओली शर्मा यांच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या आघाडीला फार जोराची मुसंडी मारता आली नाही. तथापि, राष्ट्रीय स्वतंत्र पक्ष नावाच्या नव्या पक्षाने १० जागा मिळून स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. शिवाय काही स्वतंत्र उमेदवार व छोटे पक्ष यांनी हि हजेरी लावली आहे. सध्या तरी देउबा वआणि पुष्प कमल दहल 'प्रचंड' यांच्या आघाडीची सत्ता येण्याची चिन्हे आहेत; पण प्रचंड आणि ओली हे जर एकत्र आले तर नेपाळी काँग्रेसच्या देउबांना झटका बसू शकतो. पण निवडणूकपूर्व आघाडीची नीतिमत्ता प्रचंड यांनी पाडली तर असा धोका संभवत नाही. ताज्या निकालानुसार जनतेने असा कौल दिला आहे की, भारत व चीन या दोन्ही महासत्ताशी समतोल राखून नेपाळने आपले स्वतंत्र अस्तित्व कायम टिकवावे.**

दहा वर्षापासून होत असलेल्या नेपाळमधील चीनचा हस्तक्षेप आणि भारत विरोधी कारवाया यांना जनतेने चोख उत्तर दिले आहे.

**नो : नॉंट मोर अगेन**

यावेळी चीनमध्ये ६१ टक्के मतदान झाले. मतदारांचा सर्वच पक्षातील जुन्या नेत्यांविषयी व त्याच- त्या चेहऱ्यांविषयी राग दिसून आला. तेथे सोशल मीडियावर नोः नॉंट मोर अगेन् अशी मोहीमच चालविण्यात आली आहे. जुन्या नेत्यांनी आश्वासने पाळली नाहीत, लोकांची कामे केली नाहीत, म्हणून मतदारांचा राग दिसून आला. या धूमचक्रीत सत्ताधारी गटाचे सहा मंत्री पराभूत झाले. टी.व्ही या माध्यमातून लोकप्रिय चेहरा असलेला रबी लिमशोर यांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र पक्षानी आप सारखी हवा तयार केली होती; पण त्याला फारसे यश मिळाले नाही. शहरी भागात काही ठिकाणी या पक्षाने चांगली कामगिरी केली. नेपाळ काँग्रेस व कम्युनिस्ट पक्षाच्या काही जागा त्यांनी घेतल्या असल्या तरी ते मोठा हादरा देऊ शकले नाहीत. जुन्या नेत्यांविषयी असलेला राग मतदारांनी व्यक्त केला. भारतीय मुत्सद्दी रंजित राय यांनी लिहिलेल्या 'काठमांडू डायलेमा' या पुस्तकात येथील जनतेमध्ये असलेला संभ्रम प्रगट केला होता. तो आजही तसाच कायम आहे, असे या समिश्र कौलावरून लक्षात येते.

दिल्लीच्या जे.एन.यु विद्यापीठातील डॉ. खापरियाल ह्या नेपाळवर अभ्यास करणाऱ्या विदूषी आहेत. त्यांच्या मते, नेपाळमधील जनतेला विकास आणि स्थैर्य हवे आहे. नवे सरकार असे स्थैर्य कितपत देऊ शकेल हा खरा प्रश्न आहे.

**नव्या सरकार पुढील आव्हाने**

नेपाळमध्ये देउबा यांचे आघाडी सरकार सत्तेवर येणार अशी चिन्ह आहेत. पण हे सरकार 'होयबा' असे असू नये अशी लोकांची अपेक्षा आहे. नव्या सरकारपुढे प्रामुख्याने पर्यटन विकासाला चालना कशी द्यावी, विस्कटलेली आर्थिक घडी कशी बसवावी, तसेच भ्रष्टाचारावर अंकुश कसा आणावा, समतोल परराष्ट्र धोरण कसे आखावे, असे प्रमुख प्रश्न आहेत. सोबतच अन्न, वस्त्र, निवारा व शुद्ध पेयजल हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. नव्या सरकारने स्वयंभू म्हणजेच स्वतःच्या पायावर काम करावे. चीनच्या औंजळीने पाणी पिऊ नये अशी मतदारांची अपेक्षा आहे. मागील काही वर्षात एकही पंतप्रधान आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. पक्षांतर्गत कटकटी तसेच बहुपक्ष प्रणालीतील लहान-मोठ्या पक्षांची नव-नवीन खेळी यामुळे प्रशासनावर पकड निर्माण करीत असताना सरकारी पक्ष दुबळा होतो. निर्णय घेऊ शकत नाही. यातून अनेक प्रश्नांची मालिका सुरू होते. सत्तेत असलेल्या पक्षाला व नेत्याला हे दृष्टचक्र तोडता येत नाही, ही शोकांतिका आहे.

यक्ष प्रश्नांची मालिका नेपाळ पुढे आज महागाई, भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई, पर्यटन धोरणाचा अभाव असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्था विस्कळीत झाली आहे. निश्चित धोरणाचा अभाव व धरसोडपणा याचा फायदा चीन घेत आहे. चीनच्या वाढत्या जबाबदामुळे कम्युनिस्ट पक्षाचे दोन तुकडे झाले आहेत. आता ते पुन्हा एकत्र येण्याची सुतराम शक्यता नाही. शेर बहादूर देउबा यांना आघाडीतील पाच पक्षाप्रमाणे इतर पक्ष व गटातटांना ही गोंजरावे लागणार आहे. बहुपक्ष पद्धती तसेच संघराज्य प्रणालीमध्ये असलेली प्रमाणबद्ध प्रतिनिधीत्वाची प्रणाली राजकारण अधिक गुंतागुंतीचे बनविते. खालच्या प्रतिनिधी गृहात २७५ सदस्य आहेत. त्यापैकी १६५ सदस्य थेट जनतेमधून निवडलेले असतात. तर ११० सदस्य प्रमाणबद्ध प्रतिनिधी प्रणालीने निवडलेले असतात. प्रांतिक सभागृहासाठी ५५० जागा असून त्यापैकी ३३० थेट जनतेकडून निवडले जातात तर २२० प्रमाणबद्ध प्रतिनिधी प्रणालीने निवडले जातात. पहिल्या सभागृहात नेपाळी काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. याला 'प्रचंड' यांच्या पक्षाचा पाठिंबा आहे. शिवाय काही छोटे पक्ष ही त्यांच्या गडाला लागतील. आणि काही अपक्ष ही त्यांच्या बाजूने कौल देतील. यामुळे २००६ नंतरची अस्थिरता संपून नेपाळमध्ये स्थेर्याची पहाट होईल असे वाटते. १६५जागांसाठी २४ हजार उमेदवार रिंगणात होते. त्यात ८०० अपक्षांचा भरणा होता. जुने नेते आणि नवी पिढी यांच्यात पहिल्यादाचं एवढा मोठा संघर्ष दिसून आला.




सामान्य मतदाराने दर्जेदार शिक्षण, जबाबदार आरोग्यसेवा व पूर्ण रोजगाराची मागणी केली आहे. विविध प्रदेशातील विविध गटाने वेगळा कौल दिला आहे. सी. के. राऊत यांचा 'जनमत' हा पक्ष चार जागा मिळवू शकला. 'नवा धारू' हा पक्ष आदिवासी भागात चांगली कामगिरी करू शकला. स्वतंत्र पक्षाकडून ही लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

**नव्या सरकारकडून अपेक्षा**

देउबा यांनी यापूर्वी ही पाच वेळा पंतप्रधानपद भूषविले आहे. त्यांना राजकीय कामाचा चांगला अनुभव आहे. तथापि, साम्यवादी दबाव गट व दोन्ही पक्षातील फुटीर नेते यांच्याशी तडजोडी करत त्यांना काम करावे लागणार आहे. नेपाळमध्ये पर्यटनाला खूप चांगला भाव आहे ; परंतु दहशतवाद आणि अस्थिरतेच्या भितीमुळे पर्यटनाची संख्या रोडावत आहे. नव्या सरकारला ठोस पर्यटन धोरण आखावे लागेल व ते अंमलात आणावे लागेल. शिक्षण, आरोग्य व रोजगार यावर विशेष भर द्यावा लागेल. तसेच निराश झालेल्या तरुणांसाठी वचनपूर्तीचे राजकारण करून विकासाची हमी द्यावी लागेल. भारत-नेपाळ संबंधाचा विचार करता भूकंपग्रस्त नेपाळला भारताने वळोवेळी भरघोस मदत केलेली आहे. भारत-नेपाळ यांच्यातील व्यापार व सांस्कृतिक संबंधाला नवी उंची गाठवायची आहे. भारत-नेपाळ दरम्यान कृषी, आरोग्य, शिक्षण संस्कृती व पर्यटन या क्षेत्रात नवे प्रकल्प आखावे लागतील. करोना महामारीच्या काळात हि भारताने नेपाळला खूप मदत केली आहे. आता भारत- नेपाळ दरम्यान जल व ऊर्जा प्रकल्प आखले जात आहेत. त्यामुळे नेपाळ हा भारत आणि बांगलादेशाला ऊर्जा पुरवठा करू शकतो. तसेच भविष्यकाळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारत-नेपाळ यांच्यातील सहकार्याला मोठी संधी आहे. चीनची लुडबुड कमी करून भारत आणि भारतीय उपखंडातील देशात अधिक दृढ संस्कृती व व्यापारी संबंध नेपाळला प्रस्थापित करावे लागतील.

नेपाळचे राजकारण साम्यवादाकडून पुन्हा लोकशाहीकडे वळत आहे. नेपाळी काँग्रेसला लोकांनी दिलेली पसंती म्हणजे भारताशी मैत्री व स्नेहाचे संबंध ठेवावे, म्हणून दिलेला कौल आहे. वरवर पाहता नेपाळ मधील हा राजकीय कौल समिश्र वाटत असला, तरी हे भारताच्या म्हणजेच नेपाळी काँग्रेसच्या बाजूने आहे. असे लक्षात घेतले पाहिजे. भविष्यकाळात नेपाळने आपल्या नैसर्गिक साधन सामुग्रीचा शाश्वत विकासासाठी चांगला उपयोग करून नवे परिवर्तन घडविले पाहिजे. दोन आघाड्यांमध्ये सत्तेसाठी कुरघोडी असल्याचे दिसून येते; परंतु प्रशासकीय दृष्टीने विचार करता नेपाळी जनतेने तडजोडीचे राजकारण पसंत केले आहे. देउबा सरकारने हवेत चालू नये जमिनीवर राहून विचार करावा आणि भारत-नेपाळ यांच्यात सहकार्याचे नव्हे युग निर्माण करावे. असे झाले तर निवडणुकीत व्यक्त झालेल्या लोकांच्या आशा- आकांक्षा अधिक सफल होऊ शकतील. नेपाळ मधील अस्थिरता नाहीशी व्हावी, या अस्थिरतेच्या भौऱ्यातून नेपाळने बाहेर पडावे, लोकांना स्थिर व जबाबदार सरकार द्यावे, अशी अपेक्षा आहे.

हिमालयाच्या कुशीतील हे हिंदू राष्ट्र २००६ नंतर लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र बनले आणि तेथील नियंत्रित राजेशाहीचे वैभव संपले. भविष्यकाळात नेपाळ सरकारला अनेक अडचणी व आव्हानांना सामोर जावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'आदर्श समाज हा सतत गतिमान असतो. अशा समाजामध्ये अनेकविध विचार वाहिन्या कार्यरत असतात. त्यामुळे अशा सर्व वाहिन्यांना एकत्र आणून समाजात बदल घडवून आणावा लागतो, असे परिवर्तन घडवितांना समाजाचा एका भागातून दुसऱ्या भागाशी प्रभावी संदेशवहन करावे लागते'. नेपाळी समाजातील संपर्क तुटला आहे. सामाजिक समरसतेला पोषक अशा संदेशवहनाचा अभाव असल्यामुळे नेपाळमधील लोकशाही अंधारात चाचपडत आहे. जर तेथील समाजाने सामाजिक आर्थिक परिवर्तनाचा मार्ग लोकशाही पद्धतीने अनुसरला तर नेपाळ अस्थिरतेच्या भोवऱ्यातून बाहेर पडू शकेल व आपल्या शेजारी राष्ट्रात विकोप लोकशाही नांदू शकेल. राजकीय व्यवस्था बदलली तरी नेपाळचे आर्थिक स्थिती मात्र सुधारलेली नाही. त्यामुळे तेथील मतदारांनी स्थैर्याकडे कौल दिला आहे. सततच्या राजकीय उलथापालतीमुळे नेपाळची अर्थव्यवस्था मंद गोगलगायीच्या अवस्थेला पोचली आहे. आता तिला कसे गतिमान करावयाचे हा देउबा यांच्यापुढे यक्ष प्रश्न आहे.

# कथा : रेशमी नात्यांचा बस्ता



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

**रामपुर नावाच्या गावात तात्या आणि बायडाबाई नावाचे जोडपं राहत होते. आपल्या छोट्या शेतात काबाडकष्ट करत. स्वभावाने गरीब,पटकन मदतीला धावून येणारे जोडपं, आपण भलं आपलं काम भलं यानुसार चालणारे,पण पोटी मुल नाही याची सतत खंत वाटत असे... रामपूरच्या जत्रेत एक दिड दोन वर्षांचा मुलगा हरवतो.. तो रडत बसलेला असतो. तेवढ्या गर्दीत बायडाबाईंना आई समजून घट्ट मिठी मारतो . त्यापण त्याला माया लावतात,प्रेमाने उचलून घेतात. चौकशी करतात पण कुणीच त्याला आपला म्हणत नाही म्हणून घरी घेऊन जातात. काळजीपूर्वक सांभाळ करतात.असं करत करत महिना होतो. एकेदिवशी चौकशी करत करत त्या मुलाचे आईवडील तात्यांच्या घरी येतात .**

तिथं हरवलेला आपला मुलगा त्यांना सापडतो त्यांचा आनंद शब्दात न मांडणारा.....ओळख पटवून त्याला त्यांच्याकडे सुपूर्द करतात.

तात्या आणि बायडाबाईंचा पण त्यांच्यावर जीव जडतो. पण दुसऱ्याचं पोरं ,ज्याची त्याची अमानत ! ह्या विचाराने डोळे पुसत कामाला सुरुवात करत.

पोरगं जिव लावून गेलं ! लेकाची मायाच वेगळी! शंभर वेळा आभार मानत मुलगा त्याचे आईवडील परत आपआपल्या घरी निघून जातात. शहारात आलात की नक्की या ! त्यांचं शहरात कापडदूकान असतं. पत्ता, फोन नंबरची देवाणघेवाण होते.....

पण तात्या कधीच त्याचा वापर करत नाहीत. बायडाबाई पण त्याची फक्त आठवण करून गप्प बसायच्या......दिवस.महीने, वर्ष लोटतात.....

तो मुलगा जत्रेत जेव्हा सापडतो त्यानंतर बायडाबाईंना दिवस राहतात. मुलाच्या पायगुणामुळे दिवस राहिले यांचा खुप आनंद होतो.

यथावकाश त्यांना मुलगी होते.चंद्राच्या कोरीप्रमाणे लेक हळूहळू मोठी होते. कविता लग्नायोग्य होते पोटाला चिमटा काढून ,पै पै करुन लाडक्या लेकीच्या "कविताच्या" लग्नासाठी तिची हौस मौज सगळं सगळं करायचं म्हणून दोघं राबत होती.....

कविता मोठी व्हायला लागली तसतशी दोघांच्या मनाची उलघाल सुरू झाली....लेक दुसऱ्या घरची ठेव.... वेळ आली की तिची बोळवण करायची.... पोटचा गोळा लाडाकोडात वाढवून दुसऱ्याला देऊन टाकायचा हि जगराहटी आपण पण पाळायची ह्या विचाराने मन अस्वस्थ व्हायचे पण विचारांना मागं टाकून पुढे जायचं हा रोजचा दिनक्रम असणारे साधं सरळ विचार करणारं जोडपं......

कविताच्या मामाच्या ओळखीतून कविताला छान स्थळं आलं... नाकी डोळी नीटस असणारी कविता श्रीरामला पसंत पडली. सुपारी फुटली,तारीख ठरली.... याद्या झाल्या,बस्ता बांधायची वेळ झाली.



तात्या, बायडाबाई, श्रीराम त्याचे आईबाबा, अजून चार पाच जण असा लवाजमा शहरातल्या मोठ्या प्रसिद्ध दुकानात पोहचला . नवऱ्यामुलाची खरेदी सुरू झाली खाणाखुणा, नजरानजर ह्याचबरोबर रंग, कपड्यांचा पोत , सलवार, कुर्ता,सफारी , अश्या नानाविध प्रकारने पसंती करून खरेदी झाली.

व्याहीविहीणीची खरेदी जोरकस खरेदी करून झाली.....

कविताच्या साड्या खरेदी सुरू झाली. आवडलेली साडी नेसवल्यावर तिचं लक्ष श्रीरामकडे....... हळूच हि नको... हि घे असं , तो जणू सांगत होता हा रंग तुला छान दिसेल हा नको.....असं करत करत मोरपंखी पैठणी, जांभळ्या रंगाचाबनारसीशालू, गुलाबी घागरा,हळदीची पिवळी साडी, हिरव्यारंगाची खणाची साडी, अश्या सात आठ साड्या घेऊन झाल्या. बायडाबाईंच लक्ष मात्र किंमतीच्या स्टिकर्स वर परत परत जात होतं .

लेकीच्या लग्नाचा बस्ता बांधताना बायडाबाईंना एक हिरवीगार मोठ्या काठाची साडी मनापासून आवडली होती त्या खरेदीला येताना मनात ती साठवून आल्या होत्या..... एकुलत्या एक मुलीच्या लग्नात तात्यांना सफारीत आणि त्यांना मोठ्या काठाची हिरवीगार साडी नेसलेली असा फोटो काढायचा असं मनोमन ठरवून त्या आल्या होत्या....

लेकीच्या साड्या खरेदी झाल्यावर मनात योजलेला आकडा पार पुढं निघून गेला हे केव्हाच त्यांच्या लक्षात आलं.... हौसेला मोल नाही! त्यातल्या त्यात लेकीची हौसं मग बोलायला नकोच ! आईबापाची माया असते कस्तुरीसारखी न दिसणारी पण सतत जाणवणारी असं काहीसं तात्या आणि बायडाबाईंच!

पण लाडक्या लेकीच्या लग्नात तिच्या सर्व ईच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्या मनाला मुरड घातली परत केंव्हातरी ही साडी घेवू अस मनात ठरवत बिल देण्यासाठी म्हणून काऊंटर वर दोघेही नवराबायको पोहोचले....

सगळं सगळं व्यवस्थित पॅकिंग करून दिल्याबद्दल दुकानदारचे आभार मानत बिलाचा आकडा बघितला.... तात्यांनी खिशातला रुमाल काढून घाम पुसत पैशाचे बंडल काढून मोजत असताना पाठीमागून एक मुलाने तात्यांचा हात धरला आणि बिलाचे पैसे द्यायचे नाही असं सांगितलं....... तात्या गडबडले नाही नाही म्हणू लागले...... तात्या आणि बायडाबाईं त्या मुलाला निरखून पाहत होते..... त्या मुलाच्या पाठीमागुन आवाज आला

" तात्या मुलाला सांभाळलेले पैसे पण सांगा.....

मुलाच्या वडिलांना पाहताच तात्यांना ओळख पटली. त्यांनी तात्यांची गळाभेट घेतली. हा अतुल तुम्हाला सापडलेला मुलगा अशी ओळख करुन देत म्हणाले .

अतुलने ती मोठ्या काठाची हिरवीगार साडीची पिशवी बायडाबाईंच्या हातात देऊन त्यांना नमस्कार केला...... कृत्यकृत्य भावनेने डोळ्यात धारा कधी सुरू झाल्या ते कळलेच नाही......

# स्वानंदी: विचारप्रवृत्त करणाऱ्या कथा




सुलेखा जक्कल
संपर्क क्र. ९२७००६४७२९

आधुनिक केसरी

**श्री व्यंकटेश देवनपल्ली यांच्या लघुकथा दै. संचारच्या रविवारच्या 'इंद्रधनु' पुरवणीत अधूनमधून वाचलेल्या आहेत. 'इंद्रधनु' या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहातील विविध छटा असलेल्या विविधरंगी कथा वाचलेल्या आहेत. त्याच लेखकाची "राजाधिराज श्रीकृष्णदेवराय" ही रसाळ प्रदीर्घ कादंबरी मंत्रमुग्ध करून गेली. आता नुकताच प्रकाशित झालेला 'स्वानंदी' हा कथासंग्रह. प्राप्त परिस्थितीत स्वत: आनंदी राहून इतरांना त्या आनंदात सामील करून घेणाऱ्या कथा आहेत असे म्हणता येईल.**

पहिलीच कथा 'प्रेमाने मन जिंकावे..' यात सासऱ्यांने आपल्या सुनेच्या कर्तृत्वाविषयी बोललेले शब्द कसे संजीवक ठरतात आणि पुढे जाऊन ती सून आपले कर्तृत्व कसे सिद्ध करते ह्याचे कथन खूपच प्रेरणादायी आहे. तिथून पुढे एकामागून एक मन प्रसन्न करणाऱ्या आशावादी कथा उलगडत जातात. स्वावलंबनाचे लेणे या कथेत मुलांच्या संसाराचा एक भाग होऊनही स्वावलंबी जीवन कसे जगावे ह्याचे मार्गदर्शन आहे. 'आय लव्ह यू पप्पा' या कथेत एका पित्याचे आपल्या मुलींच्यावरचे हळुवार व्यक्त झालेले प्रेम आणि मुलावरचे अव्यक्त प्रेम वाचताना गलबलून व्हायला होते. इच्छापत्र या कथेत दत्तक मुलगा व स्वतःची अपत्ये यात अखेर कोण जवळचा होतो ह्याची उत्सुकता लागून राहते. फक्त लढ म्हणा, या कथेत एक दार बंद झाले तर दुसरे दार उघडले जाते हा आशावाद आहे. साथीदाराचा विश्वास व स्वतःवर असलेल्या विश्वासाच्या जोरावर, कुठल्याही परिस्थितीतून कसे सावरता येते, हे कळून येते. 'अंजन' ही कथा यशाच्या पायऱ्या पादाक्रांत जाताना स्वतःच्या तब्येतीकडे डोळेझाक करणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. नाण्याची दुसरी बाजू या कथेत तरुण आणि वृद्ध यांच्यातील छुपा संघर्ष आहे. विशेषतः वृद्धांना विचार करायला करणारी आहे. 'सहजीवन' ही विचारांच्या परिपक्वतेची आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करणारी कथा आहे. म्हातारपणातील एकाकी जीवनात सहजीवनाचा उपाय सुचविण्याचे लेखकाने धाडस दाखवले आहे. विजय सुदाम भाटकर या कथेत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत, कष्टाच्या जोरावर जनरल मॅनेजर पदापर्यंत पोहोचण्याचा प्रेरणादायक प्रवास आहे.

अष्टभुजा या कथेत शिक्षिका आणि गृहिणी या भूमिकेत तारांबळ उडालेल्या एका स्त्रीची विलक्षण कथा आहे. तिच्या आजारपणात पती व मुलांचे सहा हात मदतीला येऊन ती कशी अष्टभुजा होते त्याचे सुंदर सादरीकरण ह्या कथेत आहे. विशेषतः नोकरी करणाऱ्या स्त्री वाचकांसाठी 'नवा उत्साह व नवी उमेद' देणारी सुंदर कथा आहे. विकलांग पती व नोकरीतील समस्या या गोष्टी जीवनाचा भाग बनवत विनातक्रार आयुष्य कसे सुंदर करावे, कसे फुलवावे याचे सुंदर कथन आहे. दीपज्योती या कथेत एका वचनबद्ध आणि कर्तव्यदक्ष ज्योती या मोठ्या बहिणीची कथा आहे. वडिलांना दिलेल्या शब्दाखातर ती आपल्या प्रेमाचा बळी देते. अखेर दीपक आणि ज्योती या प्रेमींचे मिलनाने सुखांत होतो. लग्न जुळत नसलेल्या मुलीच्या पित्याची घालमेल 'जुळून आल्या रेशीमगाठी या कथेत पाहायला मिळते. शेवटी कन्येच्याच पसंतीच्या मुलाशी लग्नाचा प्रस्ताव आल्यानंतर अख्खे घर कसे आनंदी होते. आंबटगोड नातं ही कथा वाचताना एका वृद्ध जोडप्याचे मुरत गेलेले नाते, त्यांची लुटुपुटीची भांडणे आणि त्यातून ते एकमेकांची काळजी घेणे ह्याची प्रसन्न मांडणी आहे. 'श्रीमंताची लेक', 'एकवचनी' आणि 'धैर्यलक्ष्मी' या कथेतील नायिकांची भूमिका त्यांनी केलेली कर्तव्ये पाहून कुठल्याही स्त्रीला 'स्त्री' असल्याचा अभिमान वाटेल हे मात्र नक्की.



स्वतः आनंदी राहून इतरांच्या जीवनात आनंद फुलविणाऱ्या स्वानंदी ही शीर्षककथा वाचताना हळदीकुंकू या कार्यक्रमातील लेखकाचे सूक्ष्म निरीक्षण वाखाणण्याजोगे आहे. स्वानंदीचा जीवनविषयक दृष्टिकोन किती साधा आणि सरळ आहे. सौजन्य कथेत तुम्ही जर सौजन्य दाखवलंत तर तेच सौजन्य कुठल्या ना कुठल्या रूपात तुमच्या जीवनात फिरून येतं हेच लेखक पटवून सांगतात. 'जामीनदार' कथेत पलानीस्वामीसारखे उदात्त व्यवसायी भेटतात. 'आधार' आणि 'मला माफ करा' या दोन्ही कथा वृद्धांच्या व्यथा मांडणाऱ्या आणि भावनेने ओथंबलेल्या आहेत. कर्तासवरता या कथेत ज्या मुलाला वडिलांनी नाकर्ता ठरवलं होतं, तोच मुलगा कुटुंबाच्या पाठीशी कसा ठामपणे उभा राहतो हे प्रत्यक्ष वाचायलाच हवे.

एकापेक्षा एक सरस आणि वैविध्याने नटलेल्या एकंदरित एकोणतीस कथा वाचताना 'स्वानंदी' हातातून खाली ठेववत नाही, इतके हे कथालेखन सहज आणि सुंदर झाले आहे. मुखपृष्ठ कथासंग्रहाच्या नावाला साजेसेच आहे. या कथासंग्रहातील कित्येक पात्रे आत्मपरीक्षण करत सकारात्मक बदल करत स्वतःचा विकास घडवून आणतात. आजच्या गतिशील जीवनशैलीमुळे उदभवणारे ताणतणाव आणि एकमेकांना समजून न घेतल्यामुळे, त्यांच्यातील गुणदोषांसह न स्वीकारल्यामुळे कुटुंबातील स्त्रियांची, मुलांची, आणि वृद्धांची होणारी कुचंबणा या साऱ्यांचे चित्रण आढळून येते. परंतु तो गुंता कसा बेमालूमपणे उकलता येतो ह्याचे मार्गदर्शनही कथेच्या उत्तरार्धात वाचकाला वेगवेगळ्या व्यक्तिमत्वातून, प्रसंगातून घडते. स्वानंदीच्या प्रत्येक कथेतून, संवेदनशील घटनांच्या आधारे लेखक वाचकाला सुजाण करतात. एकमेकांविषयी आस्था, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम ही जीवनमूल्ये जपण्यात, समजून घेण्यात जीवनाचं देखणेपण आहे हे लक्षात येते. प्रत्येक कथा वाचताना वाचक नकळत विचार करायला प्रवृत्त होतो हेच या लेखकाचे खरे यश आहे. स्वानंदीतील सगळ्याच वास्तववादी कथा या वाचकांच्या मनामनांत घर करतील, मनमुराद आनंद देतील हे मात्र निःसंशय!

**स्वानंदी : लघुकथा संग्रह पृष्ठ संख्या: 208. मूल्य: रू. 350/-**
**प्रकाशक: स्वरूपदीप प्रकाशन, सोलापूर. मोबाईल क्र. 93250 57657.**

# पुस्तक: 'महर्षी वाल्मिकी' लेखक - विश्वास विष्णू देशपांडे

आधुनिक केसरी

**विश्वास सरांनी लिहिलेले आणि सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन, पुणे द्वारे नुकतेच प्रकाशित झालेले त्यांचे पुस्तक 'वाल्मिकी' वाचले. पुस्तकाचे नितांतसुंदर मुखपृष्ठ बघताक्षणी पुस्तक वाचायची अशी काही ओढ लागली की, ते पूर्ण केल्यावाचून गत्यंतर नव्हते. वाल्मिकी म्हणजे रामायणाचे जनक, इतक्या जुजबी माहितीच्या पार्श्वभूमीवर सुरुवात केली अन, पुस्तक वाचल्यावर मात्र जाणवले की युगानुयुगे रामायणाचे पठण, मनन आणि चिंतन करावयास प्रेरणा देणाऱ्या या आद्य महाकवींबद्दल आपले ज्ञान फारच तोकडे आहे. म्हणूनच महर्षी वाल्मिकींविषयी सखोल, उद्बोधक आणि विश्वासार्ह्य माहिती देणारे हे पुस्तक अतिशय महत्वपूर्ण आहे!**

आधुनिक केसरी

या पुस्तकाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याचे सुंदर सादरीकरण. सरांची खासियत असणारी ओघवती, साधी, सरळ अन सोपी भाषा या पुस्तकात देखील कायम आहे. विषयवस्तू मांडण्याची हातोटी अतिशय उत्तम! यात मुख्यत्वेकरून आहे वाल्मिकींचा प्रथम परिचय. चित्रपटासारख्या फ्लॅशबॅक तंत्राने रत्नाकराचा करून दिलेला परिचय मला खूप भावला. कथानकातील औत्सुक्य कायम ठेवतानाच, रामकथेचा थोडक्यात पण सर्वांगसुंदर आढावा देखील यथोचित ठिकाणी घेण्यात आलेला आहे. वाल्मिकींची सप्तर्षींशी भेट, त्यांचे आपसातील संवाद, नारदाशी आणि ब्रह्मदेवाशी भेट, या प्रसंगांचे भावपूर्ण वर्णन तर अतिसुंदर आणि मार्मिक! तसेच रत्नाकराचे त्याच्या पत्नी आणि मुलासोबतचे घरगुती वातावरणातील सहज संवाद देखील प्रसंगांच्या ओघाओघाने आल्यामुळे छान जमलेत. विश्वास सरांनी वाल्ह्याचा वाल्मिकी होतांनाची स्थित्यंतरे प्रभावीपणे साकारली आहेत. हा जो स्थित्यंतराचा अलौकिक आणि प्रेरणादायी प्रवास आहे ना, तोच या पुस्तकाचा मानबिंदू, माझ्या मते! इथे अधोरेखित झालेला 'रामाच्या मानव्यावरून देवत्वाकडे झालेला प्रवास' व वाल्ह्याच्या 'आदिमानव्याकडून ऋषित्वाकडे होत गेलेला प्रवास' खूप परिणामकारक वाटला. वाल्ह्या अन वाल्मिकी शब्दांचा अर्थ प्रथमच या पुस्तकातून आज कळला. शिकारी, आढ्यतेखोर आदिमानव, हताश पती आणि पिता, तपोबलाने झालेला महर्षी, सीतेचा मानस पिता, लवकुश आणि इतर शिष्यांचा आदर्श गुरु, लवकुशांना क्षात्रधर्मानुसार सर्वांगीण शिक्षण देऊन महापराक्रमी बनवणारे वाल्मिकी महर्षी, ही वाल्मिकींची विविधरंगी रूपे अतिशय मनोहर आणि परिणाम साधणारी आहेत. या लवकुश नामक दोन रामपुत्रांचा पराक्रम काय वर्णावा, रामाचे सैन्य, रामाचे तिन्ही बंधू, भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न, तसेच हनुमानाला देखील अस्मान दाखवणारे हे महापराक्रमी बालक रामपुत्र म्हणून शोभले, कारण ते महर्षी वाल्मिकींचे शिष्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात सर्वात मोठा वाटा त्यांच्या तेजोनिधी गुरूंचा अर्थात वाल्मिकींचा! याशिवाय या घटनेने लक्ष्मण आणि हनुमानाचा लंकाविजयाने उत्पन्न झालेला गर्व देखील नाहीसा झाला. वाल्मिकींचे सर्वात वंदनीय आणि पूजनीय असे सर्वात महत्वाचे स्वरूप म्हणजे एका आद्यकवीचे! अजरामर अशा महाकाव्याचा प्रणेता महाकवी वाल्मिकी! सर्वकालीन, सर्वमान्य आणि सर्वपूज्य अशा पवित्र वाल्मिकी रामायणातील चांगल्या वाईट पात्रांत अक्षरशः प्राण ओतणाऱ्या व्यक्तिरेखा आपल्या चोवीस हजार गेय श्लोकात शब्दबद्ध करणारा हा अतुलनीय महाकवी! वाल्मिकींना ब्रह्मदेवाच्या कृपेने दिव्यदृष्टी लाभली, पण रामकथेला काव्यबद्ध आणि भावबद्ध करण्याची वाल्मिकींची विलक्षण प्रतिभा असल्यामुळेच हे अजरामर काव्य निर्माण झाले. त्यांची साहित्यनिर्मितीची अत्युत्तम जाण आणि प्रज्ञा वादातीत आहेच, पण त्यांचे इतर गुण विश्वास सरांनी फार सुंदररित्या विशद केलेत ( भविष्यवेत्ता, दार्शनिक, तत्वज्ञ, तसेच समाजशात्र, भूगोल, इतिहास,



अंतराळ, तारामंडळ इत्यादींचा गाढ अभ्यासक ) मंडळी, वाल्मिकींचे हे सर्व गुणनिधान पुस्तक वाचल्यावर ध्यानात आलेत. या पुस्तकातून मला व्यक्तिगतरीत्या सर्वात भावलेला वाल्मिकी म्हणजे मानवी मनाचा सखोल अभ्यासक आणि मानवी भावभावनांचा उहापोह करून काव्यात ते सजीव चित्रण करणारा असा विलक्षण लेखक! भावप्रवण लेखन करतांनाच त्याच्यामधील समाजप्रबोधन करणारा ज्ञानी, धर्मज्ञ आणि कर्मज्ञ असा महापुरुष देखील मला प्रकर्षाने जाणवला तो या पुस्तकातूनच! बोनस म्हणता येईल अशी वाल्मीकींच्या वास्तव्याची, आश्रमांची आणि समाधीची इतिहासकालीन आणि भौगोलिक विश्वसनीय माहिती देखील विश्वास सरांनी संदर्भासहित दिलेली आहे, या अनुषंगाने सरांनी 'वाल्मीकी' या विषयाचा किती सांगोपांग अभ्यास केला आहे हे दिसते! 'प्रथम तुज पाहता, जीव वेडावला' असे कांहीसे या पुस्तकाच्या मुखपृष्ठदर्शनापासून तर मलपृष्ठापर्यंत झाले, अन पुस्तक लहान पण अर्थगर्भ आणि भावगर्भ असल्याने एकाच बैठकीत अधाशासारखे वाचले. अर्थात वारंवार वाचावे, संग्रही ठेवावे, इतरांना भेट द्यावे आणि महत्वाचे म्हणजे वाल्मिकींसारख्या आदर्श गुरु आणि कवीच्या चरित्रातून तसेच त्यांनी रचलेल्या महाकाव्य अर्थात रामायणातून इतके कांही घेण्यासारखे आहे की 'घेता किती घेशील दो कराने' अशी माझी अवस्था झालेली आहे. वाल्ह्याच्या शरीराभोवती साचलेल्या वारुळासारखे षड्रिपूंचे एकावर एक असे थर आपल्या देह, मन आणि बुद्धीवर जमत आहेत. त्यांना भेदायला रामनामाचेच तंत्र आणि मंत्र विकसित करावे लागणार आहे. याकरता महाकवी वाल्मिकींहून अधिक प्रभावशाली आदर्श कोण असेल?

विश्वास सर, हे पुस्तक लिहितांना आणि त्याविषयी माहिती गोळा करतांना आपण किती कठोर मेहनत घेतली आहे हे पुस्तकाच्या शब्दाशब्दात प्रकट होत होते. पुस्तकाचा आकार लहान असला तरी त्याची व्याप्ती अनंत आणि असीम आहे, कारण या पुस्तकात आपली नितांत रामभक्ती सामावलेली आहे! रामकृपेने आपण असेच समृद्ध लेखन करीत राहणार यात दुमत नाहीच, कारण आपण श्रीशारदादेवीचे परम उपासक आहात! प्रभू श्रीराम आपल्या सर्वांवर असेच कृपेचे छत्र धरून आपले कायम रक्षण करोत हीच रामप्रभूच्या चरणी प्रार्थना!!!

विश्वास सर, आपल्या या सर्वांगसुंदर पुस्तकलेखनासाठी मनःपूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा! आपल्या आधीच्या साहित्याप्रमाणेच या पुस्तकाला देखील वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळेल याबद्दल संपूर्ण विश्वास आहे!

धन्यवाद!

**डॉक्टर मीना श्रीवास्तव, ठाणे**
**भ्रमणध्वनी- ९९२०१६७२११**
**दिनांक-१९ डिसेंबर २०२२**

# मुलांसाठी वेळ काढाच...

आधुनिक केसरी

**तुमचे एखादे काम राहिले तरी चालेल किंवा पैसे थोडे मिळाले तरी काही हरकत नाही. परंतु एकदा वेळ निघून गेल्यावर हाती काहीच उरणार नाही. आपली नोकरी , व्यवसाय, शेती याचा कितीही मोठा व्याप असला तरी आपल्या मुलांसाठी वेळ काढाच... हीच त्यांच्यासाठी भविष्यातील तुमची गुंतवणूक असेल. आपण मुलांसाठी खूप काही करत असतो.त्यांच्यासाठी आपली धावपळ चालू असते. त्यांना चांगले शिक्षण मिळावे, कोणतीही कमतरता भासू नये. यासाठी प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आपण पै पै जमवत असतो. केवळ मुलांच्या आनंदासाठी. मुलांसाठी पैसे जमवले ,शाळेत सोडले व पाहिजे ते दिले म्हणजे आपले काम संपत नाही. त्यांना हवा असतो पालक म्हणून आपला वेळ आणि प्रेमळ संवाद.**



आपल्या मुलांच्या सवयी कोणत्या आहेत ? त्याचे शाळा कॉलेजातील मित्र मैत्रिणी कोण आहेत ? तो शाळा कॉलेजात वेळेवर जातो का ? मोबाइलवर तो काय पाहतो ? तो जास्त वेळ कोणाच्या संगतीत असतो ? याकडे पालक म्हणून आपले लक्ष असणे गरजेचे आहे. आज अनेक मुले टिव्ही मोबाइल पाहून गुन्हेगारी कृत्ये करण्याकडे वळतात..सोशल मिडियात प्रसिद्धी मिळावी यासाठी मुले चुकीच्या गोष्टी करतात. मुले या वयात वाईट संगतीमुळे वाम मार्गाला लागण्याचा धोका जास्त असतो. पालक म्हणून सजग राहणे फार महत्त्वाचे आहे.

**१. मुलांशी रोज प्रेमळ संवाद साधा.त्यांच्या अडचणी जाणून घ्या.**

**२.त्यांच्या मित्र मैत्रिणींना अधूनमधून घरी बोलवा.त्यांच्याशी चर्चा करा.म्हणजे त्यांचा स्वभाव व सवयी यांचा तुम्हाला परिचय होईल.**

**३. गरज असेल तरच मोबाइल द्या.तोही शैक्षणिक कामासाठी.**

**४.शाळेतील शिक्षकांना नियमित भेटा. त्याच्या वर्तनातील चांगल्या वाईट बाबींशी चर्चा करा.**

**५.मुलांच्या डोळ्यासमोर सतत चांगल्या बाबी ठेवण्याचा प्रयत्न करा.**

**६.सोशल मिडियाच्या आहारी जाण्यापासून रोखा.**

**७.स्वतःच्या आवडी व छंद जोपासण्यास प्रोत्साहन द्या .**

**८.चांगल्या मित्रांचे जीवनातील स्थान समजावून द्या.**

**९.वाईट गोष्टी केल्याने आयुष्य कसे मातीमोल होते हे सांगा.**

**१०. मुलांना चांगल्या वाईटाची जाणीव करुन द्या.**

**११.आयुष्य सुंदर आहे.ते छान जगा हे मनावर बिंबवा.**

**१२.गरज असेल तर समुपदेशक यांची मदत घ्या.**

**- लक्ष्मण जगताप**

**(लेखक शिक्षक व प्रेरणादायी वक्ते आहेत.)**

# आईचे डोळे



आधुनिक केसरी
प्रविण दवणे

गुणवत्ता यादीत चमकलेल्या रामकृष्णाचं अभिनंदन करण्यासाठी मी फुलांचा गुच्छ घेऊन त्याचं घर शोधत गेलो. घर शोधता शोधता प्रश्न पडला- 'अशा झोपडपट्टीत राहतो रामकृष्ण ? पण राहतो किती नीटनेटका.' त्याच्या व्यक्तीमत्वातील टापटिपीवरून त्याच्या घराचा बांधलेला अंदाज साफ कोसळला होता.

गटारांची अनेक जाळी धडपडत ओलांडत एका फळकुटाच्या झोपडीजवळ गेलो. 'इथंच तो राहतो', म्हणून कुणीतरी सांगितलं.

काळोखातून प्रकाश बाहेर यावा तसा सलील माझ्या आवाजानंच बाहेर आला. "सर ?" आत गेलो. "अभिनंदन !" गुच्छ देत म्हटलं.

मला जायला तसा तीन-चार दिवस उशीरच झाला होता. अभिनंदनाची पहिली वर्दळ थांबून आता रूटिन सुरू झालं होतं.

गुणवत्ता यादीत आलेल्या मुलाचं हे असं घर ? रामकृष्णने अभ्यास कुठे केला असेल ? बाजूच्या रेल्वे आणि लाऊडस्पीकरच्या सततच्या गदारोळात त्याने अभ्यास कसा केला असेल ? त्याचं पुनःपुन्हा अभिनंदन करताना मनातल्या मनात ते काळोखे कोपरे पाहत मी स्वतःलाच विचारीत होतो.

"सर, खूप खूप बरं वाटलं, खरं तर तुम्ही घरी आला आहात, हे खरंच वाटत नाहीये ! सावरलेलो नाहीये मी. सर, मी तुमच्यासाठी चहा करतो," म्हणत तो स्टोव्हला पंप मारु लागला.

"रामकृष्ण, राहू दे. आपण बाहेर घेऊ,"

"तुम्ही काळजी करु नका, मी उत्तम चहा करतो. कोळसेवाडीत कॅन्टीन चालवतो.. फक्त चहाचं." चहाच्या वाफांनी वातावरण भारलं होतं.

"घरात दुसरं कुणी ?"

"ताई आहे. टायपिंगच्या क्लासला गेलीय. वडील किराणा दुकानात हमाल आहेत."

"आई... ?" "आई नाही." रेंगाळलेली स्तब्धता कशी प्रवाही करावी या विचारानं मी गोंधळलो. चहा त्यानं खरंच उत्कृष्ट केला होता. अगदी जीव ओतून !

"रामकृष्ण, तू मार्गदर्शन व्याख्यानमालेत येत होतास. भेटत होतास. उत्तरपत्रिका पुनःपुन्हा तपासून घेत होतास. पण तेव्हा तुझ्याकडे पाहून....?"

"सर, माणसाची परिस्थिती दिसलीच पाहिजे का ? आपले कष्ट, आपलं जगणं बघून कुणीतरी 'अरेरे' करून म्हणणं... यानं काय साध्य होतं ? आतासुद्धा मला खूप बक्षिसं मिळालीत. पण ती कायम पुरणार आहेत का ? पुढचं शिकायला कष्ट करावेच लागणार. टीव्हीवाले आले, निघून गेले. एका मोठ्या क्लबचे अध्यक्ष आणि आमदार, खासदार गाडी आत येत नाही म्हणून उतरून आतही आले नाहीत. सर, परिस्थिती माणसाला आहे त्यापेक्षा मोठं करते."

रामकृष्णाची चमक गुणवत्ता यादीपुरती उरली नव्हती. ती वाक्या- वाक्यातून, डोळ्यातून चमकत होती. "कुठून शिकलास हे सगळं ?"

"सभोवतीच्या मुलांकडून,"

"म्हणजे ?"

"ती नुसताच टाइमपास करतात. बहुतेक नापास होतात. मग रात्री जुगार ! चोरी, लुबाडी हा त्यांचा उत्पन्नाचा मार्ग. पितात, भांडतात ! तेव्हा ठरवलं- आपण तसं व्हायचं नाही. हे मी सातवीत असतानाच ठरवलं. मी सातवीत होतो तेव्हाच माझी आई गेली. इथल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये. साध्या न्यूमोनियानं."

"बदलेल सारं...."

"बदलतंच आहे, सर. गरिबीचा विचार करायला वेळच कुठे आहे ?" तसे आपले डोळे क्वचितच भरून येतात. काळजाशी दडलेले अश्रू क्वचितच पापणीच्या काठावर येतात.

माझ्या आणि अनेक कॉलेजांच्या भोवती चकाट्या पिटत वेळेचा कचरा करणारी असंख्य मुलं आठवली. रानगेंड्याप्रमाणे फटफट्या घेऊन उधळणारी, देणग्या, फी देऊन प्रवेश घेणारी, तरीही वर्गात बसणं 'पाप' मानणारी असंख्य मुलं ! त्यांच्याच वयाचा हा रामकृष्ण!

असेही अनेक चेहरे डोळ्यांपुढून झरकन् तरळून गेले.

"रामकृष्ण, एकदा माझ्या वर्गात ये... मुलांशी गप्पा मारायला."

"सर, एवढं मोठं करू नका मला. असे काबाडकष्ट करून शिकणारे माझ्यासारखे अनेक आहेत. मनातला वॉचमन जागा असला की कुणी सांगावं लागत नाही. आपण कुठल्या परिस्थितीत जगतो, आपले पालक रक्ताचं पाणी करून आपल्याला कसं शिकवतात, याची आठवण सतत जागी असेल ना, तर शाळेच्या वर्गातल्या अभ्यासानंही मार्क्स मिळतात. क्लासेस बिलासेसची चैन झोपाळू मुलांसाठी.!"

मला रिक्षापर्यंत सोडायला रामकृष्ण बरोबर आला. तिथेही बोलत राहिलो बराच वेळ. बोलता बोलता तो चटकन बोलून गेला. "सर, भोवतीची मुलं पाहुन केव्हातरी मलाही थोडी झापड आल्यासारखं होतं."

"मग, अशा वेळी...?"

"मी... मी फक्त आईचे डोळे आठवतो."

"आई "

"राब राब राबायची ती.... कागदाच्या पिशव्या करत. गोंद-कात्र्या घेऊन आम्ही तिच्याभोवती बसून तिला मदत करायचो. वडिलांची गिरणी संपानंतर बंदच पडली. त्यानंतर वनवास मागे लागला. शेवटी ती बोलायची, 'मी काही आता जगत नाही; पण तुझ्याकडे माझे डोळे कायमचे असतील. तु कसा शिकतोस, तु कसा मोठा होतोस, ते पाहण्यासाठी.' सर, ते डोळे आठवतात हो !"

रिक्षात बसलो तेव्हा हेच आठवत राहिलं. सतत कुणीतरी आपल्याला सांगावंच का लागावं ? 'अभ्यास करा, लवकर उठा, पालक किती मरमर मरतात आपल्यासाठी याची आतून जाण असणारा असा एखाद् दुसराच !"

परवा एक शिक्षिका असलेली पालक आई स्टाफरूममध्ये विषण्ण चेहऱ्याने आली, "मुलगा सकाळी उठतच नाही हो. सातचं लेक्चर नेहमी बुडवतो. ऐकतच नाही. आता म्हणतो, शिकायचं नाही. काही करायचं नाही. कुणाचं मुळी ऐकतच नाही." फक्त रडायची बाकी होती ती बाई.

खूप काही सुंदर घडविण्याचा तारुण्याचा ऋतू संपून गेल्यावर कितीतरी विद्यार्थी जागे होतात, तेव्हा उशीर झालेला असतो. एक भकास दुपार... आणि निराश संध्याकाळ !

सकाळी उठण्यासाठी 'जबरदस्ती,' कॉलेजला जाण्यासाठी 'जबरदस्ती', मग शिकण्यासाठी.. परीक्षेसाठी.. त्याआधी वर्गात हजर राहण्यासाठी 'जबरदस्ती.!' जबरदस्तीनं कधी फूल उमलतं का ? रोपानं स्वतःहूनच आतून ठरवलेलं असतं. विद्यार्थ्यांनंही असं आतूनच ठरवायला हवं.आईचे, बाबांचे डोळे आठवण्यासाठी ते प्रत्यक्ष मरायलाच हवेत का ?

आपण वर्गात गुंडगिरी करताना किंवा वाह्यात वेळ घालवताना, चाचणीत शून्य मार्क मिळवताना, बसमधून/लोकलमधून लोंबकळत येणारे आई-वडील आपल्याला का आठवत नाहीत? मुलांसाठीच पैसे जमा करायला सारखे वेगवेगळ्या ठिकाणी कंपनीच्या कामासाठी वाऱ्या करणारे थकलेले बाबा का आठवत नाहीत ?

घरात आपण लहान असू, पण जाणीवेनं थोडं समजूतदार झालो तर पालकांच्या घामाचं गुलाबपाणी होऊ शकतं. यशाची राइसप्लेट रेडीमेड मिळत नाही, हे आत्ताच कळायला हवं. यश शिजत ठेवावं लागतं.. परिस्थितीच्या धगीनं. कधी महत्त्वाकांक्षेच्या इंधनानं आयुष्य उकळत ठेवावं लागतं. हे केव्हा कळणार? चाळीसाव्या वर्षी ?

मी स्वतः एस.एस.सी. ला असताना फॉर्म भरायला पैसे नव्हते तेव्हा आईच्या हातातली शेवटची सोन्याची बांगडी गहाण टाकण्यासाठी (तीही कधीच न मिळण्यासाठी ) निघालेले माझे वडील मला आठवले.

आई म्हणाली- "ही शेवटची. पुढे काय?"

अजुनही घरातले ते क्षण आठवताहेत. नातेवाईकांनी केलेली उपेक्षा आठवते. निष्कांचन आईला पुढे येऊ न देणारे नातेवाईक आठवले. कुणाच्या तरी लग्नात "माझी बोरमाळ तू घाल थोडा वेळ, अगदीच काळी पोत बरी दिसत नाही," असं आईला म्हटल्यावर, "माझी लाज वाटत असेल तर मी येणार नाही. आले तर जशी आहे, तश्शीच येईन !" हे बाणेदारपणे सुनावणारी आई आठवली. आणि नंतर ती म्हणाली होती- "माझा दागिना बघायचा असेल तर माझा मुलगा पहा." आईच्या त्या वाक्याने केवढी जबाबदारी टाकली होती माझ्यावर, ते आठवलं.

असे प्रसंगच झपाटून शिकणाऱ्या मुलांच्या आयुष्यात निरांजन होऊन येतात. दारिद्र्य माणसाला संपवू शकत नाही. पण आळस, उदासीनता, ध्येय-शून्यता पार नेस्तनाबूत करते माणसाला.!

मला दिलेल्या एका मुलाखतीतलं आशा भोसले यांचं वाक्य आठवलं, "सुखी माणूस कधी कलावंत होऊच शकत नाही."

खुप काही प्रेरणा देणारी ही रसरसलेली आयुष्यं तेव्हाच घडतात, आकाराला येतात, जेव्हा जगाच्या पाठीवर आपण कुठेही असलो तरी आपल्याला आठवत असतात कष्टाळू, अपार विश्वासाने कर्तृत्व गाजविण्यासाठी जगात ज्यांनी आपल्याला पाठविलं आहे असे आपल्यासाठी स्वप्न पाहणारे आईचे डोळे ! आपल्या आईचे डोळे... !!!

# जे होते ते चांगल्यासाठीच



आधुनिक केसरी

एकदा अकबर आणि बिरबल शिकरीला जात असतात, तलवार काढताना अकबरचा अंगठा कापला जातो अकबरला खूप त्रास होतो, तो ओरडायला लागतो तो शिपायांना वैद्य घेऊन या म्हणून म्हणून शहरात पाठवतो. तेवढ्यात बिरबल त्याच्या जवळ जातो आणि म्हणतो, "महाराज शांत व्हा जे होतं ते चांगल्यासाठीच होतं"

अकबरला राग येतो. तो जास्तच चिडतो आणि शिपायांना सांगतो "जा बिरबलला घेऊन जा, रात्रभर उलटं टांगून ठेवा. आणि सकाळी-सकाळी फाशी द्या" सर्व शिपाई तिथून निघून जातात. अकबर एकटाच जंगलात असतो. तो एकटाच पुढे शिकार करायला जातो!!

पुढे काही आदिवासी त्याला पकडून घेऊन जातात, आणि त्याला डांबून ठेवतात.. अकबरची बळी ते देणार असतात. त्यासाठीची विधी करण्यात आदिवासी मग्न होतात.तितक्यात एका आदिवासीची नजर अकबरच्या तुटलेल्या अंगठ्याकडे जाते व तो ओरडून सर्वांना सांगतो, "हा अशुद्ध आहे, आपण याची बळी नाही देऊ शकत याचा अंगठा तुटलेला आहे.

आदिवासी अकबरला सोडून देतात आणि त्याला बिरबलचं बोलणं आठवतं, 'जे होतं ते चांगल्यासाठीच होतं..' तो धावत पळत त्याच्या महलात येतो, बिरबल ला फाशी होणारच असते तितक्यात तो तिथे जाऊन बिरबलला घट्ट मिठी मरतो आणि सर्व हकीकत सांगतो. आणि म्हणतो, "मला माफ कर. तुझ्यामुळे मी वाचलो आणि बघ माझ्यामुळे तुझी काय हालत झाली."

'बिरबल हसतो आणि म्हणतो, "नाही महाराज. जे होते ते चांगल्यासाठीच होते" अकबर स्तब्ध होतो आणी विचारतो असं कसंतुला माझ्यामुळे खूप त्रास झालाचांगलं कसं झालं? त्यावर बिरबल म्हणतो, "महाराज मी जर तुमच्यासोबत शिकरीला आलो सतो तर त्यांनी माझा बळी दिला असता.. म्हणून म्हणतो जे होतं ते चांगल्यासाठीच होतं.

**तात्पर्य :** मित्रांनो, आयुष्यात असे क्षण येतील जेंव्हा तुम्ही खचून जाणार, पण लक्षात ठेवा जे होतं ते चांगल्यासाठीच होतं.कदाचित पुढे त्याचा ऊपयोग तुमच्या चांगल्यासाठी होईल!!!

## विदूषक



सर्कशीतला विदूषक
बुटका होता भारी
पोट त्याचं अगडबंग
हसायची त्याला सारी

लाल रंगाचे जॅकीट
टोपी त्याची नक्षिदार
मजेदार किस्से
सांगायचा फार

हात खिशात घालून
डुलत डुलत चालायचा
कधी शांत रहायचा
तर कधी जास्त बोलायचा

शोभून दिसायचा त्याला
लांब पट्ट्याचा सूट
टप-टप वाजवायचा
उंच टाचेचा बूट

गंभीर चेहरा करून
जाग्यावर बसायचा
प्रेक्षकांनी टाळ्या वाजविता
जोरजोराने हसायचा

- रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ


## नक्कल



चला मित्रहो लढऊ शक्कल
फेरीवाल्याची करूया
नक्कल
चणे-घ्या-चणे
छान छान चणे
फेरीवाल्याचे म्हणूयात गाणे
गाणे ऐकून धावतील पोरे
म्हणतील आम्हाला चणे द्यारे
होईल त्यांची फसगत भारी
गंमत कळल्यावरती सारी
लबाड म्हणतील कोल्हे
कुठले
आमच्या तोंडा पाणी सुटले
खुद खुद खुद खुद हसू येईल
सुट्टीही आपुली मजेत जाईल

-भानुदास धोत्रे
परभणी





## सीमावर्ती

सिमावर्ती भागातली
गरीबबिचारी जनता
रे कुठे दुखते खुपते
वेदना कधी जाणता

साध्या सोयी सुविधा
झगडा त्याच्याकरता
आपलेचं ते नागरिक
सांगा कधी हे स्मरता

सवती लेकरा समान
कशास त्यांना मानता
परक्यासारखे आहेत
रे कुठे गेली समानता

सिमाभागात राहतात
रे दोष त्यांचा कोणता
दुजा भाव घाली घाव
परदेशी त्यांना गणता

अतिरेक असे घातक
अस्वस्थ होई जनता
सिमा वाद मिटवावा
सावरा निदान आता

मनाची सिमा वाढवा
भेद भाव का पाहता
एकात्मतेच्या प्रदेशा
भारताआपण राहता

– हेमंत मुसरीफ, पुणे
9730306996.



## सूर्य



उगवतीच्या सूर्यालाही ठावुक
कोण कुणाचे काय आहे
रविकिरणांचा मागोवा घेत
पाखरास त्या उडायचे आहे

पसरलेल्या लालीसह त्या
पुनः पुन्हा उगवायचे आहे
शांत निवांत धरणीलाही
उबेने त्या जागवायचे आहे

मध्यान्हीच्या तप्त ज्वालेने
माणसालाही थकवायचे आहे
शीतल छाया पसरवणार्या
झाडालाही स्पर्शायचे आहे

सायंकाळी असेच पुन्हा
पश्चिमेला अस्तायचे आहे
चांदव्याला पुन्हा एकदा
सृष्टीलाही सोपवायचे आहे

शांत थंड वातावरणात मग
माणसासही निजवायचे आहे
पुन्हा एकदा उगवण्याला
सूर्यास त्या अस्तायचे आहे
– © स्वानंद नंदकुमार मराठे

## संध्याछाया

झाडाच्या पानांना
गळण्याचा शाप
पाठीवर थाप
शिशिराची..

माळून वसंत
झेलला उन्हाळा
आणि पावसाळा
फुलांसवे..

अनुभवा आले
पाखरांचे पंख
भुंगेऱ्यांचे डंख
डोलताना..

केली नाही तमा
वादळ वाऱ्याची
गारांच्या माऱ्याची
झुंजताना..

संध्याछाया दारी
आवळता गाठी
सुखावते मिठी
पालवीची..!

महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि.
सांगली
मो. 9765374805




## ।।धाव घेई विठूराया आता चालूनको मंद।।

राऊळी मंवदरी बडवेमज लुटती
गंगेवरी उपाध्ये कममकांड करववती
अजाबलीसाठी मांविकही कष्टववती
तयानेच कं ठ माझा सुकला
धाव घेई ववठू राया आता चालूनको
मंद।।
दुकानदार मापात पाप करर
कापडात वमटराचा वार करर
तेलात वकलोचा शेर करर
तयानेच कं ठ माझा सुकला
धाव घेई ववठू रायाआता चालूनको
मंद।।
ववहीर तयार होई फक्त कागदावरर
रस्तेवदसती फक्त फायलीवरर
टेबलाखालून चाले सवमव्यवहार
तयानेच कं ठ माझा सुकला
धाव घेई ववठू रायाआता चालूनको
मंद।।
सातबारावर तलाठ्याला अडचण
घरासाठी ग्रामसेवकाला अडचण
शेती कजामला सवचवाला अडचण
तयानेच कं ठ माझा सुकला
धाव घेई ववठू रायाआता चालूनको
मंद।।
बालवाडीत प्रवेश महाग फार
मास्तर कलंदर ,शाळे त पोरं बेजार
ऑनलाईन वशक्षणानेकॉलेज ओसाड
तयानेच कं ठ माझा सुकला
धाव घेई ववठू रायाआता चालूनको
मंद।।
पक्ष सगळेसारखेच, त्यानं राजकारण
गेलं चुलीत
पेटर ेल गेलं वर ,कपाशी आली खाली
ववकासाचा बोलबाला, आपण जगात
वतसरे
मजूर वकलोभर ज्वारीसाठी रोज हात
पसरे
तयानेच कं ठ माझा सुकला
।।धाव घेई ववठू राया आता चालूनको
मंद।।
रचना – आहेर वा.र .नावसक
.9958782982

## झाडाचे अभंग

झळा सोसुनिया
शीतलता देई
धन्य जगी होई
झाड संत.....।।१।।
असाध्य ते साध्य
व्याधी मुक्त कार्य
आयुर्वेदाचार्य
झाड संत..... ।।२।।
दगडा परत्वे
फळ देई हाती
नाही जाती पाती
झाड संत..... ।।३।।
निरपेक्ष साधू
शांत चित्ती जाप
दारी उभा बाप
झाड संत..... ।।४।।

बलराज संघई
9420015108



## निवडणूकीच्या हंगामात

काल परवा लोकशाहीचा, उत्सव झाला मोठा
निवडणूकीच्या हंगामात,उगवून आल्या नोटा.
तत्व, पक्ष, विचारसरणी, मेळ कुठं लागेना
नोटेवरचे गांधी बाबा, भारी तरी साऱ्यांना.
किती बोकडे अन कोंबडे, गेले तेव्हा बळी
हिशोब त्याचा राहून गेला, मतमोजणीच्या
वेळी.
यथा राजा तथा प्रजा, खोके खोके करताना
'बा' भीमा चे संविधान, मी पाहिले रडतांना.
झाली आता निवडणूक, अन लागला निकाल
काही पडले काही अडले, काही उधळती
गुलाल
विसरून हारजीत करूया, विकास आता
गावाचा
माणुसकीच्या पिकावर, नको गुलाल द्वेषाचा.

ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो..९४०३३८४८८९

## आयुष्य




आयुष्याची माती करुनी
लावली कपाळी
त्याच कपाळी मातेने
दिली जगण्याची उभारी
न्यारी-न्यारी आपली ही
आयुष्याची वारी
उभं आयुष्य अर्पण करतो
पांडूरंगाच्या दारी
वाऱ्यासारखे वाहते आयुष्याचे वारे
नदीसारखे आटून जाते एकदिवस
सारे आनंदाने गा हो आयुष्याची
गाणी मना-मनात रुजेल
आपुलकीची वाणी
लक्ष्मण वाल्डे, कन्नड

## भरकटणारी नाती

काही नाती खुप नाजुक असतात
काही खुपच बिनसलेली असतात
काही नात्यात आपल्याला
रहाता येत नाही म्हणून
माणसं स्वतःची अशी
नाती निर्माण करत असतात
नाती तर निर्माण होतात पण
त्या नात्यात एकाच बाजुने
खुप ओंजळ भरलेली असते
नात्यातील ते सुंदर असणारं नातं
नाहीसं होत असतं
कारण नात्यात शब्दाला शब्द
अन भावनांचा विस्फ़ोट होत असतो
नात्यात भावनांची गुंतागूंत होत असते
मग ते वा-यासारखे भरकटत असते
भरकटत असताना ते क्षणिक थांबते
आणि भावना शुन्य होऊन
ती नाती शांतपणे निघून जातात

@ मानसी प्रविण जैस्वाल
औरंगाबाद

## बांधापल्याड माझ्या



झोळीत पाभराच्या..दाणा अता
भरावा उगवून कोंब रानी..मग
भोग तो सरावा.
मातीत गाडले मी..माझ्याच
काळजाला वरतून वरुणराजा..
उपकार तू करावा.
सारून ओल माती..गर्भार बीज
होवोदेठास नीर ओला..भरपूर
पाझरावा.
बांधापल्याड माझ्या..रोखेन
रोगराई मी रामबाण तसला..
उपचार वापरावा.
द्यावी खुशाल मात्रा..
खत,नत्र,औषधाची
ताटास भार होता..मग तोल
सावरावा.
दारात रास येता..कणगीस
हर्ष व्हावा हा देह वासराचा..
कडब्यावरी चरावा.
आलाच मोजणीला..तो सावळा
हरी जर ओट्यावरी फुलांचा..
मांडवच पांघरावा.

® रज्जाक शेख
9665778558

## नाताळ...!

गाईच्या गोठ्यात रात्री
येशूचा जन्म हा झाला,
गोर-गरीबाकरीता
येशू देवदूत झाला.

कर्मकांडी लोकांमध्ये
येशूचे वावडे होते,
म्हणून प्रभू येशूला
सदा त्रास देत होते.

सनातनी लोकांनी
येशूला स्मशानात नेले,
हातापायात खिळे ठोकून
क्रुसावरती चढविले.

बायबल ग्रंथातून
फादर माहिती देई,
रविवारी चर्चमध्ये
पवित्र प्रार्थना होई.

सांताक्लॉज हा मुलांना



रात्री भेट वस्तू देतो,
डिसेंबर महिन्यात
नाताळ साजरा होतो...I

– अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## अंदाज.....



माझा अंदाज वाच आता
आहे होतो तोच आता
नसेल गाई ले कधी तरी
माझे शब्द गा च आता
तु ही तसा मी ही तसा
मनात च नाच आता
सूर घे माझे लपेटून
दे मनाला लाच आता
कौरवांचे भरले घडे तर
मोज पांडव पाच आता
झाडे लाव , विमा काढ
पाठीराखा हाच आता
खूप झाले जीव जंतू
लस स्वतःला टोच आता
सत्य दावी काच मजला
फोडला तो मीच आता

बलराज संघई
9420015108

## नाताळाचा सण



नाताळाच्या सणाला
येते आनंदाला भरती
चैतन्याच्या प्रकाशात
न्हाऊन निघे धरती

घेऊन हरणांची गाडी
येईल सांताक्लॉज
घालूनी लाल अंगरखा
मखमली टोपीचा साज

पाठीवरील पोतडीत
आणेल
मुलांसाठी खेळणी व खाऊ
जींगल बेल जींगल बेल

मुलासोबत लागेल गाऊ
आनंदाच्या पर्वनित
ख्रिसमस ट्री येईल बहरून
लुकलूकणाऱ्या तारकात
जो तो खेळेन दुःख विसरून

असाहा नाताळ सण
सांगतो जीवनातले सत्य
एक दुसऱ्यावर सदा
प्रेम करावे नित्य

रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता. महागाव
मो. 9011559106

# संस्कृत शिक्षणाचा खेळखंडोबा



विनोद जैतमहाल
संपर्क क्र. 9823028332

आधुनिक केसरी

**संस्कृत हा विषय पूर्वी चांगले गुण मिळवून देणारा विषय होता. पण राज्य परीक्षा मंडळाने २०१८पासून 'कृतिपत्रिका' नावाचा पॅटर्न संस्कृतलासुद्धा लागू करून या विषयाची वाट लावली आहे. आज नववी आणि दहावीला जे व्याकरण आहे ते मुलांसाठी अत्यंत क्लिष्ट आहे. हे व्याकरण पक्के करण्यासाठी इतर सर्व विषयांचा अभ्यास सोडून वर्षभर केवळ संस्कृतचाच अभ्यास मुलांना करावा लागेल. तेव्हा कुठे त्यांना बरे गुण मिळतील. स्कोअरिंग वगैरे लांबचीच गोष्ट!**

मी गेली दहा वर्षे संस्कृत हा विषय शाळेत शिकवत आहे. आज संस्कृत अभ्यासक्रमातील अति-व्याकरणामुळे या भाषेविषयी विद्यार्थ्यांचा द्वेष वाढीला लागला आहे. व्याकरणाचे बारकावे पुढे अकरावी, बारावी, पदवी स्तरावर शिकवले पाहिजे. तेव्हा बुद्धीची वाढ बऱ्यापैकी झालेली असते.

**बालबुद्धीवर व्याकरणाचा भडीमारः**

दहावीपर्यंतच्या मुलांवर परस्मैपद व आत्मनेपदाचे तीन काळ आणि दोन अर्थांचे १४४ प्रत्यय, धातूंची कर्मणिरूपे, धातूसाधित अव्यये, विविध धातूसाधित विशेषणे, नामे, सर्वनामे, क्रियापदे यांचे टेबल परीक्षेत विचारणे, सूचनानुसार कृती या प्रश्नामध्ये वाच्य परिवर्तन म्हणजे 'चेंज द व्हॉइस', प्रयोजक, अव्यये काढणे, काळ बदलणे, समास वगैरे इतके बारकावे असणारे प्रश्न विचारले जातात की ज्या व्यक्तीने तीनेक वर्षे केवळ संस्कृतचाच अभ्यास केला आहे त्यालाच ते नीट सोडवता येतील.

**एवढा एकच विषय आहे का मुलांना?**

संस्कृत हा एवढा एकच विषय नसतो विद्यार्थ्यांना! बोर्डानेच काढलेली इतर विषयांची पुस्तके पाहिली तर लक्षात येईल की इतर विषयांचा प्रचंड अभ्यास मुलांना आहे. तो सोडून मुले केवळ संस्कृत व्याकरणात डोके लावत बसतील असे बोर्डाला वाटते का?

बोर्डाच्या अभ्यास मंडळाने एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे होती की संस्कृत हा अनिवार्य विषय नाही. ऐच्छिक विषय आहे. त्याचा अभ्यासक्रम कमी ठेवावा आणि परीक्षा पद्धत त्यानुसार सोपी ठेवावी.

**परिचय व गोडी लावणे एवढेच लक्ष्य असावेः**

हा विषय पूर्वीप्रमाणे गद्यपाठ, सोपी प्रश्नोत्तरे, सुभाषितमालांचे पाठांतर, त्यावरील मराठी, इंग्रजीतून उत्तरे आणि आजच्या मुलांना पचेल एवढे व्याकरण अशी पूर्वीसारखी परीक्षा पद्धत ठेवली तर मुलांना या विषयाची गोडी लागेल आणि रोजच्या व्यवहारात या भाषेतले हजारो शब्द आपण कसे वापरतो हेही लक्षात येईल. संस्कृत ही आजची बोलण्याची भाषा नसली तरी ती आपली 'पराभाषा' आहे. संस्कृतमधील हजारो शब्द आपण रोज वापरतो. त्यामुळे या भाषेची ओळख व गोडी लावणे एवढेच उद्दिष्ट शाळेच्या स्तरावर बोर्डाने ठेवायला पाहिजे होते.

**तेलही गेले तूपही गेलेः**

संस्कृत घेतलेल्या मुलांना पूर्वी फारसे संस्कृत येत नसले तरी पाठांतर व भाषांतराच्या प्रश्नांमुळे चांगले गुण मिळत असत. आजच्या परीक्षा पद्धतीमुळे मुलांना संस्कृत तर येतच नाही; पण गुणही फारसे मिळत नाहीत. म्हणजे 'तेलही गेले आणि तूपही गेले' अशी अवस्था झाली आहे.

**आजच्या पिढीची फरफटः**

आजची पिढी ही देवनागरी लिपी वाचणारी नाही. मराठी, हिंदी वाचतानाही त्यांची फरफट होते. आठवी, नववी, दहावी अशी तीन वर्षे संस्कृतचे व्याकरण शिकूनसुद्धा परीक्षेत गोंधळ उडतो आणि मार्क जातात. चांगले मार्क मिळणारच नसतील तर पुढचे विद्यार्थी कशाला संस्कृत विषय घेतील?

संस्कृत हा विषय महाराष्ट्रातील शाळांमधून बंद पडला तर त्याला केवळ राज्य परीक्षा मंडळ जबाबदार असेल.

(संस्कृत आणि उर्दू शिकल्याने मराठी भाषा पक्की होते. मराठीचा व्यावसायिक उपयोग करून पैसे कमावता येतात हे मी आधीच दोन लेखांमध्ये मांडले आहे. संस्कृत ही केवळ ब्राह्मणांची किंवा धार्मिक भाषा नाही आणि उर्दू केवळ मुसलमानांची नाही हे सुद्धा आधीच लिहिलेले आहे. त्यामुळे तो वाद येथे घालू नये. आधी या दोन्ही भाषा शिकाव्या आणि मग बोलावे...)




# जल जीवन मिशन योजना बनतेय, गुत्तेदार व अभियंताचे कुरण

आधुनिक केसरी न्यूज

बाबुराव गोणारकर

**धर्माबाद :** केंद्र सरकारने २०१९ ला भारतातील प्रत्येका व्यक्तीला दिवसाल किमान पंचावन्न लिटर पाणी मिळावे या हेतूने जल जीवन मिशन योजनेचा आरंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केला.

'हर घर नल, हर घर जल' ह्या घोषणेनुसार प्रत्येका गावात व गावातील प्रत्येका घरात नळाद्वारे पाणी पोहचविण्याचे उद्दिष्टे ठेवण्यात आले.यासाठी केंद्र सरकार ४५ टक्के राज्य सरकार ४५ टक्के व ग्रामपंचायत १० निधी खर्च करण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले.यासाठी हजारो कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला.

धर्माबाद तालुक्यात ही जल जीवन मिशन योजना अंतर्गत विविध गावात कामे चालू आहेत. मात्र या कामाचा दर्जा बेसुमार आहे.इस्टीमेट व प्रत्यक्ष व्यवहार यांचा कुठेही ताळमेळ लागत नाही.

संबंधित विभागाला माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी एकूण किती गावात ही योजना चालू आहे? एकूण किती निधी वितरित करण्यात आला? त्यांचे इस्टीमेट किती आहे? गुत्तेदार कोण आहे? अभियंता कोण आहे? या विषयी माहिती मागितल्यास टाळाटाळ केली जात आहे.

जर या कामात कोणताही गैर व्यवहार होत नसेल तर ही माहिती का लपविली जात आहे? जर गैरव्यवहार होत असेल तर प्रशासन त्यांना पाठीशी का घालत आहे? बेलगुजरीतील काम इस्टीमेट नुसार होत नाही अशी तक्रार प्राप्त होऊनही का दखल घेतली जात नाही? ज्या सरकारचे भ्रष्टाचाराच्या बाबतीत झोरी टॉलरेन्स भूमिका आहे, ते शासन या भ्रष्ट अधिकाऱ्याविरुद्ध कडक भूमिका घेणार का?

खरं म्हणजे एका बाजूला देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना दुसऱ्या बाजूल पाण्या सारख्या मूलभूत गरजेच्या विषयात भ्रष्टाचार होणे दुर्दैवी आहे. जल जीवन मिशन योजना ही गुत्तेदार व अभियंतासाठी भ्रष्टाचाराचे कुरण बनले हेच सत्य होय. त्यामुळे धर्माबाद तालुक्यातील जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या व प्रगती पथावर असलेल्या कामाचे ऑडिट व्हावे अशी मागणी जनतेतून होत आहे.



प्रस्तुत पार्श्वभूमीवर संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी उडवा - उडवीचे उत्तर दिले आहे . प्रस्तुत कामात डस्ट ( दगडी चुरा ) वापर करता येत नाही ? तरी मलई लाटण्यासाठी याचा सरार्सपणे वापर केला जात आहे .

# महंत रामगिरीजी महाराज यांच्या हस्तेहोणार महाकाल मंदिराचे लोकार्पण



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन जवळील सुलतानाबाद येथे महाराष्ट्रातील पहिले महाकाल मंदिराचे भव्य, दिव्य बांधकाम पूर्ण झाले असून मंदिराचे लोकार्पण आठ फेब्रुवारीला सरला बेटाचे महंत रामगिरीजी महाराज, मध्य प्रदेशातील उज्जैन येथील विश्वविख्यात महंत बम बम नाथजी महाराज मंदसौरचे रामाश्रम महंत जितेंद्र दासजी महाराज महंत तेजस्वरायजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितिमध्ये होणार असल्याची माहिती केशरीया हिंदू वाहिनीच्या राष्ट्रीय अद्यक्ष डॉ.शितल अग्निहोत्री यांनी माहिती दिली.

दरम्यान आठ फेब्रुवारीला दोन्ही महंताची लासूर स्टेशन शहरातून रथातुन भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून संतपूजन करण्यात येऊन शिवलिंगाचीही मिरवणूक काढण्यात येणार असल्याने महाराष्ट्रातील पहिले महाकाल शिवमंदिराचे लोकार्पण महाशिवरात्रीच्या आधी होणार असल्याने शिवभक्तांना पर्वणी ठरणार आहे.

# जीवनात घेण्यापेक्षा देण्यास सर्वोच्च प्राधान्य असायला हवे : सुरेंद्र बियाणी



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे गरजुंना ब्लॅकेट वाटप करण्यात आली या वेळी धर्मदाय सहआयुक्त कार्यालय औरंगाबाद व धर्मदाय संस्था आयोजित कन्नड येथील साखर कारखाना परिसरातील गरजूंना मायेची चादर या उपक्रमातर्गत थंडीपासून संरक्षण करण्याकरिता वयोवृद्ध लोक लहान मुले उघड्यावर राहत असलेले भटके जीवन जगणारे व कोणताही कायम आसरा नसलेल्या गरजूंना ब्लॅकेट वाटप वितरण प्रसंगी माननीय धर्मदाय सहआयुक्त सुरेंद्र बियाणी यांनी आपले विचार मांडले. याप्रसंगी धर्मदाय सह आयुक्त सुरेंद्र बियाणी, धर्मदाय निरीक्षक सुधीर दिवसे, आकाश वानखेडे , लेखापरीक्षक अजहर खान, ॲड.योगेश ढोबळे, हे धर्मादाय कार्यालयातर्फे कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय येथे हजर होते. यावेळी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांनी त्यांचे स्वागत केले यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनामध्ये परोपकाराची भावना ठेवली पाहिजे हीच खरी मानवता होय. आपल्या जीवनात आपल्या उत्पन्नापैकी काही भाग आपण समाजकार्यासाठी वंचितांना ज्यांना गरज आहे त्यांना सहाय्य करण्याच्या कामासाठी वापरणे आवश्यक आहे असे सांगितले. या वेळी मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण पर्यवेक्षक रावसाहेब निकम वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे संचलन प्रदीप सनंसे यांनी केले आभार देविदास चौधरी यांनी मानले.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in